# एम. ए. मराठी

## सत्र - II (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. - पेपर - 5

# साहित्याची भाषा आणि मूल्यविचार - II

# (Theory of Literature - II)

## विषय कोड : 93317

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

| | | |
|---|---|---|
| **प्रकल्प समन्वयक** | : | **प्रा. अनिल बनकर**<br>कला शाखा प्रमुख<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| **अभ्यास समन्वयक व संपादक** | : | **प्रा. मनिषा-पवार बनकर**<br>सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग<br>दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई |
| **लेखक** | : | **डॉ . सूर्यकांत आजगांवकर**<br>गुरूनानक खालसा महाविद्यालय, माटुंगा, मुंबई. |
| | : | **प्रा. ज्ञानेश्वर मुंडे - सहाय्यक प्राध्यापक**<br>सुधागड एज्युकेशन सोसायटीचे शेठ ज . नै. पालीवाला<br>महाविद्यालय, पाली-सुधागड, जिल्हा रायगड. |
| | : | **डॉ. शरद आसाराम खांडेभराड**<br>विभाग प्रमुख व प्राध्यापक - मराठी विभाग,<br>नागसेन कला महाविद्यालय,<br>उस्मानपूरा, औरंगाबाद |

**सप्टेंबर २०२१, मुद्रण - १**    ISBN - 978-93-91735-69-2

**प्रकाशक** : **संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
**मुंबई विद्यापीठ,**
**विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.**

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | साहित्यभाषा व शैली विचार - डॉ . सूर्यकांत आजगांवकर | १ |
| २. | साहित्यातील प्रवृत्ती, वाद व साहित्याचे वर्गीकरण - प्रा. ज्ञानेश्वर मुंडे | ३९ |
| ३. | साहित्यातील मूल्यविचार - डॉ. शरद आसाराम खांडेभराड | ६२ |

# M. A. Part I - Marathi
# Syllabus based on Choice Based Credit System
# (To be implemented from Academic Year 2016-17)

**SEMESTER – II, PAPER NO. 5 (PAMAR105)**
**साहित्याची भाषा आणि मूल्यविचार**

एम्. ए. भाग १, मराठी, सत्र पहिले, श्रेयांकने ६, व्याख्याने- ६०
साहित्याची भाषा आणि मूल्यविचार

घटक १: साहित्याची भाषा; व्याख्याने २०, श्रेयांकने २

अ) साहित्यभाषेविषयीचे काही दृष्टिकोण: वक्रोक्ती, रूपवादी (रशियन व अँग्लोअमेरिकन), संरचनावादी विचार, रोमान याकुबसन, मानसशास्त्रीय समीक्षेचा भाषाविचार

आ) साहित्यभाषेचे विशेष व शैली विचार:
रूपक, प्रतिमा, प्रतीक, मिथ, समांतरता
शैलीविचार- संकल्पना, शैली – पारंपरिक व आधुनिक, शैली – तीन अंगांनी – लेखक, वाचक व साहित्यकृती

घटक २: साहित्यातील प्रवृत्ती- वाद व साहित्याचे वर्गीकरण; व्याख्याने २०, श्रेयांकने २

अ) साहित्यातील प्रवृत्ती, साहित्यातील वाद-प्रवृत्ती या संकल्पनेचे स्पष्टीकरण
रोमँटिसिझम, वास्तववाद

आ) साहित्याचे वर्गीकरण –

i) भारतीय परंपरा: श्रेणी व्यवस्था

ii) पाश्चात्त्य विचार: १) प्राचीन कालखंड: आदेशात्मक पद्धती- सॉक्रटिस, अॅरिस्टॉटल, हेगेल
२) क्रोचेची भूमिका
३) आधुनिक कालखंड: वर्णनात्मक पद्धती- इलियट, नॉर्थ्रोप फ्राय, सुसान लँगर
४) संरचनावादी पद्धती: रोलां बार्थ्स, रॉबर्ट स्कोल

घटक ३: साहित्यातील मूल्यविचार; व्याख्याने २०, श्रेयांकने २

अ) साहित्यमूल्यमापनाविषयीच्या दोन व्यापक भूमिका
लौकिकतावादी भूमिका व स्वायत्ततावादी भूमिका

आ) साहित्याच्या मूल्यमापनासंबंधीचे काही प्रश्न

साहित्यकृती – चांगली की श्रेष्ठ, वस्तुनिष्ठ की ज्ञातृनिष्ठ

साहित्यकृती – सापेक्ष की शाश्वत, साहित्यमूल्ये व समीक्षादृष्टिकोण

परीक्षापद्धत:

**“साहित्याची भाषा आणि मूल्यविचार” या अभ्यासपत्रिकेसाठी दोन पद्धतींनी परीक्षा घेतली जाईल:**

अ) **अंतर्गत चाचणी परीक्षा – ४० गुण**

**आ) सत्रांत परीक्षा – ६० गुण**

अ)अंतर्गत चाचणी परीक्षा : एकूण ४० गुण.

४० गुणांसाठी, विषय अध्यापक, संबंधित सत्रात २०-२० गुणांच्या दोन अंतर्गत परीक्षा आयोजित करतील. या अंतर्गत परीक्षांच्या निश्चित केलेल्या तारखांची घोषणा, सत्राचे अध्यापन सुरू झाल्यानंतरच्या पहिल्या दोन आठवड्यांत केली जाईल. संबंधित अंतर्गत परीक्षांच्या निकालाची तारीख आधी घोषित करून, त्या दिवशी तपासलेल्या उत्तरपत्रिका परिक्षार्थींना दाखविण्यात येतील.

आ) सत्रांत परीक्षा : एकूण ६० गुण

वरीलपैकी प्रत्येक घटकावर आधारलेले ३ प्रश्न पर्यायांसह विचारले जावेत, चौथा प्रश्न हा प्रत्येक घटकावर आधारित ३ टिपांचा असावा, व त्यांना अंतर्गत पर्याय असावेत.

संदर्भ ग्रंथसूची


१) कुळकर्णी वा. ल.; साहित्य: स्वरूप आणि समीक्षा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७५

२) गाडगीळ गंगाधर; खडक आणि पाणी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६०

३) गाडगीळ स. रा.; काव्यशास्त्रप्रदीप, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९६२

४) जोग रा. श्री.; अभिनव काव्यप्रकाश, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९९७

५) देशपांडे ग. त्र्यं.; भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, १९८०

६) धोंगडे रमेश; शैलीवैज्ञानिक समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे १९९८

७) निरगुडकर भारती; समीक्षासंहिता, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर २०१२

८) नेमाडे भालचंद्र; साहित्याची भाषा, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८७

९) पाटणकर रा. भा.; सौंदर्यमीमांसा, मौज प्रकाशन, मुंबई, १९७४

१०) पाटणकर वसंत; साहित्यशास्त्र: स्वरूप आणि समस्या, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६

११) पाटील गंगाधर; समीक्षेची नवी रूपे, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९५५ (प्र. आ.) १९७५ (तृ. आ.)

१२) पाटील गंगाधर; समीक्षामीमांसा, मौज प्रकाशन, मुंबई, २०११

१३) पाध्ये प्रभाकर, सौंदर्यानुभव, इस्थेटिक्स सोसायटी आणि मौज प्रकाशन, मुंबई, १९७७

१४) बेडेकर दि. के.; साहित्यविचार, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६४

१५) मर्ढेकर बा. सी.; कला आणि मानव, (अनु. जोशी रा. भि.) मौज प्रकाशन, मुंबई, १९८३

१६) मर्ढेकर बा. सी.; साहित्य आणि सौंदर्य, मौज प्रकाशन, मुंबई, (प्र. आ. १९५५), तृ. आ. १९८३

१७) मालशे मिलिंद; आधुनिक भाषाविज्ञान: सिद्धांत आणि उपयोजन, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९९५

१८) रसाळ सुधीर; कविता आणि प्रतिमा, मौज प्रकाशन, मुंबई, १९८२

१९) रायकर सीताराम व इतर (संपा); वाङ्मयीन वाद: संप्लपना व स्वरूप, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९०

२०) रेगे पु. शि.; छांदसी, मौज प्रकाशन, १९६८

२१) वेलेक रेने व ऑस्टीन वॉरन; साहित्यसिद्धांत, अनु. मालशे स. गं., महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई. १९८२

२२) वैद्य सरोजिनी व इतर (संपा) वाङ्मयीन महत्ता, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि लोकवाङमय गृहमुंबई, १९९१

२३) Daiches, David: Critical Approaches to Literature, Longmans, London, 1963, (Indian Rept)

२४) Lodge, David (ed): 20th Century Literary Criticism: A Reader, Longmans, London and New York, 1972

२५) Lodge, David (ed): Modern Criticism and Theory: A Reader, Longmans, America, 1991 (5th Edition)

२६) Wellek, Rene and Warren, Austin: Theory of Literature, Jonathan Cape, London, 1961

२७) नियतकालिकांतील संदर्भ: पाटील गंगाधर; चिह्नमीमांसा, अनुष्टुभ्, जाने-फेब्रु. १९९२, लेख ४

**युनिट 1**

# १

# साहित्याची भाषा

**घटक रचना**


**१.१ उद्दिष्टे**

**१.२ प्रस्तावना**

**अ) १.३ साहित्यभाषेविषयीचे काही दृष्टिकोण-**

१.३.१ भारतीय साहित्यशास्त्र – वक्रोक्ती

१.३.२ रुपवाद

१.३.३ संरचनावाद

१.३.४ याकोबसन -भाषाविचार

१.३.५ मानसशास्त्रीय समीक्षेतील साहित्य भाषा विचार

**आ) १.४ साहित्य भाषेचे विशेष व शैलीविचार**

१.४.१ रूपक

१.४.२ प्रतिमा

१.४.३ प्रतीक

१.४.४ मिथ

१.४.५ समांतरता

**१.५ शैली विचार**

**१.६ समारोप**

**१.७ संदर्भ ग्रंथ**

**१.८ नमुनाप्रश्न संच**


## १.१ उद्दिष्टे

1. भारतीय साहित्यशास्त्रात मांडलेल्या वक्रोक्ती विषयक विचारांमधून साहित्याच्या भाषेविषयी व्यक्त झालेले दृष्टिकोण विद्यार्थ्यांना समजावून सांगणे.

2. पाश्चात्य साहित्य अभ्यासकांनी साहित्य भाषेविषयी मांडलेला रूपवादी दृष्टिकोण तसेच संरचनावाद्यांनी भाषेच्या संदर्भात मांडलेले विचार, भूमिका स्पष्ट करणे.

3. रोमान याकोबसन याने भाषेच्या कार्याविषयी मांडलेला विस्तृत पट विशद करणे.

4. मानसशास्त्रीय समीक्षा विचारातील साहित्य भाषाविषयक दृष्टिकोणाचे विश्लेषण करणे.

5. साहित्यभाषेचे विशेष म्हणून रूपक, प्रतिमा ,प्रतीक ,मिथ, संकल्पना स्पष्ट करणे.

6. भाषेची समांतरता ही संकल्पना विशद करणे.

7. शैली म्हणजे काय हे स्पष्ट करणे, व पारंपरिक आधुनिक शैली विचार समजून सांगणे.

8. लेखक, वाचक, व साहित्यकृती या तीन अंगांनी शैली विचाराची मांडणी करणे.

## १.२ प्रस्तावना

### साहित्याची भाषा व शैलीविचार

या प्रकरणामध्ये भारतीय व पाश्चात्य साहित्यशास्त्र अभ्यासक, मीमांसक यांनी साहित्य -भाषा व शैलीविषयक विविध दृष्टिकोण मांडले आहेत. त्यांचा चिकित्सक अंगाने अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे साहित्य -भाषेचे स्वरूप स्पष्ट होईल. त्याचबरोबर साहित्यभाषा ही व्यवहार भाषा, विज्ञान भाषा यांच्यापेक्षा कशी वेगळी आहे हे दिसून येईल. साहित्यभाषेचे म्हणून काही जे विशेष आहेत त्यांची चर्चा काव्याचे स्वरूप, काव्याचे घटक व अंगे समजून घेण्यास उपयोगी ठरतील. संदेशनामध्ये भाषा किती कोणत्या प्रकारची कार्ये करते हे उलगडण्यास काही विचार, सिद्धान्त यांची निश्चित मदत होते.

आपल्याला साहित्याच्या संदर्भात शैलीचा विचार करावयाचा आहे. परंतु शैली ही संकल्पना केवळ साहित्य किंवा कला या क्षेत्रांपुरतीच मर्यादित नाही. शैली ही मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये वापरली जाणारी व्यापक संकल्पना आहे. तसेच मानवेत्तर प्राण्यांच्या अनुवंशिक व्यवहारातही शैलीची संकल्पना लावली जाते. त्यामुळे शैली म्हणजे काय, या प्रश्नाचे नेमके, काटेकोर स्वरूपाचे उत्तर देणे अवघड ठरते. शैलीला पर्याय म्हणून रित, पद्धत, वळण, ढब, धाटणी,कौशल्य ,वैशिष्ट , तंत्र अशा संज्ञा वापरल्या जातात.

साहित्याच्या क्षेत्रात 'शैली'या संज्ञेचा उपयोग अनेकविध पद्धतीनी होत असतो. याचे भान शैली विवेचनात ठेवणे गरजेचे आहे साहित्यप्रकार विशिष्ट कालखंड, संप्रदाय, पंथ ,प्रवाह विशिष्ट मनोवृत्ती, विशिष्ट गुणधर्म, वाङ्मयीन प्रवृत्ती यांच्याशी निगडित असलेले शैली या संज्ञेचे अर्थ वेगवेगळे आहेत. त्यामुळे शैली म्हणजे 'भाषाशैली' हा अर्थ पुरेसा नाही हे लक्षात घेऊन शैलीचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.३ साहित्यभाषेविषयीचे काही दृष्टिकोण-

### १.३.१ भारतीय साहित्यशास्त्र – वक्रोक्ती

सहाव्या शतकाच्या सुमारास श्रव्यकाव्यचर्चेला प्रारंभ दिसून येतो. भरतमुनिच्या नाट्यशास्त्र या ग्रंथात 'नाटक' हा साहित्यप्रकार आणि रससूत्र यांची सविस्तर चर्चा केली आहे. तसेच नाटक या साहित्यप्रकाराच्या सौंदर्य स्थळाची म्हणजेच नाट्यालंकाराचा विचार त्यात केलेला आहे. पुढील काळातील साहित्य अभ्यासकांनी श्रव्य काव्याच्या स्वरूपाची ,घटकांची व त्यातून प्रतीत होणाऱ्या रसांची सखोल चर्चा केलेली दिसून येते. 'नाटक' या साहित्य प्रकारात रंड्.ग संहितेचा महत्त्वाचा घटक 'अभिनय'( अ-भाषिक चिन्ह) हा नाटकातून प्रतीत होणाऱ्या रसांची आणि सौंदर्याची अनुभूती प्रतीती देणारा महत्त्वाचा घटक आहे असे दिसून येते, असे प्रतिपादन ही साहित्य अभ्यासकांनी केले आहे.

श्रव्यकाव्यात 'अभिनय' हा घटक उपस्थित नसतो पण तरीही काव्यात रसप्रतीती होत असते. ही रसप्रतीती कोणत्या घटकामुळे होते याचा तत्कालीन अभ्यासक, मीमांसक यांनी शोध घेण्याचा प्रयत्न केलेला होता.त्या अभ्यासातून वक्रोक्ती विचार व अलंकार विचार पुढे आला. भारतीय साहित्यशास्त्राचे अभ्यासक भामह, दण्डी, मम्मट, वामन, रुद्रट, कुंतक आदी प्रभृत्तींनी हा वरील अभ्यास मांडलेला आहे. त्यापैकी वक्रोक्ती विचाराची इथे साहित्य भाषेच्या संदर्भात चर्चा करणे योग्य ठरेल.

वक्रोक्ती विचाराची प्रथम मांडणी भामहाने केली. साधारणपणे दहाव्या शतकात कुंतकाने याचा अधिक विचार केला.

सैषा सर्वेव वक्रोक्तिरनयाSर्थो विभाव्यते |
यत्नोSस्यां कविभि:कार्य कोS लंकारोSनया विना ||

काव्यसौंदर्याचे रहस्य वक्रोक्ती मध्ये आहे असे भामहाने म्हटले आहे. त्यांच्या मते वक्रोक्ती हा वाणीचा अलंकार आहे. वक्रोक्तीने काव्यातील अर्थाचे विभावन होते. आणि त्याचे सौंदर्यपूर्ण काव्यर्थात रूपांतर होते. श्रव्य काव्यात अभिनयाचे कार्य वक्रोक्ती करते. अशी भामहाची भूमिका आहे. भामहाने श्रव्यकाव्याचे स्वरूप उलगडताना अनेक अलंकाराचे सविस्तर विवेचन केले आहे. त्यात त्यांने शब्दालंकार व अर्थालंकार यामधील सीमारेषा आखली. भामहाच्या काळात अनुप्रास व यमक यांना शब्दालंकार म्हणून स्थिरता लाभलेली दिसते.

अतिशयोक्ती या अलंकाराचे विवेचन करताना वक्तोक्ती म्हणजे लोकातिक्रांतगोचर म्हणजे केवळ (प्रतिवंतापाशी असलेली वाणी होय) अलंकृत वाणी असे म्हटले आहे. त्यांच्या मते काव्यातील

वस्तुचे स्वभाववैशिष्ट्ये प्रगट करण्यासाठी कवी लोकोत्तर वाणीचा साभिप्राय उपयोग करतो. ही साभिप्राय लोकोत्तर वाणी लोकव्यवहारातील वाणी पेक्षा भिन्न असते आणि म्हणून ती वक्रोक्ती ठरते. आधुनिक काळात साहित्यकृतीची जी सात अंगे सांगितलेली आहेत त्यापैकी भाषिक (शब्दात्मक ) तसेच आशय व अर्थाच्या अंगाचा निर्देश भामहाच्या वक्रोक्ती विचारातून झालेला दाखवून देता येतो.

भामहाच्या काळापासून कुंतकापर्यंत जी काव्यचर्चा झाली तिने मुख्यत्वे अलंकार विचारांची मांडणी केली.

दहाव्या शतकात कुंतकाने वक्रोक्ती विचाराला उजाळा दिला.

शब्दार्थो संहितौ वक्रकविव्यापारशालिनी |
बन्धे व्यवस्थितौ काव्यं तद्विदाल्हादकारिणि ||

असे श्राव्यकाव्याचे अनन्यसाधारणत्व कुंतकाने स्पष्ट केले आहे. असे करताना त्यांने विदग्ध लोकांच्या बोलण्याची पद्धती म्हणजे वक्रोक्ती असेही म्हटले आहे. कुंतकाने वक्रोक्तीला- "वक्रोक्ती:एवं वैदग्ध्यभंगीभणिती: उच्यते" असे म्हटले आहे.

वैदग्ध्य म्हणजे विदग्यभाव अर्थात काव्यनिर्मितीसाठी आवश्यक असणारे कवीचे कौशल्य, कवीप्रतिभा, काव्यशक्ती होय. तर कवीच्या विदग्धतेतून स्फुरलेली भङ्‌गी म्हणजे शोभा, वैचित्र्यपूर्ण सुंदर, आकर्षकता व तिच्या योगाने आविष्कृत झालेली भणिती म्हणजे 'वाणी' (भाषा)

कविप्रतिभेतून निर्माण झालेली नेहमीपेक्षा वेधक, आकर्षक, अभिव्यक्ती म्हणजे वक्रोक्ती होय.

लोकव्यवहारातील शब्दांना (भाषेला )प्रतिभावंताच्या बोलण्याच्या पद्धतीने सौंदर्य प्राप्त होते. हीच कुंतकाच्या मते विदग्धोक्ती होय. कुंतकाने काव्यभाषेचा विचार करताना तिच्या निर्मितीमागे विदग्धव्यक्ती म्हणजेच प्रतिभावंत असतो असे स्पष्टपणे म्हटले आहे. कुंतकाने वक्रोक्तीचा विचार करताना प्रतिभा व कवी या काव्यव्यापारातील दोन्ही घटकांचे महत्व सूचित केले आहे. एका परिने कुंतक काव्य भाषेच्या कार्यावर भाष्य करतो असे दिसून येते.

तसेच कुंतकाने वक्रोक्तीचे सांगितलेले प्रकार- i) वर्ण विन्यासवक्रता, ii) पदपूर्वाधवक्रता, iii) प्रत्ययवक्रता, iv) वाक्य वक्रता यामधून भाषेचे कार्य भाषेच्या वापरातून निर्माण होणारे सौंदर्य याची मीमांसा केलेली दिसून येते.

भामह आणि कुंतक या दोहोंचा वक्रोक्तीविचार लक्षात घेता वक्रोक्ती हेच श्रवकाव्याचे व्यवच्छेदक लक्षण असल्याचे ते सांगत आहेत असे म्हणता येईल. तसेच या दोहोंचा वक्रोक्ती विचार काव्यस्वरूपावर प्रकाश टाकणारा आहे.

वक्रोक्ती म्हणजे केवळ शब्द नव्हे तर काव्यातील शब्दांचे विशिष्ट कार्य हा अर्थ भामहाने पुढे आणला. तसेच काव्याचे अर्थ सौंदर्य वक्तोक्तीत असते हे भामहाने स्पष्ट केले.

कुंतकाच्यामते विशिष्ट अशा शब्द रचनेत काव्याचे सौंदर्य असते तसेच नाटकातील अभिनयाची जागा काव्यात वक्रोक्ती, अलंकार, रीती हे घटक असतात हे स्पष्ट केले.

भामहाला समकालीन असलेल्या दण्डीने काव्य विचार पुढे नेताना काव्यगुण व अलंकार यांचे सविस्तर विवेचन केले आहे. त्याने श्लेष, प्रसाद, समता, माधुर्य, सुकुमारता, अर्थव्यक्ती, उदारत्व, ओज, कांती, समाधी असे काव्य गुण नोंदवले आहेत. ते प्रामुख्याने कविने केलेल्या शब्द निवडीकडे लक्ष पुरवीत आहेत असे म्हणता येते. कारण या शब्द निवडीवर काव्यात कोणता काव्यगुण प्रकटणार हे अवलंबून असते असे दण्डीला सुचवायचे आहे.

आधुनिक काळात साहित्यकृतीचे अर्थनिर्णयन करण्यासाठी वाचकापाशी भाषिक क्षमता आणि साहित्यिक क्षमता असावयास हव्यात असा विचार पुढे आलेला दिसून येतो.दण्डीने केलेल्या काव्यगुणांचा विचार करता हाच विचार प्रत्यक्षा प्रत्यक्षपणे दण्डीच्या विवेचनात अद्यावत असलेला दिसतो. काव्यगुणांची विस्तृत चर्चा करणाऱ्या दण्डीने अनुप्रास अलंकारालाच विशेष महत्त्व दिलेले आहे. याचा अर्थ दण्डीपर्यंत अनुप्रास व यमक हे शब्दालंकार म्हणून (काव्याच्या भाषेचे मुख्यघटक म्हणून) स्वीकारलेले दिसतात.

"विशिष्ट पदरचना रीती": असे काव्याचे स्वरूप उलगडणाऱ्या वामनाने शब्दालंकार व अर्थालंकार हे अलंकाराचे प्रकार स्वीकारीत त्यांच्या कार्याची चर्चा केली आणि "सौंदर्यम अलंकार'अशी पुस्ती जोडून अलंकाराचा संबंध काव्यगत सौंदर्याशी जोडून घेतला. अलंकारांमध्ये सौंदर्य असते हे वामनाने प्रथम प्रतिपादन केले.

भारतीय काव्यमीमांसकांनी काव्याच्या रसनिष्पतीचे घटक शोधताना शब्दालंकार आणि अर्थालंकार यांची यथोचित मांडणी केली. अनुप्रास, यमक हे दोन शब्दालंकार आणि अतिशयोक्ती, अनन्वय, अर्थांतरन्यास, उत्प्रेक्षा, रूपक, व्यतिरेक. विशेषोक्ती, व्याज स्तुती, श्लेष आदिची गणना अर्थालंकात केली. भरतापासून वामनापर्यंत सर्व मीमांसकांनी 'रूपक या अर्थालंकाराची उपमेत्तर अलंकार म्हणून चर्चा केलेली आहे.

वरील सर्व चर्चा विवेचन लक्षात घेता वक्रोक्ती विचाराने आणि अलंकार विचाराने 'नाटक' या साहित्यप्रकाराहून 'काव्य'या साहित्य प्रकाराचे वेगळेपण कशात असते हे ही कळतनकळतपणे स्पष्ट केलेले दिसते. त्याचबरोबर काव्य या साहित्यप्रकारात शब्दांचे वैशिष्ट्यपूर्ण उपयोजन आणि त्यांचे विभाजन म्हणजे त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण कार्य सुसूत्ररुपात स्पष्ट केले. अंतिमत: काव्यप्रकारात 'शब्द' हा महत्त्वाचा घटक असतो. हेच यातून स्पष्ट झालेले आहे.

आधुनिककाळात काव्य घटकांमध्ये शब्द 'शब्दबंध, पद- पदबंध यांचा सामावेश झालेला दिसतो. भारतीय प्राचीन मीमांसकाची चर्चा याच अनुषंगाने झालेली आढळते.

भारतीय साहित्यशास्त्रातील वक्रोक्ती विचारातून काव्य भाषेच्या कार्याविषयी चर्चा केल्यानंतर पाश्चात्त्य साहित्यशास्त्रातील वेगवेगळ्या विचारधारा, दृष्टिकोण यामधून साहित्यभाषेच्या स्वरूपाचा, कार्याचा सविस्तरपणे आढावा घेऊ.

### १.३.२ रुपवाद

पाश्चात्य साहित्यपरंपरेत रुपवादाची मांडणी मुख्यतः रशियन रूपवादी व ॲंग्लो -अमेरिकन रूपवादी या संप्रदायाकडून झाली आहे. विसाव्या शतकाच्या प्रारंभी निर्माण झालेल्या रशियन रूपवादाने कलेची साहित्याची स्वायत्तता गृहित धरली आहे. साहित्याचे साहित्यपण नेमके कशात आहे याचा शोध त्यांनी घेण्याचा प्रयत्न केला.

साहित्यअभ्यासात लेखक चरित्र, इतिहास, समाजशास्त्र, मानसशास्त्र या गोष्टी रशियन रुपवाद्यांनी नाकारल्या तसेच भावना, कल्पना, वास्तव (सर्वसाधारण) अशा सर्व प्रकारच्या आशयालाही महत्त्व देण्याचे नाकारले पण साहित्यातील विविध प्रयुक्त्यांना संदर्भ पुरवणे एवढेच या आशयाचे महत्व मानले. त्याच्या दृष्टीने साहित्य हे भाषेचे एक विशेष रूप आहे. काव्य म्हणजे शब्दांची क्रीडा' हे या विचारातील प्रमुख सूत्र आहे. रूपवाद्यांच्या मते सर्वसामान्य भाषा ही संदेशनासाठी असते. तर काव्यभाषा सौंदर्यात्मक कार्य करते. कोणत्या प्रयुक्त्यां मुळे भाषा स्वतःकडे लक्ष वेधून घेते. रूपलक्ष्यी होते. याचा शोध रशियन रुपवाद्यांनी घेतलेला आहे.

ॲंग्लो-अमेरिकन रुपवाद्यांनी साहित्यकृतीच्या स्वयंपूर्णास्वरूपावरच लक्ष केंद्रित केले. कलेचे, साहित्याचे क्षेत्र स्वायत्त असते, ही भूमिका घेऊन साहित्याचा सामाजिक, नैतिक या दृष्टिकोनातून होणारा अभ्यास नकारला. साहित्याचा अभ्यास म्हणजे सौंदर्यात्मक गुणवत्तेचा अभ्यास अशी भूमिका घेतली. साहित्यभाषा व अन्य क्षेत्रातील भाषा यात भेद केला. हा भेदच ॲंग्लो-अमेरिकन साहित्यविचारात केंद्रस्थानी ठरला या संप्रदायातील अभ्यासकांनी भाषेच्या आधारे काही रूपतत्वांची मांडणी केलेली आहे.

- **रशियन रुपवाद- (Russian Formalism)**

साहित्याची व साहित्यअभ्यासाची विशेषत: व स्वायत्तता मानणारा जो एक साहित्यविचार रशियन साहित्य समीक्षेत १९१४ ते १९३० या कालखंडात विकसित झाला. त्या साहित्यविचाराला वा सिद्धाताला रशियन रुपवाद (रशियन फॉर्मलिझम) असे म्हटले जाते.

रुपवादयानी पहिल्या कालखंडात (१९१४-२०) साहित्याची स्वायत्तता काव्यात्म आणि व्यवहारी भाषांमधील भेद, द्रव्यसामग्री तंत्रयुक्ती, अपरिचितीकरण आदी संकल्पना मांडून साहित्य विचारांची पायाभरणी केली. दुसऱ्या कालखंडात (१९२१-१९२६) रुपवादयांनी

काव्यात्म संरचना कथात्म साहित्यप्रकार, गतिशील संरचना, साहित्यिकउत्क्रांती आदी संकल्पनाची व्यापक व शास्त्रशुद्ध रीतीने मांडणी केली.

ऐतिहासिक दृष्टीने पाहता रशियन रुपवाद ही पश्चिम युरोपातील एक उपशाखा मानली जाते. पश्चिम युरोपियन रूपवादाच्या सैद्धांतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रशियन रूपवादाचा उदय झाला

त्या काळात साहित्याच्या अभ्यासामध्ये साहित्यबाह्य अशा चरित्रात्मक, सामाजिक, ऐतिहासिक अभ्यास पद्धतीना महत्व दिले जाई. रुपवादयांनी या साहित्य बाह्य अभ्यासपद्धतीना प्रयोजनांना व ज्ञानदृष्टीना विरोध केला आणि अगदी प्रारंभीपासून त्यांनी साहित्याच्या आणि साहित्यभ्यासाच्या स्वायत्ततेवर व विशेषतेवर भर दिला. त्यासाठी प्रथम साहित्यभ्यासाची विशेषता व स्वायत्तता निश्चित केली. रोमान याकोबसन या अभ्यासकाने साहित्यशास्त्राच्या अभ्यासाचा विषय साहित्य नसून जिच्यामुळे साधी भाषिक कृती ही साहित्य कृती बनते, ती निखळ साहित्यकता भाषेच्या काव्यात्म कार्यामध्ये आढळून येते. कविता म्हणजे सौंदर्यात्म कार्यामध्ये रतलेली भाषा होय. म्हणून साहित्यिकतेसाठी रुपवादयांनी काव्यभाषेवर लक्ष केंद्रित केले.

- **काव्यात्मभाषा**

रशियन रुपवादयांनी साहित्याची साहित्यिकता ही भाषेच्या काव्यात्म कार्यामध्ये आढळून येते हे मान्य केले. काव्यभाषा याविषयी प्रमाण मानला जाणारा सिद्धांत लेव्ह जाकुबिन्स्की या रूपवादी समीक्षकाने मांडला (१९१६) त्याच्या मते वक्ता जेव्हा व्यवहारिक हेतू साधण्यासाठी भाषिक संप्रेषण करीत असतो, तेव्हा नाद शब्द आदी भाषिक धारकांना स्वातंत्र्य मूल्य व महत्त्व प्राप्त होत नसते. परंतु व्यावहारीक भाषा संप्रेषणाखेरीज अन्य भाषिक व्यावहारात व संप्रेषणात व्यावहारिक हेतूनां दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे त्या नादादी भाषिक घटक म्हणून लक्ष केंद्रित करू लागतात. त्यामुळे शब्दांचे व्यावहारिक अर्थमूल्य क्षीण होऊन त्यांना निखळ नादमूल्य म्हणजे काव्यमूल्य प्राप्त होते. काव्य हे स्वायत्तमूल्याने (काव्य मूल्याने) युक्त असलेल्या भाषासारणीचे उत्तम उदाहरण होय.

रुपवादयांच्या मते काव्यभाषा शब्दांच्या अर्थाला नकार देऊन त्याच्या नादरूपावर/नादरूप द्रव्यमयतेवर लक्ष केंद्रित करते. ती स्वतः खेरीज दुसऱ्या कोणत्याही गोष्टींचा वा अर्थमयतेचा/अर्थाचा निर्देश करीत नाही. म्हणून त्यांनी अर्थविरहित/अर्थातीत शब्दांचा व भाषेचा (Transactional Language) पुरस्कार केला.

- **अपरिचितीकरण**

काव्यभाषेचे तात्विक विवेचन केल्यानंतर रुपवादयांनी साहित्याच्या व्यवच्छेदक लक्षणा संबंधीचा विचार सुरू केला. यासंदर्भात प्रथम रशियन रूपवादी समीक्षक व्हीक्टर श्क्लोव्हस्की यांनी साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण सांगणारा अपरिचिती करणाचा(defamiliarization) सिद्धांत मांडला.

आपण माणसे दररोजच्या व्यवहारात सभोवतीच्या वस्तूकडे वा विषयाकडे सरावलेल्या नजरेने पाहत असतो त्यास यांत्रिकपणा असतो. सारवलेली सांकेतिक दृष्टी मोडून काढून त्याच वस्तू त्याच्या अनोख्या रूपात अपरिचित (unfamiliar) रूपात अनुभवायाला लावणे हा कलेचा खरा प्रयोजनहेतू असतो.

'शक्लोव्हरस्कीच्या'मते सुपरिचित विषयांना/वस्तूंना अपरिचित बनवणे हे कलेचे तंत्र आहे. कला म्हणजे वस्तूंची निखळ कलापूर्ण अनुभवण्याचा एक मार्ग होय. कलेत वस्तू वा विषय महत्वाचा नसतो.

कलावंत, लेखक ह्या अपरिचितकरणाच्या अनेकविध कलातंत्राचा उपयोग साहित्यात करीत असतात एखाद्या प्रस्तापित, रुळलेल्या कथातंत्राचे काव्यसंकेताचे वा व्याकरणिक नियमांचे उल्लंघन करीत नवे निवेदन तंत्र नवे संकेत निर्माण करून या अपरिचितीकरणाच्या कला तंत्राचा अवलंब लेखक करीत असतात. एखाद्या कथेत माणसा ऐवजी मूक प्राणी जेव्हा कथा निवेदन करू लागतो तेव्हा त्याचे ते अपरिचित निवेदन तंत्र हे वाचकाचे लक्ष वेधून घेते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर कवितेत व्यवहारीक भाषाच वापरलेली असते. परंतु या परिचित भाषेला विविध प्रयुक्तयांनी अपरिचित रूप दिले जाते. उदा. कवितेतील लय, यमके इत्यादी मुळे भाषा अपरिचित होते त्यामुळे रुळलेले साचेबंद, आकलन संवेदन बदलते व संवेदन नवे व ताजे होते. हे सगळे अपरिचिती कारणामुळे घडते.

- **नियमोल्लंघन**

व्हीक्टर शक्लोव्हस्की यांच्या मते साहित्याचे साहित्य पण हे अपरिचितीकरण या संकल्पनेत आहे . मुकॅरोव्हस्कीच्या मते साहित्याचे साहित्यपण हे साहित्य संकेताच्या उल्लंघनात आहे असे मत मांडले त्याच्या स्पष्टीकरणासाठी मुकॅराव्हस्कीने पूरोभूमिकरण वा नियमोल्लंघनाचा सिद्धांत मांडला.

आपली नेहमीची व्यवहाराची दैनंदिन भाषा काही नियमांनी बांधलेली अशी व्यवस्था असते. भाषा ही संदेशवहनसाठी असते. त्या भाषेचा व्यवहार हा व्याकरणिक नियमव्यवस्थेच्या आधारे चाललेला असतो. त्यामुळे त्यात नियमबद्धता संकेत बद्धता असते. पण भाषेच्या काव्यासाठी

होणारा वापर उपयोग हा वेगळ्या प्रकारचा असतो. भाषेचा सौंदर्यात्मक किंवा काव्यात्म वापर असल्यामुळे भाषा नियमानुसार वापरण्याचे प्रयोजन नसते. याउलट भाषेच्या व्यवस्थेची चौकट मोडली जाते. आपल्या नेहमीच्या भाषिक वापराच्या संदर्भात अनपेक्षित वाटावीत अशी भाषिक चिन्हे योजली जातात. प्रत्येक भाषेकडे व भाषिक चिन्हांकडे लक्ष वेधले जाते.

काव्यभाषेत नियमोल्लंघन होत असते, तेव्हा प्रमाण भाषेच्या व्यवस्थेचे व्याकरणिक नियम संकेत आदर्श यांचे एखाद्या कृतीत उल्लंघन होते. भाषिक व्यवस्था व्याकरणाचे नियम यांची मोडतोड केली जाते. त्याद्वारे भाषेस उठाव दिला जातो. तेव्हा काव्यभाषा निर्माण होते या उल्लंघनामुळे मोडतोडीमुळे अनपेक्षित अर्थव्यक्ती साधली जाते. भाषेतील व्यवस्थेच्या नियमांच्या पार्श्वभूमीवरच हे नियमोल्लंघन होत असते. ज्या भाषेत नियम अधिक तेथे काव्यभाषा शक्यता अधिक असतात. नियमोल्लंघन हे व्याकरणिक नियमांपुरतेच मर्यादित असे नाही. प्रतिमा, अलंकार, वाक्यप्रचार, काव्य संकेत, सुभाषिते इत्यादींची मोडतोड करून येथे अनपेक्षित अर्थाची निर्मिती साधावी म्हणजे नियमल्लंधन होते. तसेच ध्वनि, शब्द, वाक्य व अर्थ या चारही स्तरांवर भाषिक संरचनेचे नियम अस्तित्वात असल्यामुळे या सर्व स्तरांवर नियमोल्लंघन संभवते असे दिसून येते.

- **ॲग्लो-अमेरिकन रुपवाद**

ॲग्लो-अमेरिकन समीक्षाक्षेत्रात रूपवादी समीक्षा विचार १९३० ते १९५० या काळात प्रचलित झाला व प्रतिष्ठीत ही झाला.

ऐतिहासिक दृष्ट्या पाहता या रूपवादाचे समीक्षा प्रणालीचे तीन टप्पे दाखविता येतात. पहिल्या टप्प्यात १९२० घ्या सुमारास इंग्लंड आणि अमेरिकेमध्ये साहित्यासंबंधी आणि समीक्षेसंबंधी काही रुपनिष्ठ जाणिव्या निर्माण झाल्या. इंग्लंडमध्ये एलियट रिचर्डस व एम्पसन आणि अमेरिकन एन्झम टेट यांच्या लेखनातून या जाणिवा प्रथम व्यक्त झाल्या.

दुसऱ्या टप्प्यात १९३० व १९४० च्या दशकातून या जाणिवांमधून एक रूपवादी समीक्षा New criticism म्हणजे नव समीक्षा विकसित झाली. क्लिअन्थब्रुक्स, ब्लॅकमूर, रेनेवेलेक हे या समीक्षा प्रणाली सहभागी होते. तर तिसरा टप्प्यात १९५०-६० या कालखंडात अमेरिकन नवसमीक्षेचे नव पण संपून ही समीक्षा पद्धती समिक्षेची मुख्य धाराच बनली.

ॲग्लो-अमेरिकन रुपवादी समीक्षा ही नवसमीक्षा नावाने ओळखली जात असली तरी तिला सत्ताशास्त्रीय (ontological) विश्लेषणात्मक (analytical) व सौंदर्यवादी (Aesthetic) अशी नावे दिलेली आहेत. तसेच या नवसमीक्षकांनी या नवसमीक्षेची पायाभरणी व उभारणी केली.

त्यांनी साहित्यकृतीची स्वायतत्ता, स्वयंपूर्णता तिचा सेंद्रियरुपबंध काव्य भाषा सौंदर्यमूल्य आदी संकल्पनांची सुव्यवस्थित मांडणी करून नवसमीक्षेला तात्विक बैठक प्राप्त करून दिली.

रूपवादाची / नव समीक्षेची साहित्यकृती कडे पाहण्याची एक तात्विक भूमिका आहे. त्यात दोन प्रमुख तत्वे आहेत

१. साहित्यकृती ही एक स्वायत्त (Autonomous) व स्वयंपूर्ण वस्तू असते.

२. साहित्यकृतीला एकजिनसी किंवा सेंद्रिय रूपबंध (organic form) असतो.

साहित्यकृतीतील आशय, अनुभव, आशय सूत्रे, शब्दबंध, वाक्यबंध प्रतिमा, पात्रे, प्रसंग, निवेदन, भाष्य ह्या साहित्यकृतीच्या घटकांनी सेंद्रिय, एकजिनसी संघटना झालेली असते. सेंद्रिय एकतेमुळे साहित्यकृतीला व तिच्या रूपबंधाला कलात्म सौंदर्य प्राप्त होते.

रूपवाद्यांच्या मते साहित्यकृतीच्या रूपबंधाचे तिच्या अस्तित्वाशी काव्यार्थाशी एकरुपतेचे नाते असते. रॅन् सम या नव समीक्षकाच्या मते कवितेला शब्दार्थमय असे वस्तुनिष्ठ अस्तित्व असते. हे कवितेचे अस्तित्व तिच्या काव्यर्थातच वसत असते.

कवितेच्या अस्तित्वाला एक इंद्रियगोचर 'शब्दरूप पोत' (local structure) असते .दुसरे तिला एक अमृर्त अर्थबंध (logical structure) असतो. या दोन अंगाच्या देवघेवीमधून काव्यार्थ साकार व संघटित होत जातो.

साहित्यकृतीच्या स्वायत्ततेच्या संकल्पनेला अनुसरून नवसमीक्षकांनी काव्याची भाषा ही व्यावहारिक व वैज्ञानिक भाषेपेक्षा वेगळी असते. हे दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासंदर्भात आपण प्रथम आय. ए . रिचर्डस यांनी भावनात्मक भाषेचा मांडलेला (Emotive language चा) सिद्धांत समजून घेऊ.

- **आय. ए. रिचर्डस- भावनात्मक भाषा**

वास्तवाबद्दल माहिती देणे हा भाषेचा एकमेव उपयोग नव्हे. भाषा ही ज्या प्रमाणे माहिती देण्यासाठी वापरली जाते त्या प्रमाणे ती भावनाविष्कार व भावनाजागृती यांसाठी वापरली जाते. माहिती सांगण्यासाठी भाषेचा जो उपयोग होतो त्याला रिचर्डस वैज्ञानिक उपयोग (scientific use) म्हणतो. भावना निर्मिती साठी केलेल्या भाषेच्या उपयोगाला भावनात्मक उपयोग (emotive use) असे म्हणतो. काही वेळा कोणत्याही विचाराच्या मदतीशिवाय भाषा भावनाजागृतीचे काम करू शकते. पण बहुतेक वेळ तिला विचारांचा उपयोग एक साधन म्हणून करावा लागतो. भाषेचा वैज्ञानिक उपयोग करीत असतो तेव्हा आपल्या विचारांमध्ये तार्किक संबंध असणे आवश्यक असते. पण जेव्हा भाषेचा उपयोग भावना जागृतीसाठी करतो तेव्हा ती

तार्किकता अपेक्षित नसते. दुसऱ्या भाषेत सांगायचे तर काव्याच्या भाषेत भाषेचा भावनिक /भावनात्मक वापर केलेला असतो तर व्यवहारिक भाषेत भाषेचा तर्कनिष्ठ वापर/ उपयोग केलेला असतो.

उदा. 'झाडे हिरवी आहेत' या वाक्यात भाषेचा तर्कनिष्ठ वापर केलेला आहे. तर 'झाडे दुःख भोर आहेत' या वाक्यात भाषेचा भावनात्मक वापर केलेला आहे.

भाषेच्या काव्यात्म उपयोगामध्ये भावनिकतेला आवाहन असते. तर भाषेच्या वैज्ञानिक, तार्किक उपयोगामध्ये वर्णनात्मकतेला वाव असतो. भाषेचा भावनिक/ भावनात्मक उपयोग केलेला असतो तेव्हा त्याची सत्यसत्यता वस्तुस्थितीशी पडताळून पहायची नसते.

रिचर्डसचा शिष्य विल्यम् एम्पसन त्यांनी रिचर्डसच्या सूक्ष्म वाचनाची पद्धती स्वीकारून काव्याच्या अनेकार्थतेचा विचार मांडला आहे.

- **विल्सम् एम्पसन--भाषेची अनेकार्थता. / नानार्थता-किंवा संदिग्धता**

गद्याशी, विशेषत: तार्किक, वैज्ञानिक गद्याशी तुलना करता काव्य हे अर्थाच्या दृष्टीने संदिग्ध असते. भाव व्यंजकतेमुळे ते व्यक्तिनिष्ठ असते असे आक्षेप होते. त्यामुळे एम्पसनने संदिग्धता किंवा नानार्थता या संकल्पनेचे विश्लेषण केले. काव्यसंहितेचे सुक्ष्म वाचन व विश्लेषण करून संदिग्धता काव्यामध्ये किती पातळ्यांवर आढळू शकते याचे दिग्दर्शन केले. संदिग्धता, नानार्थतता वा अनेकार्थता याविषयी विश्लेषण केले आहे.

एम्पसनच्या मते कवी व शास्त्रज्ञ भाषेचा वापर वेगवेगळ्या पद्धतीने करतात. वस्तुतः सर्व भाषेतच अनेकार्थता अनुस्यूत असते. परंतु शास्त्रज्ञ जेव्हा भाषा वापरतो, तेव्हा त्याचे उद्दिष्ट वाचकाच्या मनात निश्चित असंदिग्ध अशा ज्ञानात्मक प्रतिक्रिया निर्माण करणारे संदेशन करणे हे असते. त्यामुळे बौद्धिक व तार्किक व्यापारात भाषेची अनेकार्थ सूचनक्षमता संकोच पाहून ती एकार्थवाचक होते. उलट कवीच्या भाषेचे मुख्य उद्दिष्ट अनेकार्थ निर्माण करून वाचकांच्या मनात अत्यंत संमिश्र प्रतिक्रिया निर्माण करणे हे असते. त्यामुळे भाषेतील अनेकार्थतेचा कवी मोठ्या कुशलतेने उपयोग करून घेतो. कवी विविध प्रकारचा व जास्तीत जास्त अर्थ शब्दातून व्यक्त करतो. त्याचा भर अनेकार्थसूचकतेवर असतो. कवीच्या भाषेत हे जे एकाच भाषिक भागाबाबत विविध प्रतिक्रिया निर्माण करण्याचे जे वैशिष्टपूर्ण सामर्थ्य असते त्यालाच एम्पसने अनेकार्थता असे म्हटले आहे. हेच काव्याचे व्यवच्छेदक लक्षण/तत्व आहे असे त्याचे म्हणणे आहे.

संदेशन हे काव्य भाषेचे प्रयोजन नसल्यामुळे येथे अनेक अर्थच्छटा निर्माण करून काव्यातील अर्थ संपन्न केला जातो. उदा. बालकवींच्या औदुंबर कवितेत सामान्यतः नेहमीच्या

व्यवहारातील शब्द वापरले आहेत. त्यातून कवीने अनेक अर्थ पुरविले आहेत. अनेकार्थता हे चांगल्या काव्याचा पाया आहे.

- **क्लिअन्थ ब्रुक्स---विरोधाभास/उपरोध**

ब्रुक्सने काव्यभाषा ही विरोधाभासात्मक (Paradoxical) असते प्रतिपादन केले आहे. विरोधाभास म्हणजे केवळ विरोधालंकार नव्हे. ब्रुक्सने उपरोध वा विरोधाभास यांचा कवितेचे श्रेष्ठ काव्यगुण म्हणून गौरव केलेला आहे. एखाद्या उक्ती/वाक्यामध्ये जेव्हा दोन अर्थ, कल्पना, वृत्ती यांच्यामध्ये विरोध अंतर्विरोध वा विरोधाभास निर्माण होतो तेव्हा तेथे उपरोध निर्माण होतो. आम्ही जमदग्नी/प्रेतरूपी या काव्यपंक्तीतीत दोन परस्परविरोधी वृत्ती आम्ही एकवटलेल्या आहेत.

विरोधाभास ही संकल्पना ब्रुक्स व्यापक अर्थाने वापरतो. त्याच्या मते परस्पर विरोधी कल्पना मुल्ये यातील ताण, संघर्ष काव्यात प्रत्ययाला येतो. दोन विरोधी कल्पनांतून सौंदर्य निर्माण होते. काव्य भाषा अशा प्रकारचा विरोधाभास मांडत असते. त्यामुळे ती एकच अर्थ सांगत नाही . तर अधिकाधिक व्यामिश्र अर्थ सांगत असते. कवी जे काही सांगत असतो ते विरोधाभासात्मक भाषेतून सांगतो. व्यक्त करतो. अशी विरोधाभासयुक्त भाषाच काव्य उपयुक्त व अनिवार्य असते.

### १.३.३ संरचनावाद

संरचनावाद म्हणजे आधुनिक भाषाविज्ञानाचे नमुना रूप डोळ्यासमोर ठेवून समाज, साहित्य, कला आदी सांस्कृतिक घटितांचा व व्यवस्थांचा शास्त्रशुद्ध रीतीने अभ्यास करणारी पद्धती होय.

साहित्यिक सरंचनावाद म्हणजे साहित्यव्यवस्थेत साहित्यकृतीत/संहितेत प्रकट होणाऱ्या सामान्य साहित्यसंकेतांचा व संरचनांचा शास्त्रशुद्ध रीतीने शोध घेणारी साहित्य अभ्यासाची पद्धती होय. ही संरचनांवादी पद्धती आधुनिक विज्ञानाच्या नमुना स्वरूपाच्या आश्रयाने (Linguistic model) साहित्याचा साहित्यशास्त्राचा व साहित्यविषयक प्रश्नांची चर्चा करते.

प्रस्तुत संरचनावादात साहित्यिक व सांस्कृतिक घटीतांचा व व्यवस्थांचा अभ्यास करण्यासाठी आधुनिक भाषाविज्ञानाच्या पद्धतीचा विशिष्ट रीतीने उपयोग केला जातो हा उपयोग दोन प्रकारे केला जातो.

१) साहित्यकृतीच्या भाषेचे नादरुप, शब्दरूप,वाक्यरूप शब्दार्थरुप आदी भाषिक अंगाचे केवळ भाषा विज्ञानाच्या परिभाषेत वर्णन विश्लेषण केले जाते.

२) भाषानियम/भाषाव्यवस्था (Langue) भाषित (Parole) यासारखी भाषावैज्ञानिक मुलतत्वे निवडून त्यांच्या आधारे एका योग्य नमुनारुपाची रचना केली जाते.

संरचनावादाला भाषावैज्ञानिक नमुनारुपावर आधारलेली दुसरी अभ्यासपद्धती अभिप्रेत आहे.

संरचनावाद ही केवळ अभ्यासपद्धतीनसून तो एक ज्ञान मीमांसीय दृष्टिकोण आहे. काहींच्या दृष्टीने संरचनावाद ही एक विचारप्रणाली, तत्त्वप्रणाली आहे. संरचनावादाचे मुलतत्व 'संबंध' आहे. संबंधाची व्यवस्था किंवा संबंध सारणी म्हणजे संरचना होय. संबंध आणि संरचना ही संरचनावादाची आधारतत्वे मानली जातात.

विसाव्या शतकातील संरचनावादाचा प्रारंभ हा सोस्यूरच्या आधुनिक भाषाविचाराने झाला. त्याच्या भाषाविचाराच्या आणि चिन्हविचाराच्या आश्रयाने संरचनावादाची जडणघडण झालेली आहे. चिन्ह, चिन्हव्यवस्था चिन्हाची यादृच्छिकता भाषा नियम/व्यवस्था (Langue) आणि भाषित/भाषण (Parole), संरचना, चिन्हांची संरचना, चिन्हांची व भाषेची कार्य आदी संकल्पनांचा साहित्य संरचना बाबतीत उपयोग केला जातो. चिन्ह मीमांसा व संरचनावाद यांचे निकरचे नाते आहे.

सोस्यूरचा भाषावैज्ञानिक विचार समजून घेण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून पारंपरिक भाषाभ्यासपद्धतीचे स्वरूप माहिती असले पाहिजे, कारण सोस्यूरने इंडोयुरोपियन भाषाकूल, ऐतिहासिक व तुलनात्मक भाषाभ्यास या पद्धतीचा अभ्यास केला तेव्हा या अभ्यासामध्ये त्याला भाषेची संकल्पना अपुरी वाटल्याने त्याने आधुनिक भाषाविज्ञान व चिन्हमीमांसेचा पाया घातला.

त्याच्यामते भाषेच्या स्वरूपाचा विचार करताना द्रव्य आणि आकार यात भेद केल्याशिवाय भाषेचे स्वरूप नीट कळणार नाही. द्रव्य म्हणजे आकारहीन कच्ची सामग्री. भाषेच्या संदर्भात द्रव्य म्हणजे ध्वनी किंवा स्वन असतात, तर दुसऱ्या बाजूला अर्थात्मक, विचारात्मक द्रव्य असते. दोन्ही प्रकारच्या द्रव्याला आकार देऊन भाषा सिद्ध होत असते. भाष्य म्हणजे ध्वन्यात्मक व अर्थात्मक द्रव्यांना एकत्र आणून दिलेला आकार (Form) होय. असे सोस्यूरने तत्त्व मांडले. भाषा विचारांना, अनुभवांना, अर्थाला व्यक्त करीत असते. म्हणजे विचार, अनुभव, अर्थ हे भाषे आधीच अस्तित्वात असतात या पारंपरिक भूमिकेला सोस्यूरने धक्का दिला. कारण भाषा ही ध्वनींना व अर्थांना एकत्र आणून आकार देते. अर्थ किंवा अनुभव हा मनात कोठेतरी आधीच अस्तित्वात असे नसून आकार घेण्याची प्रक्रिया म्हणजे भाषा होय. उदा. कागदाची एक बाजू म्हणजे ध्वनी आणि दुसरी बाजू म्हणजे अर्थ वा विचार होय. ध्वनि आणि

अर्थ याच्या एकत्रीकरणातून निर्माण होतो तो आकार. भाषिक वास्तव्य किंवा तथ्य (Linguistic Fact) अस्तित्वात येणे म्हणजे ध्वनी आणि अर्थ या एकत्र आणून आकार निर्माण करणे होय.

सोस्यूरच्या मते समग्र वाचिक व्यवहार (लॅंग्वेज language) हा काही वैज्ञानिक अभ्यासाचा विषय होऊ शकत नाही कारण तो अत्यंत विस्कळीत बहुविध स्वरूपाचा असतो समग्र वाचिक व्यवहारातून एक स्थिर,सातत्य राखणारे स्वयंपूर्ण रुप वेगळे काढावे लागेल. ते रूप म्हणजे अचल नियमबद्ध अशी व्यवस्था (लंग Langue) तिलाच भाषिक व्यवस्था म्हणतात.

व्यवस्था ही भाषा व्यवहारांमध्ये एक सामाजिक निकष म्हणून वावरत असते. वैज्ञानिक स्वरूपाच्या अभ्यासामध्ये भाषिक व्यवस्थेला केंद्रवर्ती स्वरूपाचे स्थान द्यायला हवे अशी सोस्यूरची धारणा आहे. वाचिक व्यवहारातून व्यवस्थापक रूप वेगळे काढले की बहुविध स्वरूपाचे व्यक्तीसापेक्ष वर्तनरूप (पारोल Parole) शिल्लक राहते. हे भाषिक वर्तन पूर्णपणे व्यक्तीच्या लहरीवर अवलंबून असते.  त्यावर कोणतेही सामाजिक बंधन नसते.

language किंवा भाषिक व्यवस्था समजून घेण्यासाठी सोस्यूरची भाषिक चिन्हांची संकल्पना लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याच्यामते भाषा ही चिन्हांची एक व्यवस्था असते. भाषिक चिन्हांचे स्वरूप स्पष्ट करताना सोस्यूर म्हणतो की चिन्ह हे चिन्हक आणि चिन्हित यांच्यातील संबंधांचे बनलेले असते.

चिन्ह (Sign), चिन्हक (Signifier), चिन्हित  (Signified) अशा तीन संज्ञा सोस्यूरने वापरलेल्या आहेत.) भाषिक चिन्हे हे एखादा ध्वनी असू शकेल. चिन्हे ही चिन्हके व चिन्हिते यांच्या युतीमधून तशीच ती इतर चिन्हांची असणाऱ्या संबंधामुळे सिद्ध होतात. एका व्यवस्थेतील चिन्हे ही परस्परावलंबी असतात.

'चिन्हक' हे वस्तुतः भौतिक ध्वनी नसून ध्वनीप्रतिमा असतात. तर 'चिन्हिते' ही भौतिक वस्तू नसून निश्चित केलेल्या संकल्पना वा विचार असतात. या दोन्ही मनोगत गोष्टीच्या युतीमधून भाषिक चिन्ह निर्माण होते.

चिन्हांची व्यवस्था म्हणजे चिन्हांचे परंपराशी असणारे संबंध होय.सोस्यूरने हे रूबंध दोन प्रकारचे असतात. १. अन्वयनिष्ठ संबंध: चिन्हे एकापुढे एक अशी क्रमावर आल्याने त्यांच्यात अन्वयावर आधारलेले संबंध असतात. २. गणनिष्ठ वा आदेशनिष्ट संबंध: म्हणजे रचनेमध्ये विशिष्ट स्थानी कोणत्या प्रकारचे घटक येऊ शकतात यावर काही बंधने असतात.

एकूणच भाषा ही प्राथमिक स्वरूपाची चिन्ह व्यवस्था असून साहित्य ही तीवर आधारलेली दुय्यम स्वरूपाची चिन्हव्यवस्था आहे.

संरचनावादांच्या मते भाषेची नियमव्यवस्था व साहित्याची संकेतव्यवस्था हे भाषेचे /साहित्याचे एक सामाजिक, सांस्कृतिक अंग आहे. संहितेच्या अर्थाचे मूळ भाषेच्या व साहित्याच्या कार्ययंत्रणेत आहे अशी धारणा आहे.

संरचनावादात भाषेच्या एकाकलिक अभ्यासावर (Synchronic) विशेष भर दिला जातो.

भाषाविज्ञानाच्या आश्रयाने संहितेचा विचार वाक्या पलिकडे जात नाही. म्हणून वाक्यापलिकडे जाणाऱ्या संहितेचा कल्पना संरचनावादयांनी मांडली. संहितेत शब्दशब्दांमधील,वाक्यावाक्यामधील संबंधाचे जाळे विणले जाते. साहित्यिक सहीततेत अलंकारिक भाषेचा प्रभाव असतो. त्यामुळे साहित्यिक संहिता संकल्पनाही भाषा विज्ञानापेक्षा अलंकारशास्त्राजवळ जाणारी असते.

### १.३.४ रोमान याकोबसन -भाषाविचार

रशियन रूपवादी चळवळीतील एक मुख्य संशोधक आणि विचारवंत याकोबसन याने भाषावैज्ञानिक अभ्यासाबरोबर साहित्यशास्त्रीय उपयोजनामध्ये विशेष रस घेतला होता. याकोबसनने भाषिक संदेशनाचा एक विस्तृतपट मांडला. मुळात याकोबसनने काव्य-शास्त्र हे भाषा विज्ञानाचा एक भाग मानून भाषाविषयीच्या विवेचनातून आपल्या काव्यशास्त्राची उभारणी केलेली आहे. भाषिक संदेशनाच्या व्यापारात सहा मूळघटक असतात. प्रेक्षक किंवा वक्ता ,ग्रहणकर्ता किंवा श्रोता, संदेश किंवा अभिप्राय, संदर्भ किंवा परिसर, वक्ता श्रोता यांच्यातील परस्पर संबंध आणि व्याकरणिक व्यवस्था असा संबंध पाहता येतो. तो खालील प्रमाणे.

**संदर्भ (Context)**

**प्रेषक (Sender) ------------ संदेश (Message) -------------ग्रहणकर्ता (Receiver)**

**संपर्क (Contact)**

**माध्यम (Code)**

कोणत्याही भाषिक संदेशन प्रक्रियेत प्रेक्षक/वक्ता हा ग्रहणकर्ता/श्रोता याला उद्देशून काही संदेश अभिप्राय सांगतो. या संदेशाला कोणतातरी संदर्भ असतो. या संदेशनप्रक्रियेत वक्ता व श्रोता यांचे वेगवेगळ्या प्रकारचे संबंध असू शकतात. ही संदेशनप्रक्रिया वक्ता आणि श्रोता यांना अवगत असणाऱ्या एकमेकांना अर्थबोध होईल अशा विशिष्ट भाषेच्या व्याकरणिक नियमांनुसार चाललेली असते.

भाषिक संदेशन प्रक्रियेतील सहा घटकांपैकी कोणत्या घटकाला महत्त्व प्राप्त होते. तो केंद्रस्थानी येतो, त्यानुसार भाषेची कार्ये निश्चित होतात. वरील आकृतिबंधातील त्या त्या पायाभूत घटकांशी निगडित भाषेची कार्ये कोणती आहेत हे या आकृतिबंधावरून स्पष्ट होईल.

**निर्देशनात्मक/संदर्भनिष्ठ ( referential)**

**अविष्कारात्मक (emotive) --------- कलात्मक/ काव्यात्मक (poetic)--------**

**परिणामनिष्ठ/ आवाहक ( conative)------- संपर्कनिष्ठ (phatic)**

**अधिभाषिक/ चिन्हव्यवस्थाविषयक (metalingual)**

उक्तीचे/भाषिताचे (message) प्रत्येक घटकाशी जे विशिष्ट प्रकारचे संबंध प्रस्थापित होतात. त्यामधून सहा प्रकारची कार्ये निष्पन्न होतात. कोणत्याही भाषिक व्यवहारांमध्ये ही सर्व कार्ये कमी - जास्त प्रमाणात घडत असतात. पण एकूण व्यवहाराचा रोख लक्षात घेतला तर कोणत्या घटकावर भर आहे ते समजू शकते. व त्यावरून कोणते कार्य अधिक महत्त्वाचे आहे हे ठरविता येते.

## १. अविष्कारत्मक कार्य/भावनात्मक कार्य

भाषिक जेव्हा वक्त्यावर लक्ष केंद्रित करते तेव्हा भाषा अविष्कारात्मक किंवा भावनात्मक कार्य करू लागते.

उदा. माझं शांतीप्रेम हे उघड्या नागड्या भेकडपणाला दिलेले धार्मिक नाव होते.

या उक्तीतून वक्त्याच्या मनातील शांती भावना व्यक्त झाली आहे. म्हणून भाषा भावनात्मक वा अविष्कारात्मक कार्य करते.

## २. प्रभावपर किंवा परिणात्मक कार्य

उक्ती जेव्हा श्रोता या घटकावर आपले लक्ष केंद्रित करते तेव्हा भाषा प्रभावपर किंवा परिणामनिष्ठ कार्य करू लागते.

उदा. जुने जाऊ द्या, मरणालागुनि, जाळुनी किंवा पुरुनी टाका.|

या उक्तीतून श्रोत्यांच्या भावनांना मनाला आवाहन केले आहे. त्या श्रोत्यांच्या मनावर प्रभाव गाजवितात, परिणाम करतात, म्हणून भाषा परिणामनिष्ठ कार्य करते.

## ३. काव्यात्मकार्य

भाषिक जेव्हां स्वतःवरच आपले लक्ष केंद्रित करते वा वेधून घेते तेव्हा भाषा काव्यात्म /सौंदर्यात्म कार्य करू लागते.

उदा. झाडे दुःख भोर आहेत. उक्तीवर लक्ष केंद्रित केले जाते. 'दुःख भोर 'हा शब्द आपले लक्ष वेधून घेतो. दुःख भोर शब्दाने काळेभोर या सुपरिचित विशेषणाच्या पार्श्वभूमीवर नियमोल्लंधन केलेले आहे . या नियमोल्लंधनामुळे या उक्तीतील भाषा स्वतःकडे लक्षवेधून काव्यात्म कार्य करते.

**४. संदर्भात्मक/वाच्यार्थपरकार्य**

उक्ती जेव्हा वर्ण्यविषयावर त्याच्या संदर्भावर भर देते तेव्हा भाषा वाच्यार्थपर, संदर्भात्मक कार्य करते. उदा. झाडे हिरवी आहेत. या उक्तीत शब्दश: अर्थ घेऊन झाडांचे वस्तुनिष्ठ, यथार्थ वर्णन केलेले आहे. 'हिरवी झाडे' हा उक्तीचा वर्ण्यविषय आहे उक्ती विषयलक्ष्यी आहे. येथे भाषा वाच्यार्थनिष्ठ वा संदर्भनिष्ठ (संदर्भात्मक) कार्य करते.

**५. संपर्कात्मक कार्य**

उक्त्ती जेव्हा वक्ता व श्रोता यांच्यामधील संपर्कसंबंधावर भर देते तेव्हा भाषा संपर्कात्मक कार्य करीत असते. उदा. हॅलो माझं बोलणं तुला ऐकू येतय? तुझं बोलणं नीट ऐकू येत नाही. फोन बंद कर? अशा प्रकारच्या संभाषणावर उक्ती वक्ता- श्रोता यांच्यामधील संभाषण, संप्रेक्षण वा संपर्क संबंध चालू ठेवावेत की बंद करावेत हे अजमावण्याचे कार्य करीत असतात. या उक्तीतील भाषा संपर्कात्मक कार्य करते.

**६. अधिभाषात्मक कार्य**

उक्त्ती जेव्हा भाषेच्या स्वरुपाविषयी, तिच्या नियम संकेता विषयी बोलू लागते तेव्हा भाषा अधिभाषात्मक कार्य करू लागते. भाषा ही ज्ञानवाहक आहे. तशीच ती वृत्तिसूचकही आहे. उक्तीतील भाषा भाषेच्या स्वरूपाविषयी सांगते. ती स्वत:विषयी बोलते . म्हणून उक्त्तीतील भाषा अधिभाषात्मक कार्य करते.

कोणत्याही भाषित घटनेत कवितेच्या (साहित्यकृतीत) संहितेत भाषेची सहा कार्य कमी अधिक प्रमाणात क्रियाशील असतात. परंतु कवितेत साहित्यकृतीत काव्यात्मकार्य हे अधिक प्रभावी असते.

अर्थसर्जन आणि अर्थसंप्रेषण करणे हे चिन्हांचे मुख्य कार्य असते. संहितेच्या किंवा भाषिक घटनेच्या आश्रयाने हे भाषिक चिन्ह (शब्द) अर्थसंप्रेक्षणाचे कार्य करीत असते. हे स्पष्ट करण्यासाठी रोमान याकोबसने संप्रेक्षणाचे एक मॉडेल मांडले. कोणत्याही भाषिक घटनेत सहा घटक कार्य करीत असतात हे खरे आहे, पण काव्यात्मकार्य किंवा सौंदर्यात्म कार्य साहित्यकृतीत प्रभावी असते. साहित्यकृतीतील /कवितेतील सहा घटकांपैकी कोणत्याही

घटकाचे द्वित झाले म्हणजे भाषा सौंदर्यात्म/ काव्यात्म कार्य करू लागते. काव्य भाषेत सर्व घटकांचे सारे लक्ष अभिप्राया भोवती केंद्रित झालेले असते.

### १.३.५ मानसशास्त्रीय समीक्षेतील साहित्य भाषा विचार

साहित्याचा मुख्य विषय माणूस आहे व माणसाच्या सर्व कार्य व्यापाराचं मूळ मानवी मन आहे. मानवी मन साहित्याची निर्मिती करते. साहित्यातून तेच मूर्त होते.

साहित्य निर्मिती, साहित्याचे स्वरूप आणि साहित्य आस्वाद या तीनही अंगाच्या विचारामागे मानवी मनच कार्यशील असते. या तीनही अंगाचा व्यापार समजून घेण्यासाठी मानवी मनाचा अभ्यास, मानवी मनाचं ज्ञान आवश्यक असते. असे काही साहित्य समीक्षक, अभ्यासक यांना वाटले. त्यातूनच या मानसशास्त्रीय समीक्षेचा उदय झाला.

मानवी मनाच्या सुव्यवस्थित ज्ञानाच्या आश्रयाने साहित्यकृतीची जी समीक्षा केली जाते तिला मानसशास्त्रीय समीक्षा म्हणता येईल.

वस्तुतः हा साहित्य मानवी मनाचा/ बुद्धीचा अविष्कार असल्याने मानसशास्त्र व समीक्षा यांचा जवळचा संबंध आहे.

मानसशास्त्र हे इतर शास्त्रांपेक्षा कसे वेगळे आहे, हे सांगण्याचे काम तसेच मानसशास्त्रात स्वतःची व्यक्तिता (Identity) प्राप्त करून देण्याचे कार्य प्रथम सिग्मंड फ्रॉईड या मानसशास्त्रज्ञाने केले. त्याने एक वेगळी प्रतिमा निर्माण केली. मानवी मनाचा अभ्यास करताना फ्रॉइडने तीन प्रमुख सिद्धांत मांडले आहेत.

**१. मानवी मनाची संकल्पना २. कामवासना सिद्धांत ३. स्वप्नसिद्धांत**

आपल्या म्हणून मनोविश्वात एक तत् (इड्) दुसरी अहं (इगो) तिसरी अति- अहं (सुपर इगो) या तीन प्रकारच्या संस्था कार्यरत असतात.

**(अ)** आपल्या मानवी मनाचे तीन स्तर - एक संबोध, दोन बोधपूर्व आणि तिसरा अबोध व वरील सांगितलेल्या मानसिक संस्था या मिळून मानवी मनाचा व्यापार चाललेला असतो.

**(ब)** कामवासनेच्या सिद्धांतामध्ये फ्रॉइडने कामवासना ही उपजतच असते. तिचा मुलाच्या जन्मापासूनच कामवासनेचा विकास सुरू होतो, हे सांगितले आहे.

**(क)** फ्रॉईडचा स्वप्न सिद्धांत हा समीक्षेला नवी दृष्टी देणारा आहे. साहित्यकृतीचे स्वरूप, तीमधील पात्रे तिची भाषा, मूल्यमापन, अर्थ निर्णयन यावर नवा प्रकाश या सिद्धांताने टाकलेला आहे.

स्वप्न ही जशी मानवी मनाची निर्मिती आहे, तशीच साहित्य, चित्र, मिथ आदी घटीतेही मानवी मनाची निर्मिती आहेत. स्वप्नाप्रमाणे साहित्याची भाषा प्रतिक - प्रतिमांची असते. स्वप्नात प्रमाणे साहित्यकृतीची रचना दोन अंगाने मिळून झालेली असते, एक शब्दार्थमय असं अंग आणि दुसरे ध्वन्यर्थरूप अप्रकट अंग. साहित्यकृतीची भाषा आणि तिची रचना यांच्या मुळाशी स्वप्न तंत्राचे दोन व्यापार कार्यशील असतात.

फ्रॉईडने स्वप्न सिद्धांत मांडून स्वप्नाविषयी च्या जुन्या समजुती खोट्या ठरविल्या. त्याच्या मते स्वप्न हे आपल्या असंज्ञ मनाचा अविष्कार असतो हे दाखवून दिले. असंज्ञ मना कडे जाण्याचा राजमार्ग म्हणजे स्वप्न.

**Dream is Fulfillment of wish - फ्रॉईड**

स्वप्न म्हणजे दबलेल्या इच्छेची आभासमय किंवा प्रतीकरूप परिपूर्ती होय. स्वप्न म्हणजे असंज्ञ मन जाणून घेण्याचा राजमार्ग होय. नियंत्रकाचा प्रभाव कमी झाल्यामुळे असंज्ञ मन आपल्या दबलेल्या इच्छा प्रतिमाच्या वेषात विरुप होऊन प्रकट करीत असते. स्वप्न या घटकातून मानवी मनाचा शोध घेणे हे फ्रॉईडचे ध्येय होते. त्याचबरोबर स्वप्नांचे स्वरूप विशद करण्यासाठी त्याने स्वप्नसिद्धांत मांडला. या स्वप्नसिद्धांतातून जी तत्वे मिळाली ती साहित्यकृतीला कशी लावता येतील हे महत्त्वाचे आहे.

साहित्य ही एक कला आहे. कलेला तंत्र आहे. तसेच स्वप्नाला पण तंत्र आहे. त्यामुळे साहित्यकृती आणि स्वप्न यांचा संबंध पाहताना स्वप्न स्वरूप व साहित्यकृती स्वरूप, स्वप्न रचना तंत्र व साहित्य कृती रचना तंत्र, स्वप्न भाषा व साहित्य भाषा यांच्यातील साधर्म्य पहावे लागेल.

**१) स्वप्न रचना व साहित्यकृती रचना-**

स्वप्नाला दोन अंगे असतात.

अ) प्रकट स्वप्न

ब) सुप्त विचार, असंज्ञ अतृप्त इच्छा होय.

स्वप्नांचे प्रकट अंग चित्र लिपीत लिहिलेले असते. त्यापलीकडे त्याचा अप्रकट आशय असतो. तो शोधून काढावा लागतो. तर अप्रकट अंगात म्हणजे सुप्त विचारात व्यापक आशय असतो. पण सुप्त विचार अनिश्चित असतो.

साहित्यकृतीला दोन अंगे असतात. साहित्यकृतीचे शब्दार्थ रूप म्हणजे तिचे प्रकट अंग होय. किंवा त्याला वाच्यार्थ म्हणता येईल. तर दुसरे अंग असंज्ञ अर्थबंध ध्वन्यार्थ होय. शब्दार्थाच्या पलीकडचा ध्वन्यार्थ, असंज्ञ अर्थाचे बंध साहित्यात असतात.

**२) स्वप्नरचनातंत्र आणि साहित्यकृतीचे रचनातंत्र**

स्वप्नाला विशिष्ट प्रकारचे रचना तंत्र लाभलेले असते. ते तीन प्रक्रियांमधून साकार होते.

**अ)** **संक्षेप प्रक्रिया-** सुप्त विचार प्रकट स्वप्नात संक्षिप्तपणे एकत्र केले जातात. विविध प्रकारचे अर्थ, भावसंदर्भ एकाच प्रतिमेत एकवटून टाकणाऱ्या स्वप्नामागील मानसिक प्रक्रियेला संक्षेप प्रक्रिया म्हणतात. संक्षेपिकरणात सुप्त विचार चित्रलिपीत एकत्रित होताना अनेक घटक एकत्र होतात, बेमालूमपणे मिसळतात.

**ब)** **स्थानांतर -** सुप्त विचार बाजूला सारून किंवा स्वप्नातील मुख्यार्थ झाकून ठेवून लक्ष दुसरीकडे वळविणे म्हणजे स्थानांतरण होय. प्रकट स्वप्न प्रस्तुत केंद्राला बाजूला सारून अप्रस्तुत केंद्राला पुढे करते तेव्हा स्थानांतरण होते.

**क)** **प्रतिमांकन** - मनातील सुप्त विचारांचे प्रतिमांत रूपांतर म्हणजे प्रतिमांकन होय. स्वप्नात प्रतिमा चित्ररूप असतात तर साहित्यकृतीमध्ये शब्दरूप असते.

**ड)** **अतार्किकता / असंबद्धता -** प्रतिमा परस्पर संबंधाने गुंफलेले असतात. त्या असंबद्ध असतात.

**इ)** **स्वप्नवंताची असंज्ञ इच्छा -** स्वप्नवंताची असंज्ञ इच्छा विशिष्ट रीतीने पूर्ण होत असते.

**साहित्यकृती रचना तंत्र-**

साहित्यातही ही संक्षेपप्रक्रिया ही साधर्म्यावर आधारित असते. म्हणून तीत रूपक प्रक्रियाही अंतर्भूत असते. तर साहित्यात होणारे स्थानांतर ही साचर्याच्या तत्वावर आधारलेली आहे. तीत शुद्ध लक्षणा अंतर्भूत आहे. रूपक आणि लक्षणा हे भाषेचे विशेषतः काव्य भाषेचे मुल गुणधर्म आहेत.

**प्रतिमांकन -** ऐंद्रीय संवेदना प्रकट करण्याची प्रतिमासृष्टी ही एक प्रभावी भाषिक योजना आहे. प्रतिमा/ प्रतिमांकन हे बोधन क्रियेच्या म्हणजे भाषेच्या अंत:स्तराच्या सर्वात सुरुवातीच्या मनस्थितीत होते. तसेच अबोध मनाची क्रिया भाषेचे स्तरावर पकडण्याचे कौशल्य प्रतिमांमधून होते.

बोधनाचा ताजेपणा आणि टवटवीतपणा प्रतिमांमधील अर्थसंमिश्रामुळेआणि अकृत्रिम अर्थप्रतीतीमुळे व्यक्त होत राहतो.

**अतार्किकता -** ऐंद्रीय संवेदनाच्या प्राबल्यामुळे प्रतिमा भाषेला नेहमी अतार्किक अमूर्त अर्थाची डूब देतात. सहाजिकच तिथे अतार्किकता असते.

असंज्ञ- अर्थबंध - साहित्यकृतीतील असंज्ञ अर्थबंध कला रुप धारण करून विशिष्ट रीतीने साकार होतात.

**३) स्वप्नभाषा व साहित्यभाषा**

स्वप्नांची भाषा म्हणजे संक्षिप्त चित्रलिपीची भाषा असते, तर साहित्याची भाषा ही शब्दरूप किंवा वर्णलिपि असते.

स्वप्नांची भाषाही प्रतीक, प्रतिमांची भाषा असते. तसेच साहित्याची भाषा ही प्रतीक-प्रतिमांची असते. तसेच फॅन्टसी, मिथ्, स्वप्ने यांचा वापर केलेला असतो. साहित्य भाषेवर तत् चा प्रभाव आढळतो.

- स्वप्नांच्या भाषेत असंबद्ध प्रतिमा असतात.
  तसेच साहित्याच्या भाषेत असंबद्ध प्रतिमा असलेल्या दिसतात.
- स्वप्नांच्या भाषेत तर्कनिष्ठ कार्यकारणभावाचा अभाव असतो. तसेच व्याकरणिक नियमांचे उल्लंघन झालेले असते.

  साहित्याच्या भाषेतही तर्कनिष्ठ कार्यकारण भावाचा अभाव असतो.
- स्वप्नांच्या भाषेत रित्या जागा वा रिक्त जागा खूप असतात. तसेच साहित्याच्या भाषेतही रिकाम्या जागा असतात.
- स्वप्नांच्या भाषेत पण, परंतु, जर, तर या उभयान्वयी अव्ययांचा हा भाव असतो. साहित्याच्या भाषेतही पण, परंतु, वर इ. शब्दयोगी व उभयान्वयी अव्ययांचा अभाव असतो.
- स्वप्नांच्या भाषेत अर्थाची अनिश्चितता किंवा अनेकार्थता असते.
  साहित्याच्या भाषेतही अनेकार्थता असते. अर्थाच्या अनेक शक्यता दडलेल्या असतात.

**४) स्वप्नार्थ निर्णयन पद्धती - साहित्यकृती अर्थनिर्णयन पद्धती-**

- स्वप्नही सहिता मानून (Text) स्वप्नांचा अर्थ लावला जातो.
  तर साहित्यकृती ही शब्द संहिता (Text) मानून साहित्यकृतीचा अर्थ लावला जातो.

- स्वप्नसंहितेपेक्षा स्वप्नवंताला अधिक महत्त्व ( स्वप्नात) असते.
  तर लेखकापेक्षा साहित्यसंहितेला (साहित्यप्रांतात) अधिक महत्त्व असते.

- स्वप्नांमधून साकार झालेल्या स्वप्नवंताच्या असंज्ञ व अतृप्त इच्छेचा शोध घेणेसाठी स्वप्न हे माध्यम असते.
  साहित्यकृतींमधून प्रकट होणाऱ्या 'असंज्ञ अर्थबंधाचा' शोध घेणे हा असंज्ञ अर्थबंध लेखकाच्या ' मनात' गवसत नाही. साहित्यकृती हे त्याचे साधन नाही.

- स्वप्नांचा अर्थ लावताना मुक्त साहचर्य 'Free Association' तंत्राचा अवलंब केला जातो.

- साहित्यकृतीचा अर्थ लावताना मुक्त साहचर्य तंत्राचा अवलंब केला जातो. तसेच संबंधित प्रतिक सृष्टी, साहित्य संकेत, सांस्कृतिक भावविश्व आदी संकेत व्यवस्थांचा अर्थनिर्णयनात आश्रय घ्यावा लागतो.

- स्वप्नांचे निर्णयन करताना प्रकट आशियातून सुप्त विचारांचा शोध घेणे हे ध्येय असते म्हणून प्रकट आशय हे साधन असते. त्यामुळे प्रकट आशयाला महत्त्व प्राप्त होते.

- साहित्यकृतीचे अर्थ निर्णयन करताना प्रकट आशय व सुप्त विचार या दोन्ही अंगांमधील देवघेव महत्त्वाची असते.

- रचनांचे अर्थ निर्णयन करताना स्वप्न, स्वप्न विश्लेषक हे महत्त्वाचे साहित्यकृतीच्या अर्थनिर्णयनात लेखक, साहित्यकृती व वाचक/ रसिक महत्त्वाचे असतात.

एकंदरीत मानसशास्त्रीय समीक्षा साहित्यकृतीचे स्वरूप पाहते. तीमधील भावविश्व, आशयसूत्र असंज्ञ अर्थस्तर यांचाही ही शोध घेते.

साहित्यकृतीचं भावविश्व, पात्रांचे मनोव्यापार, साहित्यकृती मधील प्रतिमा- प्रतीक, तिचा रचनाबंध, साहित्यकृतीची भाषा यांच्या आकलनास ते उपयुक्त होते. तसेच त्याचा अर्थ लावण्यासही ते उपयोगी पडते. अर्थनिर्णयनाच्या व्यापाराशिवाय समीक्षेचा व्यापार पूर्ण होत नाही.

## १.४ आ. साहित्य भाषेचे विशेष व शैलीविचार

**साहित्यभाषेचे विशेष-**

साहित्यकृतीमध्ये साहित्यभाषेची काही ठळक वैशिष्ट्ये आपल्या अनुभवास येतात. मुळात भाषेला कोणत्यातरी साहित्यप्रकारचा संदर्भ असतो. त्यामुळे साहित्य भाषेतील कोणकोणत्या घटकांची कशाप्रकारे जुळणी करायची ते ठरवता येते. भाषाही साहित्यकृतीच्या संहितेत आंतरिक दृष्ट्या जोडलेली असते. त्यामुळे प्रत्येक भाषिक रूप अन्य रूपांशी व संपूर्ण संहितेशी काही एक नाते दाखवत असते. त्या-त्या भाषिक रुपानं त्या त्या संहीतेतच अर्थ प्राप्त होतो. अमुक एक शब्द वा भाषिक प्रयोग, अलंकार, प्रतिमा वा प्रतीक हे स्वतंत्रपणे महत्त्वाचे ठरत नाहीत.

साहित्य भाषेत व्यामिश्रता आणण्याचे, ती अर्थ समृद्ध, अनेकार्थ सूचक करण्याचे कार्य साहित्य भाषेत प्रकर्षाने आढळणाऱ्या काही भाषिक प्रयोगांद्वारे होत असते. हे भाषिक प्रयोग म्हणजे प्रतिमा, प्रतीक, रूपक, मिथ् होत. साहित्य भाषा समृद्ध करणारे हे विशेष सर्व साहित्यप्रकारांत कमी अधिक प्रमाणात आढळतात. कवितेत मात्र विशेष प्राचुर्याने दिसून येतात.

### १.४.१ रूपक

भाषेच्या एका खास अर्थ प्रवाही योजनेच्या वृत्तीला रूपक प्रक्रिया म्हटले जाते. एका वस्तूचे गुणधर्म किंवा स्वरूप दुसऱ्या वस्तूशी जोडले की रूपक निर्मिती होते. रूपक हा दोन शब्दांमधील (वा शब्दघटकांमधील) एकजीव असा संबंध आहे. या संबंधांमध्ये एका शब्दाचा (म्हणजेच त्या शब्दांनी निर्देशित केलेला विचार, कल्पना, प्रतीक, प्रतिमा यांचा) दुसऱ्या एका वा अनेक शब्दांशी (म्हणजेच त्यांनी निर्देशित केलेले विचार, कल्पना, प्रतिमा व प्रतिके यांच्याशी) संयोग होतो. या परस्पर संयोगामुळे हा शब्दसंबंध ठसठशीतपणा, व्यामिश्रता, अर्थविस्तार या दृष्टीने समृद्ध होतो. असा शब्द संबंध म्हणजे रूपक होय. हा संबंध साधर्म्य, विरोध, ताण, तादात्म्य, सानिध्य असा विविध प्रकारचा असू शकतो.

रुपकाचे उदा.

***काटेरी त्या हृदयावरती***

***हृदयाचे या फुल जागविले, जपले, जागविले.***

किंवा -

***अणुरेणू या तोकडा, तुका आकाशाएवढा,***

हे रूपक उदा. आहे.

रुपकीकरणामुळे अनेकविध अर्थ निर्माण होतात.

रुपके ही काव्यात, साहित्यात जशी आढळतात, तशी ती व्यवहारभाषेत पहावयास मिळतात. उदा. 'तो गाढव आहे'. 'तो बैलासारखा राबला'.

साहित्यात काहीवेळा सांकेतिक, रुळलेली अशी रूपके वापरलेली असली, तरी चांगल्या साहित्यकृतीच्या बाबतीत ती रूपके नवा अर्थ धारण करतात.

नवनिर्मिती, स्वचेतनता हा साहित्यकृतीतील रूपकांचा गुणधर्म आहे. साहित्याच्या क्षेत्रातील रूपके ही मुख्यत्वे व्यक्तिनिष्ठ स्वरूपाची, लेखकाच्या आंतरिक जीवनाशी नाते सांगणारी असतात. रूपकांचे स्वरूप हे त्या त्या भाषेच्या, कालखंडाच्या, स्थळांच्या, सांस्कृतिक वैशिष्ट्यांच्या आणि जीवनदृष्टीच्या अनुसार बदलते. बहुतेक रुपकांमध्ये साम्यक्रिया व्यक्त होते. काही रुपकांमध्ये ऐंद्रीय संवेदनांचे अनाकलनीय संघटन प्रतीत होते.

आपल्या धार्मिक काव्यात रुपकाद्वारे परमेश्वराचे अचेतन वस्तूंशी, प्रकृतीचे पुरुषांशी, जीवाचे सृष्टीशी नाना तऱ्हांनी संबंध व्यक्त केलेले दिसतात. अर्थ व्यक्त करण्याची रुपक ही मानवी संदेशवहनातील एक महत्त्वाची योजना मानली जाते.

## १.४.२ प्रतिमा

ऐंद्रीय संवेदना प्रकट करण्याची प्रतिमासृष्टी ही एक प्रभावी भाषिक योजना आहे. प्रतिमा म्हणजे चित्र, मूर्ती किंवा प्रतिबिंब होय. आपण जेव्हा एखादी वस्तू पाहतो, तेव्हा आपल्याला तिचे इंद्रियगोचर स्वरूप जाणवते. परंतु ती वस्तू डोळ्यासमोर नसताना तिच्या रंगरूपाचे चित्र मन:चक्षू समोर आणू शकतो. आपल्या मनोचक्षूसमोर येणाऱ्या चित्राला मनोविज्ञानामध्ये 'प्रतिमा' म्हटले जाते.. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर भूतकालीन संवेदनेची वा इंद्रियगोचर अनुभूतीची स्मृती, मानसिक प्रतिकृती म्हणजे ' प्रतिमा' होय.

साहित्याच्या क्षेत्रात 'प्रतिमा' या संज्ञेच्या वरील अर्थच्छटा काही प्रमाणात पहावयास मिळतात. लेखकाच्या जीवनाभूतीचा विशिष्ट भाषिक रूपबंधाच्या सहाय्याने ऐंद्रीय स्वरूपात प्रत्यय दिला जातो, तेव्हा त्या भाषिक रूपबंधाला प्रतिमा असे म्हणतात. भाषिक रूपबंधातून संवेदनाची निर्मिती करणे, ऐंद्रीय संवेदना व्यक्त करणे प्रतिमेत महत्त्वाचे ठरते.

इंग्रजी समीक्षेमध्ये वापरल्या जाणाऱ्या 'Image' साठी मराठी पर्याय म्हणून ' प्रतिमा' ही संज्ञा समीक्षेत वापरली जाते. ती दोन अर्थांनी -

१. भाषेच्या परिणामामुळे वाचकांच्या मनात निर्माण होणारी संवेदनाचित्रे म्हणजे प्रतिमा. वस्तूचे तंतोतंत वर्णन करणारा शब्दसमूह त्या वस्तूचे वाचकाच्या मनात चित्र उमटवू शकतो. याला वाच्यार्थी प्रतिमा म्हणतात.

२. काव्यात येणारे उपमा, रूपक यासारखे अलंकार म्हणजे ही प्रतिमाच असतात. परंतु इथे वाचकाच्या मनात उमटणाऱ्या संवेदनचित्राला महत्व नसून दोन वस्तू अगर घटना यांच्यामधील साधर्म्याला महत्व असते.

'इंद्रियगोचरता' हा प्रतिमेचा प्रधान गुणधर्म आहे.

उदा. क्षितिजी आले भरते ग
घनांत कुंकुम खिरतें
झाले अंबर
झुलते झुंबर
हवेत अत्तर तरते ग

प्रतिमांमधून अंतर्मनाचे, अबोधस्तरावरील व्यापार प्रभावीपणे व्यक्त होतात. प्रतिमांमध्ये अबोधमनाची क्रिया भाषेच्या स्तरावर' पकडण्याचे कौशल्य दिसून येते. अबोध मनाशी संबंधित असल्यामुळे प्रतिमा या अधिक गुंतागुंतीच्या व व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या असतात. अतार्किक अर्थाचा, आदिम संवेदनपर अशा अर्थाचा अविष्कार त्यातून होत असतो. ताजेपणा, उत्कटता, आवाहकत्व हे प्रतिमेचे आणखी काही गुणधर्म आहेत.

आपल्याला पाच प्रकारच्या इंद्रिय संवेदना होतात. त्या प्रकारांवरून प्रतिमांचे दृकप्रतिमा, गंधप्रतिमा, स्पर्शप्रतिमा, श्रुतीप्रतिमा, रसात्मक प्रतिमा असे प्रकार केले जातात. शिवाय उत्कट प्रतिमा, गतिशील प्रतिमा, बद्ध प्रतिमा, मुक्त प्रतिमा असेही प्रतिमांचे प्रकार केले जातात.

प्रतिमाही ऐंद्रिय संवेदनांचा मानस प्रत्यय घडवते तसेच प्रतिमेत अनेक अनुभव संवेदनेच्या किंवा भावनेच्या साधर्म्य- वैधर्म्ययुक्त नात्याने संक्लिष्ट झालेले असतात.

आधुनिक काव्यात वा काव्यशास्त्रांमध्ये एखाद्या घटनेचे वा दृश्याचे सूचक वर्णन तसेच उपमा-रूपकादी अलंकार या सर्वांना ' प्रतिमा' या संकल्पनेत समाविष्ट केलेले आहे. त्यामुळे निरंलकृत कविता तिच्यातील सूचक चित्रणामुळे प्रतिमायुक्त मानली जाते.

### १.४.३ प्रतीक

'प्रतीक' ही संकल्पना चिन्हे आणि त्याचा अर्थ यांच्याशी संबंधित आहे. कोणत्याही चिन्हाला सांकेतिक वापरामधून रूढ व निश्चित झालेला असा एक अर्थ असतो. पण या चिन्ह आणि अर्थ मधील 'द्वैत' हे प्रतीकामध्ये उघडपणे गृहीत धरलेले असते. व्यापक अर्थाने दुसऱ्या गोष्टीचे निर्देशन वा प्रतिनिधित्व करणारी कोणतीही गोष्ट म्हणजे प्रतीक होय. सामान्यत: साहित्याच्या क्षेत्रात कोणत्या तरी विशिष्ट अर्थाचे सूचन करणारा एखादा शब्द वा शब्दसमूह जेव्हा त्याच्या पलिकडील कोणत्या तरी अन्य गोष्टीचे निर्देशन करतो, तेव्हा त्याला प्रतीक असे म्हटले जाते. या अन्य गोष्टी वस्तू, विचार, कल्पना, अनुभव, भावना, घटना अशा कोणत्याही प्रकारच्या असू शकतात. प्रतीक हे एक चिन्ह म्हणतो तेव्हा निर्देशित केलेली गोष्टी जवळपास उपस्थित असण्याची गरज नाही. तिचा त्याशिवाय विचार करू शकतो. आधुनिक काळात प्रतीकांचे खाजगीकरण करण्याकडे कवी/ साहित्यिक यांचा कल दिसतो. जुन्या मराठीत प्रतीकांचे

सामाजिक, पंथीय स्वरूप असे. आधुनिक काळात निरनिराळ्या सामाजिक क्षेत्रामध्ये प्रतीके शोधण्याची वृत्ती दिसून येते.

जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रतीकांचा वापर केला जातो. तर्कशास्त्र, गणित अशा ज्ञानशाखांमध्ये तसेच धर्म, कला- साहित्य इत्यादींमध्ये प्रतीकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. ज्ञान शाखांमधील प्रतीके ही एकास एक स्वरूपाची असतात तर धर्म, कला, साहित्यक्षेत्रातील प्रतीके ही एकास एक स्वरूपाची नसतात. कला- साहित्यातील प्रतीके ऐंद्रिय स्वरूपाची असल्यामुळे ती स्वतंत्रपणे स्वतःकडे लक्ष वेधून घेतात.

आधुनिक कलांच्या क्षेत्रात प्रतीकांचा उपयोग व्यक्तिनिष्ठ रीतीने केला जातो. तसाच काव्यातही प्रतीकांचा व्यक्तिनिष्ठ वापर पहावयास मिळतो.

जीवनाची विविधस्वरूपी जाण देण्याची, नाविन्यपूर्ण अर्थाचे सूचन करण्याची क्षमता भाषिक प्रतिकांमध्ये असते. काही प्रतिकांमध्ये अर्थाची गुंतागुंत फारशी नसते. उदा. कुसुमाग्रजांची आगगाडी व जमीन ही प्रतीके. पण काही प्रतिकांमध्ये जीवनाची गूढता, गहनता व्यामिश्र अशा रुपबंधातून व्यक्त केली जाते. उदा. बालकवींचे ‘ पारवा’ हे प्रतीक.

प्रतिकांमध्ये व्यक्त होणारा अर्थ हा त्या काळातील एकूणच संस्कृतीशी, सांस्कृतिक संचिताशी निगडित असतो. त्या संस्कृतीतील अनेक व सूक्ष्म अर्थघटकांचे सूचन या प्रतीकातून होत असते. उदा. नंदिबैल, समिधा, वटवृक्ष यासारखी प्रतीके ही खास मराठी प्रतीके आहेत. काही साहित्यिक प्रतीके ही सर्वव्यापी स्थळकालातीत मानवी अनुभवाशी निगडित झालेली असतात. त्यामुळे त्यांचे स्वरूप अनुभवाच्या आदिबंधासारखे असते. अशा प्रतीकांमधून मिथके निर्माण होतात.

### १.४.४ मिथ

‘मिथ’ या इंग्रजी संज्ञेसाठी मराठीत मिथ्यकथा, प्राक् कथा वा दिव्यकथा दैवतकथा अशा संज्ञा रूढ आहेत. अशा सर्व संज्ञातून मिथकात अनुस्यूत असलेली कथात्मकता ठसठशीतपणे व्यक्त होते.

प्राचीन काळापासून चालत आलेल्या एखाद्या कथेतून वा कथासमूहातून मानवी व अतिमानवी अस्तित्वाच्या काही तलस्पर्शी पैलूंचे सूचक प्रतीकाद्वारे जेव्हा आविष्करण केले जाते, तेव्हा त्या कथेला वा कथासमूहाला मिथ असे म्हटले जाते. मिथकाच्या विविध व परस्पर विरोधी व्याख्या दिल्या जातात, उदा. मिथक म्हणजे ऐतिहासिक घटितांचे कथन करणारी गोष्ट होय.

मिथके ही निसर्गाचे, निसर्गघटिताचे स्पष्टीकरण देण्यासाठी निर्माण झाल्याची शक्यता आहे. सूर्य, विश्व, आकाश, मृत्यूतेर जीवन हे मिथकांचे संपन्न मुलस्त्रोत असल्याचे मानले जाते. दुसरीकडे इतिहास व विज्ञान यांचा आधार नसलेली, निसर्गघटना, ऐतिहासिक घटना, देवांच्या

वा वीरनायकांच्या कृती इत्यादीच्या लोककल्पना ग्रंथित करणारी कथा अशीही मिथची व्याख्या केली जाते. तसेच अनैतिहासिक वा अतिमानवी प्राण्याची किंवा अस्तित्वाची कथा म्हणजे मिथ होय.

मुळात पौराणिक, धार्मिक, लोकविधा अशा प्राचीन कहाण्यांसाठी म्हणजे परंपरेन सार्वत्रिक करून टाकलेल्या कथांच्या घाटासाठीही मिथ् किंवा प्राक् कथा ही संज्ञा वापरली जाते.

मिथ् बुद्धिविरोधी, तर्क विरोधी असतात तशाच त्या अंत:स्फूर्त असतात. त्यांचे नाते सर्जनशीलतेशी पर्यायाने काव्याशी, धर्माशी असते. मानवी जीवनाचे आदिम रूपबंध मिथमधून प्रतीत होत असतात. त्यामुळे मिथ् ला वैश्विक व कालातीत स्वरूप प्राप्त होते. भारतीय परंपरेतील राधाकृष्णाची मिथ्, राजा हरिश्चंद्राची मिथ् या व्यामिश्र असा जीवनानुभव व्यक्त करतात.

मिथ या साहित्य क्षेत्राबरोबरीने धर्म, संस्कृती अशा क्षेत्रातही मिथ् चा प्रभावी वापर होत असतो. मिथमधून मानवी जीवनातील अनेकविध मूलभूत गोष्टींचा, संबंधांचा, विश्वरचनेचा शोध घेण्याचा, अर्थ लावण्याचा वा संगती लावण्याचा प्रयत्न केलेला असतो.

मिथचा करता हा व्यनाम असतो. ती समूहनिष्ठ असते. मिथ मधून जी जी जीवनाची संगती लावलेली असते, त्यातून समाजाला त्या त्या या काळाला अनुरूप अशी नैतिक दृष्टी, मर्मदृष्टी प्राप्त होत असते.  मिथ्य मानवी जीवनाला आकार देतात. साहित्यकृतीतून होणाऱ्या मिथ्यच्या वापरातून तिच्यामधील आशयाला अनेकविध गुंतागुंतीची परिमाणे लागतात. तसेच तिच्या घाटावरही त्या परिणाम करत असतात.

### १.४.५ समांतरता

शैली विचारात विचलन या संकल्पने बरोबर 'समांतरता' ही संज्ञा वापरली जाते. विचलनात भाषेच्या नियमांचे उल्लंघन अभिप्रेत आहे. तर 'समांतरतेत' नियमितता महत्त्वाची असते. अतिनियमितता ही समांतरतेत असते. ही नियमितता वर्णाची अथवा उपवाक्यांची असते. संहितेचा वेगवेगळ्या स्तरांवर पुन्हा पुन्हा येणाऱ्या समान संरचनाचा एक आकृतिबंध म्हणून विचार करता येतो.  ध्वनीच्या समांतरतेची उदाहरणे ही छंदोबद्ध अथवा वृत्तबद्ध रचनेत सापडतात. अनुप्रास या अलंकारात वर्णाची पुनरावृत्ती होते. शैली विचारात समांतरता ही अभिव्यक्तीच्या निकडीतून सहेतुक आणि सहजपणे आलेली असते.  ध्वनी, पदीम, शब्द, पदबंध, वाक्य, वाक्यबंध इत्यादि स्तरांवर ही समांतरता आढळते.

उदा.   पाण्याची वाट मागून घे
रानाची कांबळ पांघरून घे

माझ्या हाताच्या बोटात तुझी
सलोखी बोटं ओवून घे

या कडव्यातील चरण-१, २ आणि ४ मध्ये समांतरता आढळते.

भाषिक नियम व्यवस्थेच्या चार पातळ्या आहेत. १) ध्वनी २) शब्द ३) वाक्य ४) अर्थ. या चारही पातळ्यांवर वर विचनलन, नियमोल्लंघन आवृत्ती याबरोबरच समांतरता होते. या समांतरतेचे स्वरूप वरील चारही पातळ्यांवर पाहता येते.

**i) ध्वनी –**

साहित्याच्या भाषेत 'ध्वनी' या पातळीवर विश्लेषण करताना नाद व लय या दोन संकल्पना विचारात घ्याव्या लागतात. साहित्यात विशेषतः काव्य आणि नाटक या प्रकारात ध्वनींना विशेष महत्त्व असते. कारण या दोन्ही गोष्टी प्रगट वाचन अथवा प्रयोग सापेक्ष आहेत. ध्वनींचा सहेतुक वापर केला जातो.

उदा. आनंदाचे डोही आनंद तरंग।
आनंद चि अंग आनंदाचे ॥

या दोन्ही काव्यपंक्तीमधील 'आनंद' व अंग या वर्णाची ठराविक अंतराने पुनरावृत्ती झालेली आहे. वर्णावृत्तीमुळे काव्यपंक्तीत अनुप्रास व यमक हे नादसाम्यावर आधारलेले नादालंकार ( शब्दांकार) व समांतरता साधल्या गेल्या आहेत.

**ii) शब्द -**

साहित्याची भाषा ही सर्वसामान्य भाषेहुन निराळी असते. साहित्य भाषेत शब्द खास असतात. काव्य भाषेतील शब्दकळा ही वेगळी असते. कवी, साहित्यिक अभिव्यक्तीच्या निवडीतून नवे नवे शब्द घडवतो. उदा. केशवसुतांची 'झपूर्झा' कविता.

काव्यात एक अक्षर हे त्याच शब्दक्रम व्यवस्थेतील दुसऱ्या अक्षराशी बरोबरीचे नाते जोडीत असते. एका शब्दावरील आघात हा दुसऱ्या शब्दाच्या आघाताशी बरोबरीचे नाते जोडीत असतो. एक छंदोबंद चरणखंड दुसऱ्या चरणखंडा बरोबर बरोबरीचे नाते जोडीत असतो. तेव्हा तिथे समांतरता साधल्या जातात.

उदा. अंतर सुंदर बाहिर सुंदर, ते पथ सुंदर पाही मना।
सुख होय मना

शब्दांच्या क्रमव्यवस्थेत साधर्म्य वा वैधर्म्य यावर आधारलेले बरोबरीचे रूपकतत्व गुंफले की शब्द उक्ती सौंदर्यात्म वा काव्यात्म कार्य करू लागते.

**iii) वाक्य –**

मराठीत कर्तृनाम- कर्मनाम- क्रियाविशेषण- क्रियापद अशा क्रमाने वाक्य रचना केली जाते. पण ही रचना करताना भाषिक रचनेची दोन मूलभूत तत्त्वे विचारात घ्यावी लागतात.

१. भाषेच्या शब्दसंग्रहातून शब्दांची निवड करणे

२. निवडलेल्या शब्दांची वाक्यात जुळणी करणे.

समजा - वक्त्याला ' मुला' विषयी बोलायचे आहे किंवा ' मुल' हाच वर्ण्य विषय आहे. अशावेळी वक्त्यासमोर मूल, बालक, बाळ, तान्हुले असे समानार्थी शब्द उभे असतात. ही सर्व नामे आहेत. हा नामवाचक शब्दांचा संच साधर्म्याच्या तत्वाधारे एकत्रित आलेला आहे. या शब्दसंचातून वक्ता 'मूल' या शब्दाची कर्तृनाम म्हणून निवड करतो. तसेच त्याच्या समोर ( वक्ता) खाते, पिते, निजते असे क्रियावाचक शब्द उभे राहतात. ही सर्व क्रियापदे हा शब्दसंच साधर्म्य वा सममूल्यतेच्या या आधारे गुंफलेला आहे. या शब्दसंचातून वक्ता ' निजते' क्रियापदाची निवड करतो. 'मूल' आणि ' निजते' या दोन्ही शब्दांची वाक्यात क्रमपर जुळणी करतो. निवड आणि जोडणी या तत्त्वांच्या आधारे 'मूल निजते' हे वाक्य रचले जाते.

वाक्य रचनेत शब्दांची निवड साधर्म्य, वा समतुल्यतेच्या तत्त्वानुसार केली जाते. तर वाक्यगत शब्दांची जुळणी सान्निध्याच्या तत्वानुसार केली जाते. सममूल्यतेच्या संकल्पनेत साधर्म्य वा वैधर्म्य, समानअर्थ, विरुद्धार्थ यांचा अंतर्भाव केला जातो. एकूणच या मधून समांतरता साधली जाते.

**iv) अर्थ-**

नादस्तराप्रमाणे अर्थाच्या स्तरावर सममूल्यतेचे तत्त्व हे काव्यात्मककार्य करते. "आनंदाचे डोही आनंद तरंग" या काव्य पंक्तीतील आनंद, डोह, तरंग आणि "आनंद चि अंग आनंदाचे" या पंक्तीतील 'अंग' ही भिन्न भिन्न अर्थाची नाम पदे आहेत. पण प्रत्येक नामाला आनंद समानार्थी भाववाचक विशेषण लावले आहे. त्यामुळे डोही, तरंग, आनंद आणि अंग ही भिन्नार्थी नामपदे 'आनंद' या एकाच समान अर्थाने निर्भर निर्द्वंद्व होतात. चारही पदांमध्ये साधर्म्य मूल संबंध आहेत. ' आनंदाचे डोही', ' आनंदाचे अंग' या विशेषण-विशेष्याच्या जोड्याही ' आनंद' या एकाच भावाने जोडलेल्या आहेत.

अशाप्रकारे नादाच्या, अर्थाच्या स्तरावर शब्दाच्या आडव्या क्रमनिष्ठ रचनेत साधर्म्यामुळे सममूल्यतेचे रूपकतत्व गुंफले जाते. या भाषेच्या समांतरतेचे तत्व असते हे निश्चित आहे.

## १.५ शैली विचार

साहित्यव्यवहारात शैली ही संज्ञा अनेक अर्थानी वापरली जाते. भाषाशैली असा संज्ञेचा अर्थ प्रामुख्याने घेतला जातो. एखाद्या विशिष्ट वाङ्मय प्रकाराचे लक्षण या अर्थाने काव्यात्मक शैली, नाट्यमय शैली असे शब्दप्रयोग केले जातात. तसेच यादवकालीन शैली, शिवकालीन शैली असे शब्दप्रयोग केले जातात. शाहिरी शैली, पंडिती शैली, महानुभाव शैली अशा शब्दप्रयोगात अनेक समधर्मी साहित्यिकांच्या संप्रदायानी रूढ केलेली शब्दकळा अभिप्रेत असते. जुनी शैली, आधुनिक शैली या प्रयोगात शैलीला काळाचे संदर्भ असतात. प्रचलित साहित्य व्यवहारात शैलीला नानाविध अर्थ प्राप्त झालेले दिसतात.

'शैली' ही संकल्पना साहित्य किंवा कला या क्षेत्रांपुरतीच मर्यादित नाही. शैली ही मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये वापरली जाते. कला, वास्तु, नगर रचना, गृहरचना, फर्निचर, अलंकार, भांडीकुंडी, वस्त्रप्रावरणे अशा विविध क्षेत्रांमध्ये 'शैली'ची संकल्पना प्रस्तुत ठरते. या क्षेत्राना देशकाल परिस्थिती, परंपरा, व्यक्तीची सर्जनशीलता इत्यादी घटकांमुळे वा त्यांच्या परस्पर संबंधांमुळे एक विशिष्ट रूप प्राप्त होते. हे विशिष्ट रूप म्हणजे त्या त्या क्षेत्रातील शैली म्हणता येईल.

**शैली संकल्पना -** शैली म्हणजे काय? या प्रश्नाचे नेमके, काटेकोर स्वरूपाचे उत्तर देणे अवघड आहे. शैलीला पर्याय म्हणून तऱ्हा, रीत, वळण, ढब, धाटणी, कौशल्य,वैशिष्ट्य, तंत्र असे काही शब्द वा संज्ञा वापरले जातात. पण या संज्ञा वर्णनात्मक स्वरूपाच्या आहेत. तर शैली ही संज्ञा मूल्यमापनात्मक आहे. शैलीही उस्फूर्तता, नाविन्य, लालित्य, व्यक्तिविशिष्टता अनन्यता अशा सर्जक गोष्टींशी संबंधित आहे.

१) शैली म्हणजे कलाकृतीतील आशय द्रव्याची रचना होय.

२) कलावंताची कल्पनानीय अनुभव घेण्याची पद्धती म्हणजे 'शैली' - स. शि. भावे

३) एखाद्या द्रव्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपात प्रगट करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे शैली. - भालचंद्र नेमाडे.

**शैली म्हणजे लेखकच - जॉर्ज ब्यूफोने.**

शैली ही संकल्पना खूप सर्वसाधारण असल्यामुळे खूप व्यामिश्र आहे. अनेक भाषा अभ्यासक व शैली अभ्यासक यांनी शैलीची व्याख्या करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काहीनी व्याख्यांमधील विरोधी तत्वे शोधली आहेत. तर काहींनी व्याख्यांमधून सर्वसाधारण तत्त्वे शोधण्यासाठी वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. शैली या संकल्पनेच्या असंख्य व्याख्या होण्याचे एक कारण म्हणजे शैली विचाराचा प्रत्येक अभ्यासक आपल्या अभ्यासाच्या कक्षेत शैलीच्या कुठल्या ना कुठल्या मुख्य सिद्धांताला धरून शैली या संकल्पनेची व्याख्या करतो. शैलीच्या प्रमुख सिद्धांतातील एक सिद्धांत द्वैती सिद्धांत. या

सिद्धांताचे प्रमुख तत्व आशय व अभिव्यक्ती यांतील भेद. आशय भाषा निरपेक्ष असतो. त्याला विशिष्ट स्थितीत विशिष्ट पद्धतीने भाषेचे आवरण घालता येते. हा प्रदीर्घ काळ चालत आलेला गैरसमज हे सिद्धांताचे फलित. परिणामतः हा शब्दकळेला महत्त्व प्राप्त होऊन वक्तृत्वपूर्ण लेखन शैली संपन्न मानले जाते.

आशय आणि अभिव्यक्ती यांच्या परिशीलनातून अर्थ विन्यासात्मक संबंध, घटितार्थशास्त्रीय संबंध सौंदर्यलक्षी संबंध स्पष्ट करणारे सिद्धांत उदयास आले. परिणामतः या विचारातून शैली विचार व लेखक व्यक्तिमत्व यांचा नैसर्गिकपणे संबंध जोडला गेला. यामुळे शैली विचारात ‘ निवड’ हे तत्व महत्वाचे ठरले. चैनी संबंधी सुट्या कल्पना स्वीकारून त्यांच्या आधारे शैलीगत अभ्यास करण्याचे प्रयत्न झाल्याचे वरील विवेचनावरून लक्षात येते. आपली शैलीची संकल्पना म्हणजे बहुतेक सर्व सुट्या सुट्या संकल्पनांचे एकत्रीकरण होय. असे रॉबर्ट अडॉल्फ याने म्हटले आहे.

शैलीच्या समग्र स्वरूपाचे ज्ञान किंवा आकलन न झाल्यामुळे अभ्यासकांसमोर अनेक अडचणी उभ्या राहतात. त्यामुळे ते एकेका तत्वाला धरून शैलीगत अभ्यास करतात.

शैली ही संकल्पना खूप संदिग्ध आहे. या संदिग्धतेमुळे शैली या संकल्पनेचा नीट शोध घेण्याचा प्रयत्न झाला आहे.

संज्ञापण पद्धतीच्या पायाभूत अवस्था लक्षात घेऊन शैली या संकल्पनेच्या व्याख्या करण्याचा मार्ग आहे. यामध्ये लेखकाचा दृष्टिकोण, संहितेची घटक वैशिष्ट्ये व वाचकांवर परिणाम हे घटक लक्षात घेतले जातात. वस्तुनिष्ठपणे पडताळ्याजोगी व व्यक्तिगत प्रभाव दाखवणारी शैली संबंधीची विधाने लक्षात घेऊन शैली या संकल्पनेच्या व्याख्या होतात. त्याशिवाय व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा संच, संहितांतर्गत वाक्यापेक्षा मोठ्या घटकांच्या परस्परसंबंधांचा विचार, सुलेखन यानुसार व्याख्या होतात.

शैली संकल्पना स्पष्ट करण्यासाठी शैली, शैली विज्ञान, शैलीगत विश्लेषण याबाबतचे अभ्यासकांचे दृष्टिकोण समजून घ्यावे लागतील. भाषिक संदेशन, समांतर- न्यास, पुरोभुमीकरन नियमोल्लंघन, सममूल्यता, द्वीपबंधन आदी सिद्धांत, दृष्टिकोण ( जे अभ्यासकांनी मांडले आहेत ते) विचारात घेतले तर शैली ची संकल्पना व स्वरूप स्पष्ट व्हायला मदत होईल.

वरील दृष्टिकोणांशीवाय अजूनही काही दृष्टिकोण आहेत. ते असे:-

- शैली म्हणजे आशयावरील वेष्टन.
- शैली म्हणजे अविष्काराच्या संभाव्य पर्यायाची पर्यायांतर्गत निवड
- शैली म्हणजे लेखकाच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांचा संच.
- शैली म्हणजे प्रमाणकापासून विपथन.

- शैली म्हणजे विशिष्ट काळातील शैली विशेषांचा संच
- वाक्यांतर्गत घटकांच्या परस्परसंबंधाच्या आणि वाक्यावाक्यातील संबंधांचा विचार म्हणजे शैली.

या दृष्टिकोणातून शैलीचे भान येते.

साहित्यकृतीतील शैलीचा प्रत्येक काही भाषिक रूपबंधातून येत असतो. कोणत्या प्रकारच्या भाषेच्या वापरातून हे भाषिक रूपबंध निर्माण केले जातात, ते शोधून साहित्यातील काही सर्वसामान्य वैशिष्ट्यांची, तत्वांची मांडणी शैली विचारात/ शैली विज्ञानात केली जाते. यातील मोजकी काही तत्वे म्हणजे निवड, नियमोल्लंघन, पुरोभुमीकरण, पुनरावृत्ती इत्यादी होत. निवडीचे तत्त्व म्हणजे लेखक भाषेतील ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ अशा सर्व स्तरांवरील अनेक पर्यायांपैकी विशिष्ट पर्यायाची निवड का करतो ते पाहिले जाते. लेखक- कवी विशिष्ट भाषिक रुपाची हेतुतः पुनरावृत्ती का करतो, ते पाहिले जाते. याखेरीज लोकभाषेपेक्षा साहित्य भाषेत अधिकत्व आणण्यासाठी ज्या अनेकविध स्वरूपाच्या तंत्रे, प्रयुक्त्या वापरले जातात त्यांची चर्चा केली जाते. शैली विज्ञानात सर्व तंत्र, तत्वं यांचा अभ्यास केला जातो. ही विविध शैली वैशिष्ट्ये प्रत्येक साहित्यकृतीत आढळतात. काही वेळा ती सारख्या प्रमाणात आढळत नाहीत.

साहित्यकृतीगत शैलीमध्ये अनेकविध घटकांची व संदर्भांची सेंद्रिय अशी गुंफण होत असते. ध्वनी, शब्द, वाक्य, अर्थ या विविधस्तरांवरील विविध घटक साहित्यकृतीत असतात. शैलीचा अभ्यास करताना अशा अनेकविध घटकांचा, त्यांच्या परस्पर संबंधांचा व एकूण साहित्यकृतीच्या संरचनेशी असलेल्या त्यांच्या संबंधाचा विचार केला जातो.

'शैली' या संकल्पनेचा साहित्याच्या संदर्भात कोणता अर्थ घेतला जातो याची आपण चर्चा केली. या शैलीची चर्चा जुन्या काळी केली गेली तसेच अलीकडच्या काळात केलेली आहे. त्यावरुन पारंपरिक शैली व आधुनिक शेती अशी झालेली चर्चा विचारात घेऊ.

**i) पारंपरिक शैली-**

पारंपरिक शैली विचार हा बाह्यांगाला प्राधान्य देणारा होता. शैली म्हणजे केवळ भाषाशैली, आशयावरचे अवगुंठण असे मानले जाते. या पारंपरिक शैली विचारात आशयनिरपेक्ष विचार करण्यावर भर होता. शैली म्हणजे लेखक हे सूत्र आशयनिरपेक्ष शैलीची कल्पना मांडणारे आहे.

पारंपरिक शैली विचाराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आदेशात्मक भूमिका होय. साहित्यातच आढळणारी ही शैली आत्मसात करण्यासाठी साहित्यिक परंपरेने, संकेत आणि सिद्ध झालेले तिचे नियम पूर्वसुरींनी दिलेल्या आदेशानुसार शिकावे लागतात. थोडक्यात पारंपरिक शैली विचार हा बाह्यांगप्रधान, आदर्शवादी व आदेशात्मक स्वरूपाचा होता असे दिसून येते.

पारंपरिक शैलीचे स्वरूप वर मांडलेल्या दृष्टिकोणातून स्पष्ट होण्यास मदत होईल.

### ii) आधुनिक शैली -

आधुनिक काळात भाषा विज्ञानातील नव्या नव्या सिद्धांतामुळे ' शैली' संबंधीच्या विचारात आमूलाग्र बदल झाले आहेत.

आधुनिक काळातील शैली विचारात बाह्यांग प्रधान, आदर्शवादी व आदेशात्मक भूमिका पूर्णपणे नाकारली आहे. आधुनिक शैली विचाराला भाषा विज्ञानाचा भक्कम पाया लावला आहे. शैली विचार हे आधुनिक भाषाविज्ञानाचे एक अंग मानले गेले आहे. ह्या शैली विचारात बाह्यांग हे गौण मानले आहे. येथे शैलीच्या रूपांतर्गत घटकांचा विचार महत्त्वाचा ठरला आहे.

शैलीच्या अभ्यासात साहित्यकृतीच्या संहितेतील भाषेचे वर्णन-विश्लेषण केले जाते. भाषाशास्त्रीय सिद्धांताच्या, संकल्पनांच्या आधारे संहितेतील भाषेचे ध्वनी, शब्द, वाक्य व अर्थ अशा सर्व स्तरावरील संरचना तपासणे, त्यातून शैलीची वस्तुनिष्ठ तत्वे शोधली जातात. संहितेतील भाषेला असलेले मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय, सौंदर्यशास्त्रीय असे अनेक संदर्भ पाहणे. शैलीच्या विविध परिणामांवरून संहितेतील भाषेचे विश्लेषण करणे आणि या सर्व विवेचनाच्या आधारे संहितेतील शैलीचे स्वरूप ठरविणे ही या शैली विचाराची महत्त्वाची अंगे मानता येतील. शैलीच्या या पद्धतशीर अभ्यासातून शैली विज्ञान निर्माण झाले आहे. आधुनिक शैली विज्ञान भाषिक विश्लेषणाचे कार्य करते त्याचबरोबर साहित्यकृतीच्या संहितेतील शैलीचे एकूण स्वरूप निश्चित करत असते.

**शैली गुणधर्म-** शैलीचा विचार करताना शैलीचे काही गुणधर्म समजून घेणे महत्त्वाचे ठरेल. साहित्यामधील शैलीचे स्वरूप सर्वसाधारणपणे भाषिक आकृतीबंधातून सापडते. ह्या आकृतीबंधाना घडवणारा भाषेचा वापर तपासता येतो. तसेच शैलीचे काही गुणधर्म मांडता येतात.

१. शैलीत भाषेचा वापर निवड ह्या स्वाभाविक मानवी प्रवृत्तीनुसार केलेला आढळतो. भाषेत अनेक पर्याय उपलब्ध असतात. तेव्हा विशिष्ट ध्वनी, शब्द, शब्दरचना, वाक्यरचना, व्याकरण विशेष हे लेखकाने का निवडले ह्याचा शोध घेतला तर 'निवड' हा शैलीचा महत्त्वाचा धर्म आहे.

२. रूढ अथवा आदर्श भाषा प्रयोगापेक्षा वेगळे भाषा प्रयोग करणे, भाषेच्या माध्यमात हेतुनिष्ठ मोडतोड करणे आणि व्यवहाराच्या भाषेला वळण देणे हा शैलीचा दुसरा धर्म आहे.

३. व्यवहार भाषेपेक्षा साहित्यिक भाषेत अधिकत्व आणणे व रुपाच्या संरचनेला भरून टाकने हा शैलीचा तिसरा धर्म आहे.

४. भाषा वैशिष्ट्यांना आवश्यक ते संदर्भ पुरविणे हा चौथा धर्म आहे.

५. विशिष्ट भाषिक रूपांची संहितेत हेतुपुरस्सर पुनरावृत्ती घडवून आणणे हा पाचवा गुणधर्म आहे.

'साहित्य' ही व्यामिश्र कला असल्यामुळे तिचे माध्यम भाषा हीसुद्धा वेगाने बदलत व विस्तारत असल्यामुळे व प्रतिभावंतांचे तिच्यावर दर पिढीत अनेकविध प्रयोग होत राहिल्यामुळे, तसेच रूपामध्ये अपूर्ववस्तूनिर्माणक्षमता वाढल्यामुळे शैलीचा व्यापार विस्तारला आहे.

शैली ही पृथक व सामुहिक अशा दोन्ही प्रकारे अभ्यासता येते. पृथक शैलीत साहित्यकृतीतील भाषिक रूपे किंवा एका लेखकाने आपल्या सर्व साहित्यकृतीमध्ये वापरलेली भाषिक रुपे अभ्यासासाठी एकत्रित घेतलेली असतात. तर सामूहिक शैलीत अनेक साहित्यकृतींचा गट किंवा लेखकांचा गट एकत्र विचारात घेऊन त्यांच्या एकत्रित भाषिक रूपांचा अभ्यास केला जातो.

- **साहित्यकृतीतील शैली विचार- तीन अंगे**

साहित्यकृतीतील शैली विचार हा तीन अंगानी करता येतो.

१. लेखकाच्या २. साहित्यकृतीच्या ३. वाचकांच्या

**i) लेखक –**

लेखकाच्या अंगाने केलेला शैलीचा विचार हा मनोविज्ञानाकडे झुकणारा आहे. तो मनोविज्ञानाचे एक उपांग बनतो. साहित्यबाह्य अशा साध्यांसाठी हा विचार एक साधन म्हणून केला जातो. साहजिकच साहित्यबाह्य अशा विशिष्ट संदर्भाचाही येथे आधार घेतला जातो. या दृष्टीकोनातून जो शैलीचा विचार केला जातो तू पूर्णपणे साधनात्मक स्वरूपाचा असतो.

**ii) साहित्यकृती-**

साहित्यकृतीच्या अंगाने म्हणजे साहित्यकृती मधील शैलीवैशिष्ट्यांचा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा अभ्यास करून जो विचार मांडला जातो, तो आधुनिक शैली विज्ञानात ग्राह्य मानला जातो. हा अभ्यास साधनात्मक स्वरूपाचा नसतो. कोणत्याही साहित्यबाह्य गोष्टींसाठी तो केला जात नाही. आधुनिक भाषा विज्ञानाने मांडलेल्या संकल्पना- सिद्धांताच्या तसेच विकसित केलेल्या पद्धतीच्या आधारे साहित्यकृतीच्या संहितेचे तपशीलवार व सूक्ष्म विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून विशिष्ट साहित्यकृतीत लेखकाने जे भाषिक रूपबंध निर्माण केले आहेत, ज्या भाषिक प्रयुक्त्या, तंत्रे वापरले आहेत त्याचे वर्णन केले जाते.

साहित्यकृतीचा अनुभव जसा पोकळीत येत नाही, त्याप्रमाणेच कोणत्याही साहित्यकृतीच्या शैलीचा अनुभवही पोकळीत घेता येत नाही. अनुभवांमध्ये समग्र भाषिक संदर्भ व साहित्यिक परंपरेचा संदर्भ असे अस्तित्वात असतात. त्यामुळे साहित्यकृतीमधील शैलीचा विचार करताना अनेक संदर्भांचे भान ठेवावे लागतात.

**iii) वाचक-**

वाचकाच्या अंगाने शैलीचा केलेला विचार हा पूर्णपणे साधनात्मक स्वरूपाचा असतो. वाचकाला साहित्यकृतीतील शैलीचा आलेल्या प्रत्यय, तिचा त्याच्या मनावर झालेला संस्कार या गोष्टी इथे महत्त्वाच्या ठरतात. या अंगाने झालेला विचार हा व्यक्तिगत स्वरूपाच्या प्रतिक्रिया या प्रकारचा असतो. त्यामुळे या विचारात वस्तुनिष्ठतेचे प्रमाण खूपच कमी असते. आधुनिक शैलीविचारात/ शैली विज्ञानात या व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या शैली विचारात स्थान नाही.

साहित्यकृतीच्या शैलीअभ्यासात विशिष्ट साहित्यकृतीचे भाषिक विश्लेषण हे त्या अभ्यासाचे केंद्र होय. विशिष्ट अशा साहित्यकृतीची शैली ही काही पोकळीत निर्माण होत नाही. साहित्यकृतीतील शैली ही त्या लेखकाच्या एकूण शैली स्वभावाचा एक भाग असते. लेखक-कवी हा विशिष्ट कालखंड, विशिष्ट संप्रदाय यांच्या पार्श्वभूमीवर लेखन करत असतो. त्यामुळे विशिष्ट साहित्यकृतीतील शैलीच्या अभ्यासात हे भान ठेवावे लागते. अभ्यासाच्या सोयीसाठी शैलीच्या अभ्यासाचे प्रकारही करता येतात. साहित्यकृतीची शैली, वैयक्तिक वा लेखकाची शैली, युगशैली व साहित्य प्रकाराची शैली हे होत. यातील साहित्यकृतीची शैली वैयक्तिक शैली व लेखक शैली यांना पृथक शैली म्हणता येईल, तर युगशैली व साहित्यप्रकाराची शैली यांना सामूहिक शैली म्हणता येईल.

- **साहित्यकृतीची शैली –**

  या प्रकारात एका विशिष्ट साहित्यकृतीतील भाषिक रूपांचा अभ्यास होतो. ज्यायोगे ह्या कृतीतील आशय, तिच्यातील पात्रे, जीवनदृष्टी, रूप यांना अनुकूल अशी भाषिक रूपे संहितेत संघटित केलेली असतात. ही भाषिक रूपे कशाप्रकारे संघटित केलेली आहेत ते इथे पाहिले जाते.

- **वैयक्तिक वा लेखकाची शैली –**

  एका लेखकाची वैयक्तिक शैली इतर कोणत्याही लेखकाच्या शैलीपेक्षा काही खास लकबींमुळे वेगळी ठरते याचा विचार असतो. प्रत्येक लेखकाची भाषिक प्रवृत्ती स्वतंत्र असते. त्याचे खास शब्द, खास वाङ्मय प्रकार आवडते असतात. छंद, यमकादी उपयोग ठरलेले असतात. लेखकाने वाङ्मय प्रकारही वेगवेगळे हाताळलेले असतात. वैयक्तिक शैली हे लेखकाचे स्वतःचे

भाषिक वर्तन असते. एकाच काळात व कालखंडात वावरलेल्या लेखकांमध्ये काही सामायिक भाषिक वापर आढळले तरी त्या वर्तुळातही प्रत्येकाचे स्वतंत्र विभाग दाखवता येतात. लेखकाच्या समान शैलीचा अभ्यास या प्रकारात अभिप्रेत असतो.

- **युगशैली-**

    विशिष्ट युगात जितके लेखक असतील त्या सर्वांच्या शैली समुच्चयाला सामावणारी अशी महाशैली म्हणून युगशैली कडे पाहता येते. विशिष्ट कालखंडातील साहित्यकृती, लेखक, संप्रदाय, साहित्यिक प्रवृत्ती यामध्ये आढळणाऱ्या समान भाषिक रूपबंधाचा अभ्यास या प्रकारात केला जातो. युगशैलीत त्या-त्या कालखंडातील, युगातील राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व एकूणच सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतिबिंब पडलेले असते.

    भाषिक समूहाची एकता, एकसंधता युगशैलीतून प्रकर्षाने प्रकट होते. समूहाच्या अंत:स्तरातील संवेदना, विचार एकत्रितपणे प्रक्षेपित करणारी ही युग शैली केवळ साहित्यपुरतीच नव्हे तर नैतिक, सामाजिक, धार्मिक जीवन मूल्ये, अन्य कलांचे घाट व गुणधर्म यांच्याशी सेंद्रियपणे जोडलेली असते.

- **साहित्यप्रकाराची शैली-**

    साहित्य प्रकार हा लेखक आणि वाचक यांच्यात आपोआप घडत येणारा करार असतो. ज्यायोगे परस्परांचे संबंध भाषेच्या संकेताच्या आधारे टिकून राहतात. लेखक व वाचक यांच्यामधील हा करार संहितेच्या मांडणी पासून तो भाषिक रूपांपर्यंत बारीक सारीक घटकांमध्ये पार पडत असतो. त्यामुळे गद्य आणि पद्य त्यांची रचना कशी असते हे वाचकांनी समजून घ्यावयाचे असते. तसेच लेखकाने साधारण लिहावयाचे असते. म्हणून साहित्य प्रकाराच्या शैलीच्या अभ्यासात विशिष्ट साहित्यप्रकारात भाषिक रूपांची संरचना कशा प्रकारे होते, त्यात कोणते समान गुण विशेष आढळतात यांचा अभ्यास अभिप्रेत असतो. प्रत्येक साहित्य प्रकाराच्या भाषिक संरचनेत भेद असतो. विशिष्ट भाषिक संकेत त्यात या प्रकाराशी निगडीत असतात. साहित्य प्रकारानुसार बदलत जाणाऱ्या या भाषिक रूपांचा, त्यांच्यातील परस्पर संबंधांचा विचार येथे अभिप्रेत असतो.

आधुनिक काळात शैलीचा अभ्यास अशा अंगानी व विविध पद्धतींनी केला जात आहे. मराठीमध्ये या प्रकारची समीक्षा अलीकडे होऊ लागली आहे.

**आपली प्रगती तपासा**

१) शैली म्हणजे काय? साहित्याच्या संदर्भात शैलीचा कसकसा विचार केला जातो?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------------------

## १.६ समारोप

शैली विज्ञानाच्या सर्व विवेचना मधून गद्यात काय किंवा पद्यात काय, शैली कशी असते याची एखादी सोपी, सुटसुटीत व्याख्या हाती लागत नाही. सोप्या सुटसुटीत व्याख्या व वर्णने वापरून साहित्यकृतीची समीक्षा करण्याचा काळ आता मागे पडलेला आहे. नव्या, अधिक व्यामिश्र स्वरूपाच्या संकल्पनांना आता समीक्षेने सामोरे जाण्याची गरज आहे.

साहित्याच्या शैलीचा विचार करताना आशयनिरपेक्ष, आदर्शवादी व आदेशात्मक असा पारंपरिक विचार अमान्य केला जातो. आधुनिक भाषाविज्ञानाने दिलेल्या मर्मदृष्टीच्या आधारे शैलीला असलेले सामाजिक, मानसशास्त्रीय इत्यादी विविध संदर्भ लक्षात घेत साहित्यकृतीतील भाषेच्या सर्व स्तरांवरील संरचना तपासल्या जातात. या पद्धतीने एक विशिष्ट साहित्यकृती, विशिष्ट लेखक, विशिष्ट साहित्यप्रकार आणि एखादे युग यांच्या शैलीचा विचार केला जातो.

## १.७ संदर्भ ग्रंथ

१. गाडगीळ स. रा. - काव्यशास्त्र प्रदीप, पुणे, व्हीनस प्रकाशन -२००३

२. धोंडगे दिलीप- शैलीमीमांसा - श्रीरामपूर, शब्दालय प्रकाशन, २००१

३. नेमाडे भालचंद्र - साहित्याची भाषा - औरंगाबाद, साकेत प्रकाशन, १९८७

४. पाटणकर स. मा. - सौंदर्यमीमांसा - मुंबई, मौज प्रकाशन.

५. पाटणकर वसंत- साहित्यशास्त्र स्वरूप समस्या, पुणे, पद्मगंधा प्रकाशन, २००६

६. पाटील गंगाधर - समीक्षेची नवी रूपे, मुंबई मॅजेस्टिक बुक स्टॉल, २००७

७. मालशे मिलिंद व अशोक जोशी- आधुनिक साहित्य सिद्धांत, मुंबई, मौज प्रकाशन गृह, २००६

८. राजाध्यक्ष विजया ( संपा.) मराठी वाङमय कोश - खंड-४, समीक्षा संज्ञा, मुंबई- महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, २००२

## १.८ नमुनाप्रश्न संच

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. साहित्य भाषेचे विशेष सांगून शैलीविचार स्पष्ट करा.

२. मानसशास्त्रीय समीक्षेतील साहित्य भाषा विचार सांगा.

३. शैली म्हणजे काय हे स्पष्ट करुन पारंपरिक  आधुनिक शैलीविचार सांगा.

४. भाषेची समांतरता ही संकल्पना सविस्तर विशद करा.

५. साहित्य भाषेतील रूपक, प्रतिमा, प्रतीक, मिथ या संकल्पना स्पष्ट करा.

### ब) टीपा लिहा

१. रोमान याकोबसन - भाषेचे कार्य

२. रुपवाद

३. स्वप्न रचनातंत्र आणि साहित्यकृतीचे रचनातंत्र

४. मानसशास्त्रीय समीक्षेतील साहितय भाषाविचार

### क) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. शैली विचारात विचलन या संकल्पनेबरोबर कोणती संज्ञा वापरली जाते.

२. साहित्याच्या भाषेत 'ध्वनी' या पातळीवर विश्लेषण करताना कोणत्या दोन संकल्पना विचारांत घ्याव्या लागतात?

३. साहित्यकृतीतील शैली विचार किती अंगाने करता येतो?

४. मानवी मनाचा अभ्यास करतांना कोणत्या मानसशास्त्रज्ञाने प्रमुख तीन सिद्धांत माडले आहेत?

५. रशियन रुपवादी चळवळीतील विचारवंत व संशोधकाचे नाव सांगा?

❖❖❖

युनिट 2

# २

# साहित्यातील प्रवृत्ती, वाद व साहित्याचे वर्गीकरण

**घटक रचना**

**२ .१ उद्दिष्टे**

**२ .२ प्रस्तावना**

**२.३ अ) साहित्यातील प्रवृत्ती, साहित्यातील वाद - प्रवृत्ती या संकल्पनांचे स्पष्टीकरण**

२.३.१ रोमँटिसिझम- Romanticism

२.३.२ वास्तववाद

**२.४ आ) साहित्याचे वर्गीकरण:-**

२.४.१ भारतीय परंपरा - श्रेणी व्यवस्था

२.४.२ पाश्चात्य विचार -

i) प्राचीन कालखंड - आदेशात्मक पद्धती. सॉक्रेटिस, अरिस्टॉटल, हेगेल

ii) क्रौचेची भूमिका-

iii) आधुनिक कालखंड- वर्णनात्मक पद्धती - इलियट, नोर्थ्रोप फ्राय, सुभान लॅंगर

iv) संरचनावादी पद्धती:- रोला वार्थ्स, रॉबर्ट स्कोल

**२ .५ समारोप**

**२ .६ संदर्भ ग्रंथ**

**२ .७ नमुनाप्रश्न संच**

---

## २.१ उद्देश

---

साहित्याच्या वर्गीकरणाचा अभ्यास करणे.

साहित्यातील प्रवृत्ती, साहित्यातील वाद या संकल्पना समजून घेणे.

संरचनावादी पद्धतीचा अभ्यास करणे.

साहित्यातील वाद, प्रवृत्ती व साहित्याचे वर्गीकरण यांचे वेगवेगळया अभ्यासकांचा दृष्टिकोण अभ्यासणे.

साहित्यातील प्रवृत्ती, वाद यांतील भेद लक्षात घेणे.

साहित्याचे वर्गीकरण करतांना भारतीय परंपरा व पाश्चतात्य परंपरा यांचा अभ्यास करणे.

## २ .२ प्रस्तावना

प्रस्तूत घटकात आपल्याला साहित्यातील वाद आणि साहित्यप्रकाराच्या वर्गीकरणाचा अभ्यास करावयाचा आहे. अभ्यासाच्या सोयीसाठी या घटकाचे ढोबळपणे दोन विभाग करता येतील. पहिल्या विभागात साहित्यातील वाद, साहित्यातील विविध प्रवृत्ती यांचा आढावा घेणार आहोत. साहित्यातील विविध विचारसंप्रदायांपैकी रोमँटिसिझम आणि वास्तववाद म्हणजे काय, त्यांच्या उदयाची कारणे, त्यांच्या मर्यादा, त्यांची लक्षणे-वैशिष्ट्ये आणि मराठी साहित्यातील त्यांचा प्रभाव. या दोन्ही विचारसंप्रदायातील साहित्य दृष्टीचा परिचय यातून होणार आहे. घटकाच्या दूसऱ्या विभागात साहित्य प्रकाराच्या वर्गीकरणाचा मागोवा आपल्याला घ्यायचा आहे. साहित्याचे कथात्मक, काव्यात्मक आणि नाटयात्मक असे वर्गीकरण करता येते. त्यानुसार कथा, कविता, नाटक, कादंबरी इत्यादि साहित्यप्रकार आपण करत असतो। साहित्याच्या वर्गीकरणा संदर्भात भारतीय आणि पाश्चात्य अभ्यासकनी मांडलेल्या मतानुसार त्यानी सूचविलेल्या पद्धतीनुसार साहित्याचे वर्गीकरण समजून घेत येणार आहे, वर्गीकरणा संदर्भातील प्राचीन काळातील अभ्यासकांच्या पद्धति अधनिक कालखंडतील अभ्यासकांची मतमतांतरे, वेगवेगळया वर्गीकरण पद्धति इत्यादींचा अभ्यास प्रस्तूत प्रकारणातील होणार आहे.

## २.३ अ) साहित्यातील प्रवृत्ती, साहित्यातील वाद - प्रवृत्ती या संकल्पनांचे स्पष्टीकरण

विविध ज्ञानशाखांमध्ये नवनवीन संकल्पना निर्माण होत असतात. वेगवेगळ्या विद्याशाखांच्या अभ्यासातून आणि संशोधनातून काही निष्कर्ष आणि अनुमान अभ्यासकांच्या हाती लागतात. त्यातून नव्या संकल्पना आणि नवी प्रमेये पुढे येतात. या संकल्पनांचा प्रवेश साहित्याच्या क्षेत्रातही होत असतो. या संकल्पनांचा, वादांचा आणि चळवळीचा प्रभाव लेखकांवर पडत असतो. समीक्षक हे त्यांचा आधार घेऊन एखाद्या साहित्यकृतीचा आशय शोधतात आणि तिचे वाङ्मयीन आकलन करतात. येथे आपल्याला साहित्यातील वाद आणि प्रवृत्तींचा विचार करावयाचा आहे.

साहित्यक्षेत्रातील वादांचा विचार करत असताना येथे 'वाद' ही संज्ञा 'तीव्र मतभेद' (Controversy) या अर्थाने वापरलेली नसून, एक सैद्धांतिक विचार प्रणाली, विशिष्ट विचारांचा समूह, विशिष्ट संप्रदाय वा विचारप्रवाह या अर्थाने वापरलेली आहे. इंग्रजीतील 'Ism' या संज्ञेला पर्यायी म्हणून मराठीत वाद या संज्ञेचे उपयोजन केली जाते. कलाव्यावहाराच्या स्वरूपाचा शोध घेताना ज्या तात्विक प्रणाली वा दृष्टिकोण वा सिद्धांत निर्माण होतात त्यांना साधारणपणे 'वाद' (Isms) असे म्हटले जाते. मानव्यविद्यांमध्ये असे अनेक वाद वेळोवेळी निर्माण झालेले पहावयास मिळतात. मराठीमध्ये साहित्यक्षेत्रातील वादांच्या संदर्भात 'प्रवृत्ती' ही संज्ञा वापरली जाते परंतु वाद ही संज्ञा आपल्या

विवेचनाच्या दृष्टीने अधिक योग्य ठरते. कारण प्रवृत्ती या संज्ञेने विशिष्ट मानसिक कल सूचित केला जातो. 'प्रवृत्ती' कालसापेक्ष नसते. विशिष्ट काळाचा तिला संदर्भ असतोच असे म्हणता येत नाही. 'वाद' ही संकल्पना मात्र कालसापेक्ष आहे. तिला विशिष्ट काळाचा संदर्भ असतो. आपल्याला ज्या गोष्टींची चर्चा करायची आहे, त्यातील सर्वांना प्रवृत्ती म्हणता येत नाही. मराठीमध्ये या संदर्भात 'संप्रदाय', 'विचारप्रणाली' असे काही शब्दप्रयोग वापरले जातात.

साहित्याच्या क्षेत्रातील वाद हे प्रामुख्याने साहित्याच्या प्रकृतीशी निगडित असल्यामुळे विशिष्ट साहित्यकृतीच्या नेमक्या, यथार्थ आकलनासाठी या वादांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. साहित्याच्या अध्ययनात वादांचा अभ्यास समाविष्ट केला जातो, याचे कारण वादांचा साहित्याच्या प्रकृतीची असलेला साक्षात, जैविक संबंध होय. उदाहरणार्थ केशवसुतादींची कवींची कविता चांगल्या प्रकारे समजून घ्यायची असेल तर, तिच्यातील आशयसूत्रे किंवा अविष्कार तंत्रे याचे नेमके आकलन व्हायचे असेल, तर स्वच्छंदतावाद म्हणजे काय हे आपल्याला माहीत असायला हवे. याप्रमाणे हरिभाऊ प्रभृतींची सामाजिक कादंबरी समजून घेण्यासाठी उदार मानवतावाद, वास्तववाद यांचा परिचय असणे आवश्यक आहे. विशिष्ट साहित्यकृतीचा सर्वांगीण विचार होण्यासाठी त्या त्या साहित्यकृतीशी निगडीत वाङ्मयीन वादांचा वा संप्रदायाचा विचार आवश्यक असला तरी, त्या साहित्यकृतीवरती त्या विशिष्ट वादाचे अथवा संप्रदायाचे बंधन टाकता कामा नाही.

साहित्य-कला क्षेत्रातील विविध वाद हे प्रामुख्याने पाश्चात्त्य साहित्य परंपरेत निर्माण झालेले आहेत. आज या वादांच्या, विचारप्रवाहांच्या माध्यमातून अभ्यासक मराठी साहित्याचा अन्वयार्थ लावत आहेत. या संकल्पना जरी पाश्चात्य समीक्षेतील असल्या तरी मराठी साहित्यात त्या निराधार ठरत नाहीत.

### २.३.१ रोमँटिसिझम- Romanticism

युरोपमध्ये सतराव्या व अठराव्या शतकात अभिजातवादी प्रवृत्तींचा अतिरेक झाला होता. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी याविरुद्ध तीव्र स्वरूपाची प्रतिक्रिया उमटू लागली. या प्रतिक्रियेतून एक नवी वाङ्मयीन चळवळ अस्तित्वात आली. या चळवळीला रोमँटिसिझम असे म्हटले जाते. मराठीमध्ये या शब्दासाठी सौंदर्यवाद, स्वच्छंदवाद, स्वच्छंदतावाद, निर्भरशीलतावाद, कल्पनारम्यता, अद्भुतरम्यता, रोमांचवाद इत्यादी शब्द योजिले आहेत. युरोपियन साहित्य मीमांसकाच्या मते साहित्यिक कल्पनांमधील रूढीविरुद्ध या संप्रदायाने क्रांती केली. म्हणून त्यास 'क्रांतिकारक स्वच्छंदवाद' (Romantic Revolt) असेही म्हटले जाते. काही समीक्षकांच्या मते मध्ययुगातील कल्पनारम्यतेचेच पुनरुज्जीवन या संप्रदायाने केले म्हणून त्यास 'पुनरुज्जीवन स्वच्छंदवाद' असे म्हटले जाते. संदर्भानुसार असे वेगवेगळे शब्दप्रयोग केले जात असले तरी प्रामुख्याने सौंदर्यवाद अथवा स्वच्छंदवाद असा उल्लेख या

विचारप्रणालीचा केला जातो. येथे आपण या संपूर्ण चर्चेसाठी ‘रोमँटिसिझम’ हा शब्दप्रयोग करणार आहोत.

**अ) रोमँटिसिझम च्या उदयाची कारणे-**

युरोपखंडात मध्ययुगात Romances किंवा 'नवलिका' हा वाङ्मयीन प्रकार लोकप्रिय होता. अशा नवलिकांमध्ये चित्तथरारक आणि रोमहर्षक प्रसंग, साहससंपूर्ण घटना, शृंगार, वीर, अद्भुत या रसांना पूर्ण वाव मिळत असे. त्या गद्य व पद्य या दोहोंमध्ये लिहिल्या जात. यामुळे वाचकांची उत्कंठा सतत ताणली जात असे. कालांतराने यातील अद्भुतरम्यतेचे प्रमाण कमी झाले आणि लेखकाच्या कल्पनाशक्तीच्या मनोरम विलासाला मोठे स्थान प्राप्त झाले. यामुळे या संप्रदायाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. अभिजातवादाने युरोपमध्ये चौदाव्या लुईच्या काळात वैभवाचे दिवस पाहिले. मात्र त्यानंतर संकुचितपणा आणि कर्मकांड यामुळे अभिजातवाद निसत्व होत गेला. अभिजातवादातील वैगुण्याविषयी हळूहळू प्रतिक्रिया सुरू झाली. या प्रतिक्रियेने जेव्हा विशाल रूप धारण केले तेव्हा त्यातुन 'रोमँटिसिझम' हा एक नवीन पंथ निर्माण झाला. 'रोमँटिसिझम' ला प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी 'सौंदर्यवाद' हा शब्द वापरलेला आहे. डॉ. रा. श. वाळिंबे यांनी या वादाला 'स्वच्छंदवाद' असा पर्यायी शब्द योजिला आहे.

एकोणिसाव्या शतकातील रोमँटिसिझमच्या उदयाच्या सुमारास फ्रान्समधील राज्यक्रांतीचा अशा लेखक-कवींवर मोठा परिणाम झाला. स्वातंत्र्य, समता व बंधुता या मूल्यांचा उदघोष या काळातील फ्रेंच राज्यक्रांतीने प्रभावित झालेल्या कवींनी केला. त्यातच रूसोने 'पुन्हा निसर्गाकडे चला' असे समाजाला आवाहन केले. याचाही परिणाम सौंदर्यवादावर झाला. समाजरचनेत इष्ट ते परिवर्तन घडून आणावयाचे असेल तर निसर्गाच्या सानिध्यात आणि नैसर्गिक प्रवृत्तींना महत्त्व दिले पाहिजे अशी रूसोची विचारसरणी होती. याचा प्रभाव अनेक कवींवर पडला. तथापि रोमॅंटिक कवींपैकी प्रत्येक कवीची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी वेगवेगळी आहे. वर्डस्वर्थला निसर्ग मार्गदर्शक वाटतो. शेलीला स्वतःच्या बंडखोर वृत्तीचे प्रतिबिंब निसर्गात आढळते. तर किट्सला निसर्गामध्ये ईश्वरी साक्षात्कार घडतो. या शतकातील जर्मन तत्त्वज्ञानाचाही परिणाम रोमँटिसिझम वर झालेला दिसतो.

**ब) कलेसाठी कला-**

रोमँटिसिझमवादी साहित्यिकांनी कलेसाठी कला या मताचा पुरस्कार केला आहे. कलेचे मुख्य कार्य किंवा प्रयोजन आनंद हेच आहे. असा विचार किट्स ने मांडला. सत्य, शिव आणि सुंदर या त्रयींपैकी सौंदर्यवादी 'सुंदर' हे तत्व सर्वश्रेष्ठ मानतात. सौंदर्याच्या आविष्काराला नीतीकल्पनांचा किंवा जाच असू नये अशी भूमिका या संप्रदायाने घेतली. मराठीत श्रीपाद

कृष्ण कोल्हटकर, न. चि. केळकर व ना. सी. फडके यांच्या लेखनात या विचाराचे पडसाद उमटलेले दिसतात.

## क ) रोमँटिसिझमची लक्षणे-

तीव्र भावनोत्कटता हे स्वच्छंदवादाचे विशेषत्वाने जाणवणारे लक्षण होय. 'उत्कट भावनांचा उस्फुर्त अविष्कार' अशी वर्ड्स्वर्थने व्याख्याच केली आहे. अभिजात संप्रदायामध्ये वैचारिक अधिष्ठानाला व समतोल आणि संयत प्रमाणबद्धतेला महत्त्व दिले जात होते. याची प्रतिक्रिया म्हणून की काय सौंदर्यवाद्यांनी लेखकाच्या मानसिक आंदोलनाला महत्त्व दिले. भावनोत्कटतेप्रमाणेच कल्पनाविलासालाही सौंदर्यवादी कवीने महत्त्व दिले. अभिजातवाद्यांप्रमाणेच जीवनाची केवळ प्रतिकृती निर्माण करण्यावर त्यांनी समाधान मानले नाही. नवीन कल्पित सृष्टी निर्माण करावयाची वृत्ती त्यांनी बाळगली. स्वातंत्र्याची अनावर ओढ, नावीन्याची हौस, आत्मविष्कार, आत्मनिष्ठता, उस्फूर्तता, बंडखोरपणा, कृत्रिमतेला फाटा, भावनोत्कटता, ग्रामीण जीवनाविषयी आकर्षण, निसर्गप्रेम, गूढगुंजन कारण ही सौंदर्यवादाची काही ठळक लक्षणे आहेत.

बहुतेक सर्वच सौंदर्यवादी साहित्यिक आत्मकेंद्रित मनोवृत्तीचे होते. वैयक्तिक जीवनात आलेले दुःखद अनुभव, सामाजिक क्षेत्रात झालेला अपेक्षाभंग, मनात दाटलेली निराशा, हुरहूर, हळवेपणा यांचे या संप्रदायातील साहित्यात सतत दर्शन घडते. प्रत्यक्षातील कठोर जीवनात जे मिळू शकत नाही, पण हवेसे वाटते ते कल्पनेने इतिहासात शोधावे व त्यातच रामावे अशी मनोवृत्ती अनेकांच्या लेखनातून प्रकट झाली आहे. स्कॉटच्या ऐतिहासिक कादंबऱ्या अशा मनोवृत्तीतून प्रकट झाल्या आहेत. वास्तव जीवन हे स्वार्थ, दांभिकता, खोटेपणा यासारख्या दोषांनी ग्रस्त आहे. म्हणून त्याकडे पाठ फिरवून सर्व गुणांनी युक्त नितांतरमणीय अशा स्वप्नसृष्टीमध्ये स्वच्छंदतावादी संप्रदायातील लेखक रमान होऊ लागले. या संप्रदायाच्या विरोधकांनी यालाच ‘पलायनवाद’ (Escapism) असा या मनोवृत्तीचा उपहास केला आहे.

## ड) रोमँटिसिझमची वैशिष्ट्ये

- कल्पनाविलास
- भावनोत्कटता
- सौंदर्यदर्शनाने पुलकित होण्याची व देहभान हारपण्याची वृत्ती
- सौंदर्यपूजन
- संवेदनशीलता
- निसर्गाची ओढ
- प्रणयप्राधान्यता
- आत्मकेंद्रित मनोवृत्ती

- परंपरेविरुद्ध बंडखोरी
- अंतःप्रेरणेने नवनिर्मितीचे वाटणारे आकर्षण
- आनंद हेच सर्वश्रेष्ठ साहित्य प्रयोजन मानणे

ही सर्व या संप्रदायाची वैशिष्ट्ये म्हणता येतील. कोणत्याही साहित्यकृतीची नियमांवर बोट ठेवून काटेकोर तपासणी करणे चुकीचे असते, असे हा वाद मानतो. त्यामुळे आस्वादाला आणि साहित्यकृतीतील चैतन्याला चैतन्यतत्व समजून घेण्याला सौंदर्यवादाच्या दृष्टीने महत्त्व आहे.

**इ) मराठी साहित्यातील रोमँटिसिझम**

सौंदर्यवादाचा मराठी साहित्याच्या संदर्भात विचार करू जाता सौंदर्यवादाच्या काही खुणा मध्ययुगीन मराठी वाङ्मययात दिसून येतात. मध्ययुगातील संत कवींची आत्मविष्कारवादी कविता हे सौंदर्यवादाचं उदाहरण सांगता येईल. तत्कालात त्यांनी कवितेच्या माध्यमातून केलेली बंडखोरीही स्वच्छंदवादाचे लक्षण ठरते. असे असले तरी संत कवींनी अध्यात्मिक परंपरा मानलेली आहे. पापपुण्य, पुनर्जन्म, श्रद्धा इत्यादी बाबींचे अधिष्ठान संतांच्या अभंगवाणी लाभले आहे त्यामुळे सौंदर्यवादाची काही लक्षणे त्यात दिसत असली तरी तो पूर्णपणे सौंदर्यवाद म्हणावा का हाही प्रश्न अनुत्तरित राहतो.

रोमँटिसिझमचा विशेष प्रभाव जाणवतो तो अर्वाचीन काळातील मराठी कवींच्या कवितांवर आणि कादंबरी लेखनावर. स्वच्छंदतावादी लेखनाचा खऱ्या अर्थाने प्रभाव केशवसुत, भा. रा. तांबे, बालकवी, गोविंदाग्रज बा. भ. बोरकर, ना. धो. महानोर इत्यादी अनेक कवींवर पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. प्रेमाचे आकर्षण, वास्तव्य जगाच्या कटू जाणिवेने त्यापासून दूरदूर जाण्याची इच्छा, स्वप्नरंजनात मग्न होण्याची वृत्ती, ग्रामीण जीवनाचे व ग्रामीण भाषेचे आकर्षण यासारख्या अनेक गोष्टी तत्कालीन मराठी साहित्य जगतावर सौंदर्यवादाचा विशेष प्रभाव होता हे दाखवतात. ना. सी. फडके यांच्या कथा-कादंबऱ्यांनी प्रणयरम्यतेचे गुलाबी स्वप्न वाचकांपुढे उभे केले. हरिभाऊ आपटे आणि नाथमाधव यांच्या ऐतिहासिक कादंबऱ्या पुष्कळच लोकप्रिय झाल्या. 'पानकळा', 'सराई' यासारख्या कादंबऱ्या लिहिणारे र. वा. दिघे हे स्वच्छंदतावादी कादंबरीकार म्हणता येतील.

**फ) रोमँटिसिझमच्या मर्यादा**

स्वच्छंदतावादी साहित्य विपुल प्रमाणात लिहिले गेले तरी, या साहित्याच्या नि पर्यायाने या संप्रदायाच्याही काही मर्यादा स्पष्टपणे दिसून येतात. या कालखंडात नकली सौंदर्यवादाला उधाण आले. प्रेमावर किंवा निसर्गावर मुद्दाम रचलेल्या कविता, ओढूनताणून केलेले गूढगुंजन, अनुभव नसताना केलेले ग्रामीण जीवनाचे चित्रण, स्वप्नरंजनाच्या नावाखाली पलायनवाद, भावनोत्कटतेच्या नावाखाली भावविवशता आणि उरबडवेपणा, अलंकारिकतेच्या व कृत्रिमतेचा हव्यात असे अनेक अपप्रकार सौंदर्यवादाच्या नावाखाली मराठी साहित्यात येत

राहिले. सामान्यतः १८५० पासून १९३५ पर्यंत सौंदर्यवादाचा मोठा प्रभाव मराठी साहित्यावर दिसतो.

### २.३.२ वास्तववाद

ज्ञानाचा विषय होणाऱ्या भौतिक वस्तूंची सत्ता ज्ञातृनिरपेक्ष, मनाच्या अवबोधनाची किंवा चित् ची अपेक्षा नसलेली अशी असते, असे मानणारे तत्त्वज्ञान म्हणजे वास्तववाद होय. मनाच्या ज्ञापक प्रक्रियेला व मनाला अतिरेकी महत्त्व देऊन संपूर्ण भौतिक विश्वाला मनावलंबी ठरविणाऱ्या चिद्वादाला विरोधी असे हे तत्त्वज्ञान विज्ञानाच्या वाढीमुळे एकोणिसाव्या शतकात पुढे आले.

या तत्त्वज्ञानाचा तत्कालीन साहित्यिकांवर परिणाम झाला आणि साहित्यातही सत्य घटनांचा अभ्यास व दर्शन याच पद्धतीने करून द्यायला हवे, असे मत पसरले. स्वच्छंदतावादी साहित्यात सारे वास्तव मानवी कल्पना व भावना यांनी रंजीत झालेले असून वास्तवाचे खरे दर्शन करून देण्यासाठी आपल्या वृत्तीत वस्तुनिष्ठा विकासायला हवी, असे नव्या साहित्यिकांना वाटू लागले. विज्ञानाच्या प्रगतीने वास्तवाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासाला मजबूत बैठक लाभली होती. शिवाय ऐतिहासिक व सामाजिक अभ्यासातही 'वास्तवाला काय ते सांग उद्या, तुम्ही त्याचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करू नका' असा इशारा वारंवार दिला जात होता. यामुळे जे वस्तुनिष्ठ सत्य असेल त्याचा त्याच स्वरूपात वाचकाला कसा अनुभव करून देता येईल यासाठी लेखकाने प्रयत्न सुरू केले.

वास्तववाद' [Realism] ही साहित्यक्षेत्रातील एक चळवळ, एक विचारसरणी आहे. 'वास्तववाद' ही संज्ञा विविध प्रकारे वापरली जाते. उदाहरणार्थ समाजवादी वास्तववाद, चिकित्सक वास्तववाद, गतिमान वास्तववाद, बाह्य वास्तववाद, आदर्श वास्तववाद मानसशास्त्रीय वास्तववाद, काव्यात्म वास्तववाद, राष्ट्रीय वास्तववाद, वस्तुनिष्ठ वास्तववाद, व्यक्तिनिष्ठ वास्तववाद, रोमँटिक वास्तववाद, आशावादी वास्तववाद, निराशावादी वास्तववाद, असे या संज्ञेचे सुमारे पंचवीस-तीस वापर डॉमियन ग्रँटने दिले आहेत. या विविध वापरामुळे 'वास्तववाद' ही संज्ञा किती विविध व परस्पर विरोधी अर्थाने वापरली जाते, ते लक्षात येते. यामुळे वास्तववाद या संज्ञेचा अर्थ निश्चित करणे हे खरोखरीच दुष्कर होते. परंतु वास्तववादाचा ऐतिहासिक संदर्भ लक्षात घेतला, तर त्याचे दोन ठळक अर्थ डोळ्यासमोर ठेवता येतात. त्यानुसार एकोणिसाव्या शतकातील बालझॅक, जॉर्ज एलियट प्रभृतींच्या कादंबऱ्यांतून फ्रान्स, इंग्लंड व नंतर युरोपात निर्माण झालेली एक साहित्यिक चळवळ हा वास्तववादाचा एक अर्थ आहे. त्याप्रमाणेच एका विशिष्ट काळात व देशात निर्माण झालेली, परंतु विविध काळांतील व देशांतील साहित्यात आढळणारी जीवनचित्रण करण्याची एक पद्धती हा वास्तववादाचा दुसरा अर्थ आहे.

## अ) वास्तववादाच्या निर्मितीची पार्श्वभूमी-

कुठलाही विचार अथवा विचारप्रक्रिया निर्माण होत असताना त्या विचार प्रक्रियेच्या उगमस्थानी काही द्वद्व-प्रतिद्वव्द असलेले दिसून येतात. वास्तववादाचीही निर्मिती होतांना अशा काही मुद्द्यांचा आपल्याला विचार करावा लागतो.

### १) रोमँटिसिझमचा प्रतिवाद-

रोमँटिसिझमला प्रतिक्रिया म्हणून वास्तववादाची निर्मिती झाली आहे. रोमँटिसिझम मध्ये व्यक्तिमत्त्वाला जे केंद्र स्थान मिळाले होते, त्याची परिणती पराकोटीच्या आत्मकेंद्री वृत्तीत झालेली दिसते. त्यामुळे वास्तवापासून दूर जाऊन केवळ कल्पनेच्या साम्राज्यात रमण्याची वृत्ती बळावली. अद्भुताचे आकर्षण, आपल्यामध्ये सर्व जग पाहण्याची वृत्ती, निसर्गाचे उदात्तीकरण या गोष्टींमुळे वास्तवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले. या गोष्टींच्या अतिरेकी स्वरूपाला प्रतिक्रिया होणे स्वाभाविक होते. वास्तववाद ही रोमँटिसिझममधील या सर्व गोष्टींना झालेली एक प्रतिक्रिया होती, असे म्हणता येते.

### २) अनुभववादी तत्वज्ञान-

वास्तववादाच्या निर्मितीचे दुसरे एक महत्त्वाचे कारण १९ व्या शतकात प्रभावी ठरलेले अनुभववादी तत्वज्ञान हे आहे. अनुभववाद्यांच्या मते इंद्रियानुभव हाच मानवी ज्ञानाचा एकमेव पाया आहे, आणि इंद्रियानुभव हेच मानवी ज्ञानाचे प्रामाण्य असते. याचा अर्थ असा की विधानात जे सांगितलेले असते त्याची अनुभवाच्या सहाय्याने प्रतीती येऊन ते खरे किंवा खोटे ठरविता येते. ज्याची प्रतीती इंद्रियानुभवात घेता येते अशी विधाने सत्य असतात. इंद्रियानुभवात ज्याचा पडताळा घेता येत नाही, अशा आत्मिक, अध्यात्मिक गोष्टी अनुभववादाने निरर्थक ठरविल्या. अनुभववादाचे हे तत्वज्ञान आधीपासून अस्तित्वात असले तरी १९ व्या शतकातील डेव्हिड हार्टली,बेथॅम, मिल पिता-पुत्र यांच्या विचारांतून अनुभववादी परंपरा दृढ व विकसित झाली. साहित्य क्षेत्रावर या तत्त्वज्ञानाचा जो प्रभाव पडला आहे, तोही वास्तववादाच्या निर्मितीला कारणीभूत ठरला आहे.

## ब) वास्तववादाची ठळक वैशिष्ट्ये-

वास्तववादाच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची चर्चा करणे येथे महत्त्वाचे ठरेल.

### १) आदर्श तत्वांना विरोध-

प्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यांनी खरेखुरे वास्तव हे सत्वाच्या पातळीवर असते असे मानले आहे. त्यांच्या मते प्रत्यक्षातील, इंद्रियानुभवाने प्रतीत होणारे जग हे केवळ या सत्वाचे अनुकरण असते. त्यामुळे ते खरेखुरे वास्तव नव्हे. म्हणजेच प्लेटोच्या

विचारात वास्तव हे आदर्शाच्या, सत्वाच्या पातळीवरील वास्तव आहे. वास्तववाद्यांनी वास्तवाच्या या कल्पनेला विरोध केला आहे. त्यांच्यामध्ये खरेखुरे वास्तव म्हणजे आपल्या इंद्रियानुभवाने प्रतीत होणारे वास्तव होय. त्यांनी सर्व प्रकारच्या आदर्शवाद्यांना, अ-वास्तव गोष्टींना विरोध केला आहे. रोमँटिसिझममध्ये वास्तवाची कल्पना ही आदर्शीकृत वास्तव अशा प्रकारची आहे. रोमँटिसिझममध्ये बाह्य विश्व हे आंतरिक शक्तीचा अविष्कार मानले गेले. निसर्ग, व्यक्ती हे सर्व एका चैतन्यतत्त्वाने जोडले गेले आहेत, अशी कल्पना येथे प्रभावी होती. त्यामुळे वास्तवाचे व्यक्ती स्वतंत्र अस्तित्व येथे नाकारले गेले. व्यक्तिनिरपेक्ष वास्तवाचे अस्तित्व हा वास्तववादाचा पाया आहे. वास्तवाला मानवी जाणीवेखेरीजचे स्वतंत्र असे अस्तित्व आहे, असे वास्तववाद मानतो. या वास्तवात अर्थातच सामाजिक - मानसिक घटिते, निसर्ग व समाज यातील विविध गोष्टी, अशा अनेक गोष्टींचा समावेश होतो.

### २) जीवनाचे सत्यदर्शन-

वास्तववादी कथात्म साहित्य हे बहुतेक वेळा रोमँटिक कथात्म साहित्याला विरोधी आहे. 'रोमान्स' या कथात्म साहित्य प्रकारात जीवन प्रत्यक्षात जसे आहे, त्यापेक्षा अधिक साहसपूर्ण, अधिक चित्रदर्शी, अधिक वीरोचित(heroic) असे दाखवलेले असते. याउलट वास्तववादांमध्ये जीवन जसे आहे, तशी त्याची नेमकेपणाने अनुकृती करण्यावर भर असतो, त्यामुळे वास्तववाद म्हणजे सामान्य मानवी जाणिवेला जो अनुभव येतो, तसा प्रत्यक्षाचा सत्य प्रत्यय देणारी पद्धती असे मानले गेले आहे.

### ३) सर्वसामान्यांचे प्रतिनिधित्व-

वास्तववादी लेखक आपल्या साहित्यातील पात्रांच्या माध्यमातून सर्वसामान्य जनांच्या जीवनाचा सारासार विचार मांडत असतात. वास्तववादी साहित्यिक आपल्या विषयाची, आशयसामग्रीची हेतुतः निवड करत असतो. जीवनाच्या असाधारण अशा अंगाकडे लक्ष न देता तो जीवनाच्या सर्वसाधारण, सरासरीच्या स्वरूपाच्या अंगाकडे लक्ष देत असतो. त्यामुळे त्याच्या व्यक्तिरेखा या बहुदा मध्यमवर्गीय किंवा काही वेळा श्रमिक वर्गातील असतात. अभिजातवादी व रोमॅंटिक साहित्यातील व्यक्तिरेखेप्रमाणे त्या उच्चवर्गातील असाधारण, दैवी स्वरूपाची गुणवत्ता लाभलेल्या नसतात. वास्तववादी कादंबऱ्यातील या व्यक्तिरेखा त्यांच्या सर्वसामान्य जीवनाचा अनुभव घेत जगत असतात. जीवनाच्या बाल्य, पौगंडावस्था, प्रेम, विवाह, गृहस्थधर्म, वार्धक्य, मृत्यू अशा विविध अवस्थांमधून ते जात असतात. त्यांच्या आयुष्याला आनंदाचा, सौंदर्याचा स्पर्श कधीतरी लाभतो हे खरे आहे, परंतु बहुतेक वेळा त्यांचे आयुष्य विटके, कंटाळवाणे, दुःखी असते, मात्र एखाद्या विशिष्ट

परिस्थितीत, नैतिक पेचप्रसंगात ही माणसे देखील स्वतःचे आयुष्य उजळून टाकणारी भव्योदात्त, विलक्षण अशी कृती करतात. वास्तववादी साहित्य हे अशा माणसांच्या आयुष्याचे चित्रण करत असते.

**४) आशय सामग्रीच्या मांडणीचा विचार-**

वास्तववादात केवळ विशिष्ट विषयाची, आशय सामग्रीची निवड अभिप्रेत नाही. या आशयसामग्रीची विशिष्ट प्रकारची मांडणी, आशयाचे विशिष्ट पद्धतीने केलेले चित्रण येथे अभिप्रेत आहे. आधी म्हटल्याप्रमाणे आशयसामग्रीची, जणू काही आपण प्रत्यक्ष जीवनाचा अनुभव घेत आहोत असा आभास निर्माण करणारी मांडणी येथे केली जाते. बाल्झॅक, गोंकूर बंधू प्रभृतींनी कादंबरी हा समकालीन समाजातील सत्याचे दर्शन घडवण्यासाठी अतिशय समर्थ प्रकार आहे. या धारणेतून वैज्ञानिक दृष्टीच्या इतिहासकाराप्रमाणे फ्रान्समधील समाजजीवनाच्या सर्व अंगाचे वर्गीकरण व नोंद करत जाण्याची भूमिका स्वीकारली. त्यामुळे दैनंदिन जीवनातील वस्त्रप्रावरणे, फर्निचर, अन्नपदार्थ इत्यादींचा प्राकृतिक पातळीवरील बारीक-सारीक तपशील कादंबऱ्यांतून देण्यात आला. जीवनातील असाधारण आणि शुल्लक, नगण्य अशा गोष्टींचे एकाच पद्धतीने चित्रण केले गेले. अशा रीतीने नेहमीच्या दैनंदिन अनुभवाचे येथे चित्रण केले गेले. आपण वास्तवाचे कोणताही आकार न दिलेले प्रतिबिंबच पाहत आहोत असे वाटावे. वर्णनाचा अचूकपणा व पूर्णपणा यांचा पाठपुरावा करताना या कादंबऱ्यांना वृत्तांतलेखनाचे, विस्तृत नोंदींचे स्वरूप प्राप्त झाले. गुस्ताव्ह फ्लॉबेरच्या कादंबऱ्यांमधूनही या प्रकारच्या वास्तववादाचा आविष्कार झाला आहे. सारांश वास्तववादी कादंबऱ्या म्हणजे पूर्णपणे वास्तववादी आशय व वास्तववादी पद्धतीने चित्रण करणारी कादंबरी ठरली.

## क) पाश्चात्य साहित्यातील वास्तववाद -

फ्रान्समधील वास्तववादापेक्षा इंग्लंडमधल्या वास्तववादाच्या संदर्भात काही प्रमाणात वेगळे चित्र दिसते. इंग्लंडमधील वास्तववाद जड वास्तवाच्या चित्रणापेक्षा, केवळ जंत्रीवज पद्धतीने माणसांच्या सामाजिक, नैतिक वर्तनाशी अधिक संबंधित होता.सत्याविषयी, नैतिकतेविषयी आस्था हे या चित्रणाचे वैशिष्ट्य आहे. समकालीन समाजाचे अचूक व रोमॅंटिक नसते चित्रण येथे केले गेले. जॉर्ज इलियट, चार्ल्स डिकन्स प्रभृत्ती कादंबरीकारांचा या संदर्भात उल्लेख करता येईल. हेन्री फिल्डिंग वा जेन ऑस्टिन यासारखे कादंबरीकार हे वास्तववादी परंपरेतील ठरले, याचे कारण ते सर्वसामान्य माणसे, त्यांच्या जीवनातील घटना प्रसंग अशा रीतीने उभे करतात किती माणसे, ते प्रसंग जणू काही प्रत्यक्षातील आहेत अशी खात्री पटावी. रशियामध्ये वास्तववादाचा अविष्कार टॉलस्टॉय, डोस्टोव्हस्की, गॉर्की अशा काही लेखकांच्या कथा कादंबऱ्यांतून झाला आहे.

### ड) वास्तववाद आणि यथार्थवाद-

वास्तववादाचे एक रूप म्हणून यथार्थवादाकडे(Naturalism) पाहता येते. अनेकदा वास्तववादाचे स्थूल स्वरूप म्हणून यथार्थवादाकडे पाहिले जाते. यथार्थवादात वास्तववादापेक्षा जीवनाचे अधिक अचूक, नेमके असे चित्रण केले जाते, परंतु यथार्थवाद म्हणजे वास्तववादाप्रमाणे केवळ विषयाची विशिष्ट निवड किंवा चित्रणाची विशिष्ट साहित्यिक पद्धती नव्हे. कथात्मक साहित्यातील जीवनचित्रणाच्या या प्रकारामागे एक तात्विक दृष्टिकोण आहे. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यकाळात जे डार्विनोत्तर जीवशास्त्र विकसित झाले त्याचा आधार यथार्थवादाने घेतला आहे. या दृष्टिकोणानुसार माणूस हा निसर्गाच्या व्यवस्थेचा एक घटक आहे. त्याला शरीराखेरीज स्वतंत्र आत्मा असतो किंवा त्याचे निसर्गाच्या व्यवस्थेपलीकडील धार्मिक-आध्यात्मिक गोष्टींशी नाते असते, असे म्हणता येत नाही. तो केवळ वरच्या श्रेणीतील एक प्राणी आहे एवढेच म्हणता येईल. माणसाची प्रकृती व त्याचे भवितव्य हे अनुवंशिकता व भोवतालची परिस्थिती या दोन्ही घटकांनी नियत होत असते. मानवी प्रकृतीतील काही घटक हे अनुवंशिकरित्या मिळालेले असतात तर काही घटक तो माणूस ज्या कुटुंबात, वर्गात, एकूण सामाजिक वातावरणात जगत असतो त्यातून मिळालेले असतात. माणसाकडे, मानवी जीवनाकडे पाहण्याची यथार्थवादी दृष्टी ही या प्रकारची आहे. माणसाला येथे कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य नाही. तो निसर्गातील इतर घटकांप्रमाणे एक आहे. यथार्थवादाचा मुख्य प्रवक्ता एमिल झोला हा कादंबरीकार आहे. त्याने वस्तुनिष्ठ, वैज्ञानिक वृत्तीने आपल्या कादंबरीतील व्यक्तिरेखांची, त्यांच्या जीवनातील घटनांचे चित्रण केले आहे. त्यांच्या आयुष्यातील घटनांच्या अतिशय विस्तारपूर्वक नोंदी केल्या आहेत. ज्या गोष्टींचे चित्रण करणे पूर्वी निषिद्ध मानले जात असे, अशा शारीरिक क्रियांचेही त्याने वैद्यकीय दृष्टीतील मोकळेपणा ठेवून तपशीलवार चित्रण केले. ज्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधाशीपणा, लैंगिक बुभुक्षितता अशा पाशवी प्रेरणा प्रबळ आहेत, अशा व्यक्तिरेखा निवडण्याकडे त्यांचा कल होता. त्या व्यक्तिरेखा त्याच्या शरीरांतर्गत प्रेरणांच्या, तसेच बाह्य सामाजिक परिस्थितीच्या बळी असतात. ज्या परिस्थितीत त्या व्यक्तिरेखा भोवतालच्या परिस्थितीने निर्माण केलेल्या प्रेरणांनी फरफटत जगतात, त्यात त्यांचा अटळ शोकान्त असतो.

### इ) विचारसरणीनुसार वास्तवाचे भिन्न स्वरूप-

वास्तववादाच्या संदर्भात निर्माण होणारा एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कोणते वास्तव त्यांना अभिप्रेत आहे, हा होय. एकोणिसाव्या शतकातील वास्तववाद्यांनी मुख्यत्वे इंद्रियिनुभवाने प्रतीत होणाऱ्या वास्तवाला महत्त्व दिल्याचे आपण पाहिले. परंतु साहित्यात वास्तवाचा आग्रह धरणाऱ्या सर्वांना अभिप्रेत असणारे वास्तव एकाच प्रकारचे नाही. मार्क्सवाद्यांना अभिप्रेत असलेले साहित्यातील प्रतिबिंबित होणारे वास्तव विशिष्ट प्रकारचे आहे. समाजवादी वास्तववादाचा पुरस्कार करणाऱ्यांना वास्तवाचे समाजक्रांतीला पुरक असणारे मुख्यतः

राजकीय संदर्भ असणारे विशिष्ट रूप अभिप्रेत होते. मार्क्सवादी परंपरेतील गेऑर्ग ल्युकाचने समाजवादी वास्तववादाच्या पलीकडे जाऊन चिकित्सक वास्तवाची(critical realism) मांडणी केली. त्याच्या मते वास्तववादी कादंबरी सामाजिक व्यवस्थेच्या अंत:स्तरावरील अंतर्विरोध व्यक्त करते. कादंबरीत प्रतिबिंबित होणारे वास्तव हे केवळ दृश्यमान वास्तव नव्हे, तर ते सत्य, अधिक पूर्ण, अधिक स्पष्ट व गतिमान असते. कादंबरी ही आपल्याला वास्तवा विषयी सर्वसाधारण आकलनाच्या पलीकडे जाऊन अधिक सखोल व मूर्त अशी मर्मदृष्टी देते. ल्युकाचच्या या वास्तववादाला जसे नैतिक परिमाण आहे, तसेच कादंबरीच्या रूपबंधाचे भान ठेवणारे कलात्मक परिमाणही आहे. विसाव्या शतकातील मानसशास्त्रीय सिद्धान्तांनी वास्तवाचा आणखी एक अर्थ रूढ केला. खरेखुरे वास्तव हे मनाच्या अंत:स्तरात, अबोध मनात असते ही कल्पना मांडली गेली. त्यामुळे या वास्तवाचा वेध घेणारा मानसशास्त्रीय वास्तवात निर्माण झाला.

वास्तववाद म्हणजे काय याविषयी वरीलप्रमाणे विविध भूमिका घेण्यात आलेल्या दिसतात. आपण सुरुवातीला वास्तववाद ही संज्ञा किती विविध प्रकारे, विविध अर्थाने वापरली जाते, ते पाहिले. त्यातील अनेक अर्थ हे परस्परविरोधी आहेत. त्यामुळे वास्तववाद म्हणजे नेमके काय, हे त्या वादाचा ऐतिहासिक संदर्भ बाजूला ठेवून पाहता येत नाही. वास्तववादाचे हे अनेक व क्वचित परस्परविरोधी अर्थ लक्षात घेतले तर वास्तववाद म्हणजे काय हे निश्चित करता येणे जवळपास अशक्य ठरते.

साहित्य वास्तवाचे अनुकरण करते आणि हे वास्तव कमीअधिक प्रमाणात स्थिर असून त्याचे सुलभपणे आकलन करून घेता येते, यावर वास्तववादाचे सर्व सिद्धांत आधारलेले आहेत. या गृहीतकृत्य संबंधितच शंका घेतली गेली आहे. एक म्हणजे कला व वास्तव यातील नाते कोणत्या प्रकारचे आहे, हा प्रश्न उपस्थित केला जातो. कलावंत वास्तवाची केवळ नक्कल, अनुकरण करत नसतो तो अधिक काहीतरी करत असतो. साहित्य हे जरी जीवनाचे अनुकरण मानले, तरी ते कल्पनेच्या पातळीवरील सर्जक स्वरूपाचे अनुकरण असते. साहित्यात प्रत्यक्षातील कोणत्याही पातळीवरील वास्तवाचे रूपांतर सर्जनशील अशा कल्पनाशक्तीद्वारा होत असते. हे लक्षात न घेतल्यामुळे बहुतांश वास्तववादी कादंबऱ्यांना ऐतिहासिक नोंदी किंवा सामाजिक दस्तऐवजाचे स्वरूप प्राप्त होते. इतिहास, समाजशास्त्र आणि कादंबरी यातील भेदच येथे पुसला जातो. काही कादंबरीकार समकालीन वास्तवाचा विविध प्रकारे उदाहरणार्थ प्रतीकात्मक पद्धतीने किंवा निवेदनाची अन्य काही तंत्रे वापरून अविष्कार करत असतात. त्यांचा विचार वास्तववादाच्या मर्यादेत केला जात नाही. दुसरे म्हणजे वास्तववादी कादंबरी अभिप्रेत असणारे वास्तवाचे अचूक असे प्रतिबिंब हे, कादंबरीकार ज्या भाषेच्या माध्यमातून करतो काम तिच्या स्वरूपामुळे तत्वतः अशक्य ठरते. कारण भाषा ही कधीही उदासीन (neutral) असत नाही.

## २.४ आ. साहित्याचे वर्गीकरण

साहित्याच्या वर्गीकरणाचा विचार हा प्राचीन काळापासून चर्चिल्या गेलेला विचार आहे. वर्गीकरण करणे ही मानवाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. साहित्याला समजून घेण्यासाठी आणि साहित्याची समीक्षा करण्यासाठी वर्गीकरण आवश्यक तथा उपयुक्त ठरत असल्याने साहित्यविचारात त्याला महत्त्व प्राप्त झालेले आहे. कुठल्याही ज्ञान शाखेतील विषयांचे वर्गीकरण करत असताना आपल्याला काही तत्वे वा निकष निश्चित करावे लागतात. वर्गीकरणात एका घटनेचे वा वस्तूचे दुसऱ्या घटनेशी वा वस्तूशी असलेले साम्य, साधर्म्य, भेद व विरोध लक्षात घेतलेला असतो. त्यामुळे त्या वस्तूंची व्याख्या करणे, व्यवस्था लावणे शक्य होते. सर्वच वर्गीकरणे सारख्या दर्जाची नसतात. काही वर्गीकरणे कामचलाऊ. तात्पुरती सोय म्हणून केलेली असतात; तर काही वर्गीकरणे मूलभूत स्वरूपाची, स्वाभाविक असतात. प्रस्तुत मुद्द्यात आपल्याला साहित्याच्या वर्गीकरणाची चर्चा समजून घ्यायची आहे. साहित्य हा कलेचा एक प्रकार आहे असे आपण मानतो.

आपण पहिल्या पातळीवर कलेचे साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प, वास्तू, चित्रपट इत्यादी प्रकारांत वर्गीकरण करतो. तर दुसऱ्या पातळीवर या प्रत्येक कलेचे काही उपप्रकारात वर्गीकरण करतो. उदाहरणार्थ संगीतकलेत  शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, लोकसंगीत असे काही प्रकार करतो; तर चित्रकलेत रेखाचित्र, रंगचित्र असे काही प्रकार करतो. त्याचप्रमाणे साहित्याचेही कथा, कविता, कादंबरी, नाटक इत्यादी प्रकार आपण करत असतो. यांनाच आपण 'साहित्यप्रकार' असे म्हणतो. सर्वच भाषेत हे प्रकार समान नसले तरी असे काही साहित्य प्रकार सर्व भाषांत पहावयास मिळतात.

### २.४.१ साहित्याच्या वर्गीकरणाची भारतीय परंपरा : पारंपरिक भूमिका-

साहित्यप्रकाराची दखल पाश्चात्य आणि भारतीय परंपरेत प्राचीन काळापासून घेतल्या गेल्याचे आपण वरती म्हटले आहेच. याच परंपरेतील भारतीय विचारांचा मागोवा आपण येथे घेणार आहोत. भारतीय साहित्य मीमांसकांनी समकालीन संस्कृत भाषेतील उपलब्ध साहित्यकृतींच्या आधारे साहित्यप्रकार या संकल्पनेविषयी सखोलपणे विचार केलेला दिसतो. संस्कृतात वेद, उपनिषदे, पुराणे या वाङमयाव्यतिरिक्त प्रामुख्याने आर्ष महाकाव्य आणि नाटक या दोन विदग्ध साहित्यप्रकारात लेखन झालेले दिसते. कालप्रवाहात अभिजात पंचमहाकाव्ये, दूतकाव्य, खंडकाव्य असे काव्यप्रकार उदयास आलेले दिसतात. पुढील काळात मराठीमध्ये महानुभाव पंथीय कवींनी आख्यानकाव्याची त्यात भर घातली. पंडित कवींनी अख्यानकाव्याला समृद्ध केले. आठ सर्गाची रचना हा आर्ष ललित महाकाव्याचा आकृतिबंध दिसतो. आर्ष ललित महाकाव्ये विद्वध्द  वाङमय म्हणून मान्यता पावलेली दिसतात.

संस्कृत साहित्यातील दुसरा महत्वाचा साहित्य प्रकार म्हणजे 'नाटक' होय. नाटक हा 'साहित्य' आणि 'कला' असा द्विस्तरीय लेखन प्रकार असल्याने त्याची द्विस्तरीय चर्चा झालेली दिसून येते. संस्कृतात साहित्याचे अंतर्बाह्य घटक व तिचे स्वरूप लक्षात घेऊन साहित्य प्रकाराचे वर्गीकरण जसे कल्पिलेले दिसते त्याचप्रमाणे साहित्यकृतीतून प्रकटणाऱ्या रसनिष्पत्ती प्रक्रियेस अनुकूल अशी साधारणीकरण्याची प्रक्रिया लक्षात घेऊन साहित्याचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

भरतमुनींनी नाट्याची दहा प्रकाराची चर्चा केलेली आहे. भामहाने सर्गबद्ध (महाकाव्य) अभिनेयार्थ (नाटक) आख्यायिका, कथा अनिबद्ध असे प्रकार दिले आहेत. डॉ. स. रा. गाडगीळ यांच्या मते 'भामह, दंडी, वामन या अलंकारिकांनी प्रथम गद्य व पद्य हे काव्याचे दोन भेद कल्पून नंतर गद्याचे व पडद्याचे त्यातील विषयानुसार आणि रचना भेदानुसार इतरही काही प्रकार कल्पिलेले आहेत.

वामनाने पद्याचे अनिबद्ध आणि निबध्द असे भाग कल्पिलेले आहेत. अनिबद्ध म्हणजे स्फुटरचना. निबध्द म्हणजे सलगपणे बांधलेले उदाहरणार्थ नाटक, महाकाव्य इ. अनिबद्ध काव्याचे सौंदर्य तेजाच्या कणाप्रमाणे सूक्ष्म असते; म्हणून वामनाच्या मते आणि अनिबद्ध काव्याहून निबद्धकाव्य श्रेष्ठ होय.

दंडीने साहित्यप्रकारांच्या वैशिष्ट्यांचे विवरण करून काव्यकोश म्हणावा अशी ग्रंथरचना सिद्ध केलेली आहे.

आनंदवर्धनाने अभिधा, लक्षणा, व्यंजना या तीन शब्दशक्तींपैकी व्यंजनेने प्रकटणाऱ्या व्यंग्यार्थाला वर्गीकरणाचे तत्व मानून उत्तम काव्य, मध्यम काव्य आणि अधर्म काव्य असे काव्याचे प्रमुख प्रकार कल्पिलेले आहेत. आनंदवर्धनाच्या मते ज्या काव्यात व्यंग्यार्थ हा मुख्य असेल ते उत्तम काव्य होय. ज्यात व्यंग्यार्थ थोडा उणा असेल पण वाच्यार्थही आपल्यापरीने चमत्कृतीपूर्ण असेल तर ते मध्यम काव्य होय. आणि जेथे व्यंग्यार्थ मुळीच नसतो केवळ अर्थालंकार किंवा शब्दालंकार यांनी काव्यात चमत्कृती आलेली असते ते अधर्म काव्य असे प्रतिपादन आनंदवर्धनाने केले आहे.

आनंदवर्धनाप्रमाणे जगन्नाथाने व्यंग्यार्थ या तत्त्वाधारे काव्याचे वर्गीकरण केले आहे. त्यानुसार त्याने काव्याचे उत्तमोत्तम काव्य, उत्तम, मध्यम, अधम असे चार प्रकार सांगितले आहेत. या दोघांनीही केलेले वर्गीकरण पाहता त्यांनी काव्याच्या प्रकारांची आशयलक्षी श्रेणी ठरवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. अशा प्रकारच्या वर्गीकरणाला स्तंभरूप वर्गीकरण म्हणता येईल.

साहित्याच्या वर्गीकरणासंदर्भात प्रा. रा. श्री. जोग म्हणतात 'साहित्यप्रकारामागील कारण म्हणजे चर्चाविषयाचे वर्गीकरण करून त्यास व्यवस्थित असे स्वरूप देण्याची माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती हे आहे. त्यांच्या मते संस्कृत ग्रंथकारांनी गुण प्रमाणावर आधारलेले उभे

वर्गीकरण केलेले आहे. काव्याचे उत्तम, मध्यम, अधम असे गुण दृष्ट्या उच्चनीचता दाखवणारे वर्गीकरण संस्कृतात दिसते. तर पाश्चात्यांनी वर्ण्यविषय आणि वर्णनपद्धती यावर आधारलेले आडवे वर्गीकरण स्वीकारले आहे. त्यात सर्व साहित्य समान दर्जाचे मानून स्वरूपभेदानुसार भिन्न प्रकार पाडण्यात येतात. उदाहरणार्थ कथा, कादंबरी, नाटक,काव्य इ. पाश्चात्यांनी लेखक वा कवीच्या व्यक्तिमत्वप्रकटणाला विशेष महत्त्व देऊन साहित्याचे व्यक्तिनिष्ठ(Subjective) आणि वस्तुनिष्ठ(Objective) असेही वर्ग कल्पिलेले आहेत.

- **साहित्यप्रकाराची श्रेणी व्यवस्था**

काही साहित्यमीमांसकांनी साहित्यप्रकार हे स्थिर, शाश्वत, अचल, अपरिवर्तनीय असतात अशी भूमिका घेतलेली आहे. पाश्चात्त्य परंपरेत ही भूमिका प्राचीन काळापासून चालत आलेली दिसून येते. या भूमिकेनुसार असे मानले जाते की साहित्यप्रकाराचे एकच एकच सत्व असते. प्रत्येक साहित्यप्रकाराचे सत्व ही त्या प्रकारातील सर्व साहित्यकृतींमध्ये असायला हवे. हे सत्व म्हणजे एखादा गुणविशेष व गुणविशेषांचा संच असतो, आणि हे सत्व सार्वत्रिक स्वरूपाचे, अपरिवर्तनीय असते. याचा अर्थ असा की कोणत्याही काळात, कोणत्याही ठिकाणी ते सारखे राहणार. साहित्यप्रकारासंबधीच्या या भूमिकेला 'एकसत्ववादी' भूमिका असे म्हणतात. साहित्यप्रकाराविषयी च्या एकसत्ववादी भूमिकेचा एक विशेष म्हणजे साहित्यप्रकाराची तरतमभावात्मक व्यवस्था, श्रेणी व्यवस्था लावलेली दिसून येते. या व्यवस्थेमागेही साहित्यप्रकाराचे सत्व हे ठरलेले असते. ते अपरिवर्तनीय असते, असे गृहीतकृत्य आहे. अभिजातवादामधील या प्रतवारीत साहित्यकृतीतील पात्रांचा सामाजिक दर्जा, शैली, आकारमान, भावनात्मक सूर इत्यादी घटकांचा विचार केला जात असे.

उदा.

| | | |
|---|---|---|
| १) साहित्यप्रकार | पात्रे शैली | शब्दकळा यांचा स्तर |
| २) महाकाव्य व शोकान्तिका | राजघराण्यातील माणसे | उत्तम |
| ३) सुखांन्तिका | मध्यमवर्गीय नागर उच्चभ्रु माणसे | मध्यम |
| ४) व्यंगकाव्य व प्रहसन | सर्वसामान्य माणसे | कनिष्ठ |

साहित्यप्रकाराच्या या श्रेणीव्यवस्थेत काही वेळा शोकान्तिका तर काही वेळा महाकाव्य या साहित्य प्रकाराला सर्वश्रेष्ठ स्थान प्राप्त झालेले दिसते. संस्कृत अभिजातवादी साहित्य परंपरेत साहित्य प्रकाराच्या श्रेष्ठ-कनिष्ठतेची कल्पना पहावयास मिळते. या परंपरेत नाटक हे सर्व काव्यात श्रेष्ठ आहे असा विचार सर्वसाधारणपणे आढळतो. भरताने दहा रुपक प्रकार करून त्यात नाटक हा सर्वश्रेष्ठ रुपकप्रकार आहे अशी भूमिका घेतलेली दिसते.

आनंदवर्धनाने काव्याचे केलेले ध्वनिकाव्य, गुणीभूतव्यंगकाव्य, चित्रकाव्य हे प्रकार मूल्यमापनात्मक स्वरूपाचे आहे. येथे ध्वनिकाव्य उत्तम, गुणीभूतव्यंगकाव्य हे मध्यम तर चित्रकाव्य हे अधम अशी व्यवस्था दिसून येते.

### २.४.२ साहित्याचे वर्गीकरण : पाश्चात्य परंपरा

**i) प्राचीन कालखंड :-**

साहित्यप्रकाराच्या संदर्भात जशी भारतीय परंपरा प्राचीन काळापासून दिसून येते, तशीच पाश्चात्त्य परंपराही दिसून येते. सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादी विचारवंतांनी ही परंपरा भक्कमपणे मांडलेली आहे. नाटकाचे शोकान्तिका आणि सुखान्तिका हे जे दोन प्रकार आढळतात; यांचा विचार सुरुवातीच्या काळात ॲरिस्टॉटलने केलेला दिसून येतो. एकसत्ववादी भूमिकेमागेही प्लेटोची मांडणी दिसून येते. कला-साहित्याच्या एकसत्ववादाच्या संदर्भात प्लेटोची अशी धारणा होती की, 'प्रत्येक वर्गात वा जातीत एक निश्चित अपरिवर्तनीय व सार्वत्रिक असे सत्व असते, आणि त्या वर्गातील सर्व सभासदांमध्ये ते सत्व असणे आवश्यक असते. हे सत्व म्हणजे अपरिहार्य असा एखादा गुणविशेष किंवा गुणविशेषांचा संच असू शकेल. या सत्वामुळेच एखादी विशिष्ट वस्तू ही त्या वर्गातील, जातीतील वस्तू आहे हे आपल्याला ओळखता येते. प्रत्येक साहित्यप्रकाराचे सत्व हे त्या प्रकारातील सर्व साहित्यकृतींमध्ये असायला हवे'. या एकसत्ववादी भूमिकेला प्लेटोप्रणित दृष्टिकोण अथवा पारंपरिक भूमिका असेही म्हटले जाते.

साहित्यप्रकाराविषयीची एकसत्ववादी भूमिका पाश्चात्य साहित्यपरंपरेतील अभिजातवादांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. ॲरिस्टॉटलपासून जे साहित्यप्रकार रूढ झाले, मान्यता पावले तेच प्रकार पुढे दीर्घकाळापर्यंत स्वीकारले गेले. पाश्चात्य साहित्यात रोमँटिसिझमच्या उदयापर्यंत याच पारंपरिक भूमिकेचा प्रभाव असल्याचे दिसून येते. अभिजातवादामध्ये महाकाव्य, शोकान्तिका, सुखान्तिका अशा साहित्यप्रकारांचे आशय, रचना, शैली इत्यादी घटकांसंबंधीचे विविध संकेत, नियम तयार होत गेले. पुढे या नियमांचे काटेकोर पालन करण्यावर भर देण्यात आला. समीक्षक आणि साहित्यिकही हे नियम काटेकोरपणे पाळत असे. त्या संबंधीचे आदेश दिले जात असत. नव्य-अभिजातवादामध्ये यासंबंधीचा कर्मठपणा अधिक प्रमाणात दिसून येतो. प्राचीन काळातील साहित्यप्रकारांचा शक्यतोवर जसाच्या तसा स्वीकार करणे किंवा त्यात स्वतःच्या सोयीसाठी किरकोळ स्वरूपाचे फेरफार करणे यावर नव्य-अभिजातवादाचा भर होता. त्यांच्या दृष्टीने साहित्यप्रकार ही संकल्पना स्वयंस्पष्ट होती. या संकल्पने संबंधी काही प्रश्न निर्माण होऊ शकतात, याची जाणीव त्यांच्यात असलेली दिसत नाही.

पाश्चात्य साहित्य परंपरेत अभिजातवादामधून साहित्यप्रकाराची विशुद्धता ही कल्पना पुढे आली. साहित्यप्रकार हे अचल, अपरिवर्तनीय असतात हे या कल्पनेत गृहीत धरलेले होते.

साहित्यप्रकाराची विशुद्धता म्हणजे त्या-त्या साहित्यप्रकाराचे जे सनातन रूप आहे ते तसेच राखले जावे या संबंधीचा अग्रह होय. या परंपरेच्या मते प्रत्येक साहित्यप्रकार वेगळा आहे आणि त्यात भेसळ होता कामा नये. प्रत्येक साहित्यप्रकाराची वैशिष्ट्यपूर्णता, त्याची क्षमता, त्याचा आनंद, त्याचे प्रयोजन हे वेगळे असते.

- **ॲरिस्टॉटल**

ॲरिस्टॉटल या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याने सर्जक अनुकृतीचा सिद्धांत मांडून अनुकृतीला ललित कलांचे व्यवच्छेदक लक्षण मानले. ॲरिस्टॉटलच्या मते अनुकृती च्या माध्यमावरून कला या भिन्न ठरतात. अनुकृतीचा विषय, अनुकृतीची पद्धती या दोन मुख्य तत्त्वांच्या आधारे त्यांनी कलांचे वर्गीकरण केले आहे. त्यांच्या मते, 'कवी निवेदनाच्या माध्यमातून अनुकृती करू शकेल किंवा तो आपल्यासमोर चालती-बोलती जिवंत पात्रे उभे करील. त्याच्या या अनुकृतीच्या पद्धतीनुसार महाकाव्य आणि शोकांतिका हे साहित्याचे मुख्य दोन प्रकार निर्माण होतात. ॲरिस्टॉटलच्या मते कवी स्वतः पात्र बनून स्वतःविषयी बोलतो किंवा तो विशिष्ट भूमिका घेतो. कवी अंशतः  निवेदक असतो किंवा तो तृतीयपुरुषी निवेदनाचा आधार घेतो. कधीकधी कवी पात्र निवेदनही स्वीकारतो. ही महाकाव्याच्या अनुकृतीची पद्धती होय. जेव्हा केवळ पात्रे बोलतात आणि त्यांच्या मार्फत ती जीवनाची जेव्हा अनुकृती करतात तेव्हा नाटक तयार होते. सुखान्तिका आणि शोकान्तिका या नाटकांच्या दोन प्रकारांचे त्यांनी प्रतिपादन केले आहेत. एखाद्या महान काव्यातून अनेक नाटकांसाठी विषय मिळू शकतात. महाकाव्याचा आवाका मोठा असतो मात्र नाटकाला सादरीकरणाची मर्यादा असते. एकूणच ॲरिस्टॉटलने काही रचनात्मक काही आशयात्मक तत्त्वे वापरू साहित्याचे महाकाव्य शोकान्तिका, सुखान्तिका हे प्रकार केले आहेत. पाश्चात्य साहित्यपरंपरेतील साहित्याच्या वर्गीकरणावर ॲरिस्टॉटलच्या वरील विचारसरणीचा प्रभाव दीर्घ काळ टिकून राहिला.

- **हेगेल**

पाश्चात्य अभ्यासक हेगेल यानेही साहित्यात व्यक्त होणाऱ्या अनुभव स्वरूपावरून वाङमयप्रकारांचे वर्गीकरण केले आहे. त्याच्या मते महाकाव्यातील आशय हा वस्तुनिष्ठ स्वरूपाचा असतो. त्यातून राष्ट्रीय आत्म्याची समग्रता व्यक्त होते. या उलट भावकाव्याचा आशय आत्मनिष्ठ स्वरूपाचा असतो. त्यामध्ये कवी स्वतःचे भावजीवन आणि विश्व विषयक व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोन यांचा अविष्कार करत असतो. नाटकांमध्ये भावकाव्याची आत्मनिष्ठ वृत्ती आणि महाकाव्याची वस्तुनिष्ठ वृत्ती या दोन्ही एकवटलेल्या दिसतात. हेगेलने वाङमयप्रकारांच्या वर्गीकरणातून साहित्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण मांडले आहे.

## ii) क्रोचेची भूमिका

क्रोचे या इटालियन सौंदर्यमीमांसकाने इम्यॅन्युअल कांटच्या नाममात्रवादी भूमिकेचा जोरदार पुरस्कार केला. नाममात्रवाद्यांनी साहित्यप्रकार नाकारले तरी किंवा त्यांना नाममात्र स्वरूपाचे स्थान दिले आहे. क्रोचेनी विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ज्ञानशास्त्रीय भूमिकेतून साहित्य वर्गीकरणाच्या भूमिकेला विरोध केला. त्याच्या मते प्रातिभ ज्ञान व संकल्पनात्मक ज्ञान किंवा तार्किकज्ञान यांच्यात जर गल्लत झाली तर ज्या चुका निर्माण होतात त्यापैकी एक चूक म्हणजे वाङमय प्रकार किंवा कलाप्रकार असतात ही समजूत होईल. क्रोचेची ही भूमिका समजून घेण्यासाठी प्रातिभ ज्ञान आणि तर्कनिष्ठ ज्ञान याविषयीची त्यांची मते विचारात घ्यावी लागतात 'प्रातिभ ज्ञान म्हणजे कल्पनाशक्तीच्या सहाय्याने होणारे ज्ञान होय. वस्तूच्या विशिष्टत्त्वाचे ज्ञान म्हणजे प्रातिभ ज्ञान होय. तर्कनिष्ठ ज्ञान म्हणजे संकल्पनेच्या आश्रयाने होणारे ज्ञान होय. त्यामागे जातियत्व असते. तेथे वस्तूवस्तूमधील सामान्य गुणांचा आश्रय घेतला जातो. साहित्यकृती ही स्वतंत्र व अनन्यसाधारण वस्तू आहे असे क्रोचे मानतो. साहित्यकृतीचा आस्वाद घेताना तिच्यातील विशिष्ट गुणांचा अनुभव घेतला पाहिजे. असा आस्वाद प्रातिभ ज्ञानाच्या माध्यमातून घेतला असता तो सौंदर्यानुभव ठरेल. रसिक कलाकृतीचा आस्वाद संकल्पनात्मक ज्ञानाच्या आधारे घेऊ लागतो तेव्हा तो सौंदर्यानुभव न राहता ज्ञानानुभव ठरेल. अशा अनुभवात कलाकृतीच्या तत्वाकडे व सौंदर्याकडे दुर्लक्ष होईल. म्हणूनच क्रोचे आपल्या ज्ञानशास्त्रीय व सौंदर्यशास्त्रीय भूमिकेतून साहित्याच्या वर्गीकरणाला विरोध करतो.

## iii) आधुनिक कालखंड : वर्णनात्मक पद्धती-

अभिजातवादी कालखंडात प्रभावी ठरलेली एकसत्ववादी भूमिका आधुनिक कालखंडात प्रभावी ठरू शकली नाही. साहित्यप्रकार ही संकल्पना स्थिर नसून ती अस्थिर, चल स्वरूपाची आहे. असे मानण्याकडे आधुनिकांचा कल असल्याचे सामान्यतः दिसून येते. साहित्यप्रकार ही संकल्पना स्थळा - काळाप्रमाणे बदलत जाणारी संकल्पना आहे. असा आधुनिकांचा विचार आहे. नवनव्या साहित्यकृतींच्या निर्मिती बरोबर साहित्यप्रकाराची संकल्पनाही बदलत जाते. नव्या साहित्यकृतींच्या योगाने ती अधिकाधिक समावेशक होत जाते. अभिजातवादी मानतात तसे साहित्य प्रकाराच्या संकल्पनेचे एकच एक सार्वत्रिक स्वरूपाचे सत्व सर्व काळांत, स्थळांत, संस्कृतीत आढळत नाही. हा विचार ग्रीकरोमन संस्कृतीतील साहित्यप्रकार डोळ्यासमोर ठेवून मांडलेला विचार आहे. जागतिक परिप्रेक्ष्यातून 'साहित्यप्रकार' या संकल्पनेकडे पाहता प्रत्येक संस्कृतीचे-देशाचे वेगवेगळे साहित्यप्रकार असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे स्थळा-काळाप्रमाणे या संकल्पनेतही बदल झालेला दिसतो.

अभिजातवादी परंपरेतील साहित्यप्रकारांची श्रेणीव्यवस्थाही आधुनिक काळात स्वीकारली जात नाही. आधुनिक काळात साहित्यप्रकारांसंबंधी वर्णनात्मक भूमिका स्वीकारली जाते. या भूमिकेत वर्णनात्मक निकषांचा वापर करून साहित्यप्रकारांमधील साम्यभेदात्मक नात्याचा विचार केला जातो. साहित्यप्रकाराची श्रेणीव्यवस्था स्वीकारली तर काही साहित्यप्रकारांवर ते अन्यायकारक ठरेल. प्राचीन काळी मर्यादित साहित्यप्रकार डोळ्यापुढे ठेवून श्रेणीव्यवस्थेची मांडणी करण्यात आल्याने आधुनिक काळातील कथा, कादंबरी हे साहित्यप्रकार कमी दर्जाचे ठरू शकतील. त्यामुळे ही तार्किक अडचण लक्षात घेऊन आधुनिकांनी श्रेणीव्यवस्था अमान्य केली आहे.

- **टी. एस. एलियट**

टी. एस. एलियट यांनी कवीच्या काव्यातील निर्देशाच्या आधारे साहित्यप्रकाराचे वर्गीकरण केले आहे. कवी कवितेत कोणती भूमिका घेतो व कोणाला उद्देशून काव्यलेखन करतो या गोष्टींवर एलियट भर देतो. एलियटच्या मते कवितेत तीन प्रकारचे ध्वनी (voices) असतात. भावकाव्यात कवीचा पहिला आवाज असून यात कवी स्वतःशी बोलत असतो. भावकाव्यात कवी स्वतःशी संवाद साधत असल्याने येथे वाचक, श्रोते, प्रेक्षक नसतात. एलियटच्या मते कथाकाव्यात कवीचा दुसरा ध्वनी असतो. येथे कवी वाचक, श्रोते व प्रेक्षक यांच्याशी बोलत असतो. कवीचा तिसरा ध्वनी नाटकात असतो. नाटकात कवी स्वतःच निर्माण केलेल्या काल्पनिक पात्रांद्वारे बोलत असतो. कथाकाव्यात आणि नाट्यकाव्यात कवीला कोणाशी बोलायचे आहे हे आधी ठरवावे लागते. कथानक, घटना, प्रसंग, त्यांची मांडणी, निवेदन इत्यादी बाबी आधी निश्चित कराव्या लागतात.

- **सुसान लॅंगर**

सुसान लॅंगर ने साहित्यकृतीत व्यक्त होणाऱ्या अनुभवांची जात व अविष्कार पद्धती यांच्या आधारे साहित्य प्रकार केले आहेत. लॅंगरच्या मते, 'प्रत्येक कलेचे स्वतःचे असे प्रतिभासरूप आत्मबीजे (illusion) असते. चित्र व संगीत या कलांची अनुक्रमे आभासरूप अवकाश (virtual time) ही प्रतिभासरूप आत्मबीजे (illusion)आहेत'. साहित्याचे आभासरूप जीवन व आभासरूप अनुभव हे आत्मबीज आहे. वाङ्मय प्रकारात जो काळ वापरला जातो तोच त्या प्रकाराचे स्वरूप निश्चित करतो. म्हणून लॅंगर च्या मते भावकाव्याचा (Lyric) काळ वर्तमान काळ तर कथनपर वाङ्मयाचा काळ भूत व नाट्याचा काळ भविष्यकाळ हा असतो. साहित्याच्या प्रत्येक प्रकारात क्रियापदाचा जो वापर केला जातो त्यातच असे गुणवैशिष्ट्ये आहे की तेच वाङमयी परिमाणाची (Literary dimension) खरी प्रकृती स्पष्ट करते . या दृष्टीने गीतकाव्यात वापरला जाणारा विशिष्ट प्रकारचा वर्तमानकाळ हेच काव्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण ठरते. कथात्म वाङ्मयाचा काळ भूतकाळ असतो व नाट्यात्मक वाङ्मयाचा काळ भविष्यगर्भ वर्तमान काळ असतो.

- **नॉथ्रोप फ्राय**

साहित्यवर्गीकरणासंदर्भात फ्राय यांनी वेगळी भूमिका मांडली. त्याच्या मते मिथ्स मधील विषय, आदिप्रतिमा व साहित्य प्रकार यांचे आदिबंध निसर्गाच्या ऋतुचक्रात खोलवर रुजलेले आहेत. निसर्गातील ऋतुचक्र आणि मिथ्स व साहित्यप्रकार यांच्या सहसंबंधाचा विचार त्यांनी आपल्या मांडणीत केला आहे. त्यांच्या मते मानव हा जीवसृष्टीच्या केंद्रस्थानी मानला जातो तर सूर्य हा सृष्टीच्या केंद्रस्थानी मानला जातो. मानव हा आपल्या जीवनाचे रूप सृष्टीनायक सूर्याच्या रूपात पाहतो. मानवी जीवनात जन्म-तारुण्य, प्रौढत्व, वृद्धत्व आणि मरण या चार जीवनावस्था अनुक्रमे वसंत, उन्हाळा, ऑटम, हिवाळा या चार ऋतूंच्या मिथ्समधून व्यक्त झालेल्या दिसून येतात. या ऋतूंच्या मिथ्समधून सुखान्तिका, रोमान्स, शोकान्तिका व सटायर हे चार साहित्यप्रकाराचे आदिबंध तयार होतात. फ्रायने हा विचार मांडताना दिनक्रम, ऋतुचक्र व मानवी जीवन यांच्यातील साम्य मांडले आहे. उदा. दिनक्रमातील सकाळ सूर्याची, नवतेजाची कथा सूचित करते हा नायकाचा जन्मकाळ आहे. हा ऋतुचक्रातील वसंतकाल- आनंदाचा काळ आहे. यातून सुखान्तिका निर्माण झाली. याचप्रमाणे सर्व ऋतुचक्राचे सहसंबंध पुढील तक्त्याच्या आधारे समजून घेता येतील.

| दिनक्रम | नायकाचा जीवनकाल | ऋतुचक्र काल | साहित्यप्रकार |
|---|---|---|---|
| • सूर्योदय | जन्म-तारुण्य | वसंतकाल | सुखान्तिका |
| • मध्यान्ह | प्रौढकाल(लग्न -विजय) | उन्हाळा | रोमान्स |
| • सूर्यास्त | मृत्यूकथा | ऑटम | शोकान्तिका |
| • रात्र | जीवनातील विलय-प्रलय | हिवाळा | सटायर |

फ्रायच्या वरील वर्गीकरणासंदर्भात वसंत पाटणकर लिहितात, "फ्रायचे साहित्याचे हे वर्गीकरण निसर्गातील ऋतुचक्राशी नाते सांगणारे आहेत. मात्र एक गोष्ट लक्षात घ्यावयास हवी ती म्हणजे हे ऋतुचक्र विशिष्ट स्थळांशी संबंधित आहे. आपल्याकडील ऋतुचक्र हे यापेक्षा वेगळे आहेत याचे भान ठेवावयास हवे".

### iv) साहित्यवर्गीकरणाची संरचनावाद पद्धती:-

आधुनिक काळात साहित्याचे वर्गीकरण नवनव्या पद्धतीने करण्यात आलेले आढळते. रोमन याकोब्सन हा रशियन रूपवादी समीक्षक. त्याने भाषेची निश्चित स्वरूपाची व्याकरणिक संरचना आणि साहित्यप्रकार यातील जुळते संबंध दाखविले आहे. त्याच्या मते भावकाव्य प्रथमपुरुषी, एकवचनी, वर्तमान काळी तर महाकाव्य तृतीयपुरुषी, भूतकाळी असते. कारण

महाकाव्याचा निवेदक अवलोकन विषय होत असल्यामुळे तृतीयपुरुषी असतो. तो वास्तूप्रमाणे गम्य होणारा 'मी' असतो.

- **रोलॉ बार्थस्**

रोलॉ बार्थस् ने अभिजातवादी आणि आधुनिक अशा दोन्ही वर्गीकरणाच्या पद्धतीतील त्रुटींचा निर्देश करून संरचनावादाच्या अंगाने साहित्यप्रकाराचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मते साहित्य हे मानव्य विज्ञानाचा (Human Science) भाग आहे. त्यामुळे निसर्गविज्ञानामधील वर्गीकरणाच्या पद्धती साहित्याच्या वर्गीकरणासाठी वापरणे चुकीचे आहे. रोलॉ बार्थस् ने स्वतःचे वर्गीकरणाचे नवीन नमुना रूप (Model) मांडले. तो एखाद्या विशिष्ट साहित्यप्रकाराचे रूढ संकेत गृहीत धरतो. त्याच्या आधारे तो एक संकेतव्यूह निर्माण करतो. त्यात आढळणाऱ्या नवीन संकेतांना देखील तो महत्त्व देतो आणि ते संकेत तो मूळच्या नमुना रूपात समाविष्ट करतो. त्याचे वर्गीकरण विषय नमुना रूप लवचिक असल्याने साहित्यकृती विषयक संकेतव्यूह समृद्ध होत जाते. रोलॉ बार्थस् अभिजातवादी भूमिकेप्रमाणे सामान्यगुण किंवा जातितत्वाला (संकेत व्यवस्थेला) प्राधान्य देत नाही तसेच आधुनिक भूमिकेप्रमाणे विशिष्ट गुणांनाही प्राधान्य देत नाही. तो ही दोन्ही परस्पराश्रयी आहेत असे मानतो. साहित्यकृती वाचताना साहित्यप्रकाराची जातितत्वे (संकेतव्यवस्था) माहीत असावीच लागते त्याचबरोबर साहित्यकृतीचे लक्षणीय गुणही लक्षात घ्यावे लागतात.

- **रॉबर्ट स्कोल:-**

रॉबर्ट स्कोल साहित्यकृतीत होणारा शब्दांचा उपयोग आणि शब्दांचे संप्रेषण या दोन तत्त्वांच्या संम्मीलनाच्या आश्रयाने साहित्याचे वर्गीकरण करतो. लेखक शब्दांचा उपयोग विचार व भावना व्यक्त करण्यासाठी, पात्रचित्रणासाठी, कथा सांगण्यासाठी करतो तेव्हा अनुक्रमे निबंध, काव्य, नाटक व कथात्मक साहित्य प्रकार निर्माण होताच. शब्दांचा उपयोग या तत्वाधारे वरील साहित्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण सांगितले गेले आहे. निबंधामध्ये वाचक लेखक यांचा थेट संबंध असतो. वाचकांचा अनुनय हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण असते. तर कवितेमध्ये कवीचे आत्मचिंतन असते. वाचकांशी त्याचा संबंध अप्रत्यक्ष असतो. कवीचे स्वतःशी बोलणे हे या साहित्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण मानता येईल. कथा-कादंबरी येथे लेखकाला वाचकच श्रोत्यांचे भान असते. त्याचा श्रोत्यांशी साक्षात संबंध असतो. कथन व निवेदन हे या साहित्य प्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण होय. या उलट नाटकात लेखक हा वाचक-प्रेक्षकांशी थेटपणे बोलत नसतो. येथे पात्रांची नाट्यात्मक कृती व संवाद महत्त्वाचे असतात. पात्रापात्रांचे संवाद हे या साहित्य प्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण होय. या नमुना रूपाच्या आधारे साहित्यप्रकाराचे व्यवच्छेदक लक्षण जसे सांगता येते तसेच साहित्यप्रकार एकमेकांमध्ये कसे मिसळले जातात याचेही स्पष्टीकरण येते. साहित्य प्रकारातील शब्दांचे उपयोजन व शब्दांचे

संप्रेषण या तत्त्वांपैकी कोणत्याही तत्वांचा प्रभाव बदलला की त्या साहित्यप्रकाराची सरमिसळ होते.

## आपली प्रगति तपसा

साहित्यतिल प्रवृत्ति, साहित्यतिल वाद या संकल्पना स्पष्ट करा

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………………..

…………………………………………………………………………………………….

## २.५ समरोप

साहित्यतिल 'वाद' हि संकल्पना एक सैद्धादांतिक विचारप्राणाली म्हणून समजून घ्यावी लगते. साहित्यतिल हे वाद विशिष्ट कलाकृतिकड़े पाहण्याचे वेगवेगळे आयाम सूचवित असतात प्रत्येक वादाची विशिष्ट वैचारिक भूमिका असते. वेगवेगळया वादांमध्ये मतभेद असू शकतात, मात्र हे मतभेद तीव्र मतभेद नसून कलाकृतीला समजून घेण्यास उपयुक्त असे दृष्टिकोन आहेत. साहित्यक्षेत्रातील वाद हे प्रामुख्याने साहित्याच्या प्रकृतीशी निगडित असल्यामुळे साहित्यकृतीच्या नेमक्या, यथार्थ आकलनासाठी या वादांचे ज्ञान वाचक, अभ्यासक, समीक्षक याना असणे आवश्यक आहे एखाद्या कलाकृतीचा अन्वयार्थ लावताना विशिष्ट वैचारिक भूमिका घेणे उपकारक ठरत असले तरी तिची सक्ती करता कामा नये. वाङ्मयप्रकाराची संकल्पना हि एक व्यवस्थात्मक संकल्पना आहे. साहित्याला समजून घेण्यासाठी व साहित्याची समीक्षा करण्यासाठी साहित्याचे वर्गीकरण उपयुक्त ठरते. वर्गीकरणामध्ये परस्पर साम्य साधर्म्य भेद, विरोध लक्षात घेतलेला असतो. साहित्याचा वर्गीकरणाचा विचार प्राचीन काळापासून झालेला आढळतो, भारतीय आणि पाश्च्यात्य परंपरांमध्ये साहित्याच्या वर्गीकारण्याच्या विविध पद्धती मांडण्यात आल्या आहेत. भारतीय साहित्यमीमांसकांनी समकालीन संस्कृत भाषेतील उपलब्ध साहित्यकृतींच्या आधारे साहित्य प्रकाराच्या संकल्पनेचा विचार केलेला आहे. पाश्चात्य परंपरेतही सॉक्रेटिस, प्लेटो-अंरिस्टॉराल पासून अगदी आधुनिक काळातील अभ्यासकांपर्यंत हा विचार झालेला दिसून येतो.

## २.६ संदर्भ ग्रंथ

१) पाटणकर वसंत - साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या

२) पाटील गंगाधर - समीक्षामीमांसा

३) जाधव मनोहर (संपा) - समीक्षेतील नव्या संकल्पना

४) कुलकर्णी अ. वा. - साहित्यविचार

५) डॉ. गाडगीळ स. रा. - ककव्यशास्त्रप्रदीप

६) प्रा. जोग रा. श्री - अभिनव काव्यप्रकाश

## २.७ नमुना प्रश्नसंच

**अ) दीघोत्तरी प्रश्न**

१ ) साहित्यातील प्रवृत्ती, सहित्यातील वाद या संकल्पना स्पष्ट करा.

२ ) रोमटसिंझम वाद स्पष्ट करुन लक्षणे व वैशिष्ट्ये सांगा.

३ ) वास्तववादाच्या निर्मितीची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

४ ) साहित्याच्या वर्गीकरण करतांना क्रौचेची भूमिका स्पष्ट करा.

५ ) साहित्याच्या वर्गीकरणात भारतीय व पाश्चात्य मीमांसकाच्या भूमिका स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा**

१) क्रौचेची भूमिका

२) वास्तववादाची वैशिष्ट्ये

३) आधनिक कालखंड - वर्णनात्मक पद्धती

४ ) साहित्याचे वर्गीकरण पाश्चात्य परंपरा

५) मराठी साहित्यातील रोमॅटिसिंझम

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) युरोप खंडात मध्ययुगात कोणता वाङमय प्रकार लोकप्रिय होता?

२) रोमॅटिसिंझमवादी साहित्यिकांनी कोणत्या मताचा पुरस्कार केला आहे?

३) नाट्याची दहा प्रकारची चर्चा कोणत्या मीमांसकाने केली आहे?

४) साहित्यात व्यक्त होणाऱ्या अनुभव स्वरुपावरुन वाङ् मयप्रकाराचे वर्गीकरण कोणत्या पाश्चात्य अभ्यासकाने केले आहे?

टी.एस.एलियट यांनी कशाच्या आधारे साहित्यप्रकाराचे वर्गीकरण केले आहे?

❖❖❖

घटक ३

# ३

# साहित्यातील मूल्यविचार

**घटक रचना**

३.१ उद्देश

३.२ प्रस्तावना

३.३ साहित्यातील मूल्यविचार

३.४ साहित्य मूल्यमापना विषयीच्या दोन व्यापक भूमिका

३.४.१ लौकिकतावादी भूमिका

३.४.२ स्वायत्ततावादी भूमिका

३.४.३ लौकिकतावाद आणि स्वायत्ततावाद यांच्यातील अनुबंध ३.५ साहित्याच्या मूल्यमापनासंबंधीचे काही प्रश्न

३.५ साहित्याच्या मूल्यमापनासंबंधीचे काही प्रश्न

३.५.१ साहित्यकृती चांगली की श्रेष्ठ?

३.५.२ साहित्यकृती वस्तुनिष्ठ की ज्ञातृनिष्ठ?

३.५.३ साहित्यकृती सापेक्ष की शास्वत

३.६ साहित्यमूल्ये व समीक्षा दृष्टिकोन

३.७ समारोप

३.८ संदर्भ ग्रंथ

३.९ स्वाध्याय

## ३.१ उद्देश

१. विद्यार्थ्यांना साहित्याचे मूल्यमापन म्हणजे काय हे समजेल.

२. साहित्याच्या मूल्यमापनाच्या निकषांची ओळख होईल.

३. साहित्याच्या मूल्यमापनाविषयीच्या विविध भूमिका समजतील.

४. साहित्याच्या मूल्यमापनासंबंधीच्या विविध प्रश्नांचे आकलन होईल.


५. साहित्य मूल्यनिकषांच्या आधारे साहित्याची मूल्यमीमांसा करण्याचे कौशल्य अवगत होईल.

## ३.२ प्रस्तावना

मानव हा समाजशील प्राणी आहे. सामाजिक जीवन जगताना मानवाने उदयापासून आजपर्यंत एक संपन्न संस्कृती घडविली आणि विकसित केली आहे. ही संस्कृती घडवीत असताना माणसाने काही मूल्यांची निर्मिती केली आहे. उदा. सामाजिक मूल्ये, आर्थिक मूल्ये, धार्मिक मूल्ये, नैतिक मूल्ये, कलात्मक मूल्ये आदी. ही सर्व मूल्ये संस्कृतीचीच विविधांगे आहेत. आणि म्हणून ती सांस्कृतिक मूल्याच्याच उपशाखा ठरतात. या मूल्यांचा अभ्यास करणाऱ्या शाखेस `मूल्यमीमांसा` असे म्हणतात. साहित्यातही या मूल्यांचा अंतर्भाव असतो. ही मूल्येच साहित्याला श्रेष्ठ आणि शास्वत बनवितात. साहित्यातील या मूल्यांची चिकित्सा म्हणजे, `साहित्यमूल्यमिमांसा` होय. `साहित्यमूल्यमीमांसा` ही कलात्ममूल्यमीमांसेची एक उपशाखा आहे. साहित्य ही कलात्ममूल्य या शाखेची उपशाखा असली तरी ही जीवनदर्शी कला असल्यामुळे त्यातून सर्वच सांस्कृतिक मूल्यांचा आविष्कार होत असतो. साहित्य हे कलात्ममूल्यांबरोबरच इतर मूल्यांनाही आविष्कृत करते.

थोडक्यात `एखाद्या साहित्यकृतीतून कोणती मूल्ये प्रकट होतात? त्या मूल्यांची साहित्यकृतीतील परिणामकारकता कोणत्या प्रतीची आहे या विषयीची चिकित्सा म्हणजे साहित्यमूल्यमीमांसा होय. या मूल्य मीमांसेलाच सोप्या भाषेत साहित्याचे मूल्यमापन असे म्हणतात.`

हे पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल.



# ३.३ साहित्यातील मूल्यविचार

साहित्य हे दोन प्रकारचे कार्य करत असते. एक कलात्म कार्य आणि दुसरे म्हणजे सौंदर्यात्म कार्य. या दोनही कार्यातून वाचक, रसिकाशी संवाद साधन्याचा हेतू साध्य होत असतो. वाचकही विशिष्ट अशी अपेक्षा ठेवूनच साहित्याचे वाचन करत असतो. कोणी मनोरंजनाची भूक भागविण्यासाठी साहित्य वाचतो तर कोणी ज्ञानाची भूक भागवण्यासाठी किंवा माहितीत भर घालण्यासाठी साहित्य वाचतो, कोणी आध्यात्मिक संस्कारासाठी साहित्य वाचतो तर कोणी नितीबोध व्हावा म्हणून साहित्य वाचतो. कोणी सत्य म्हणजेच वास्तवाची जाण व्हावी म्हणून साहित्य वाचतो तर कोणी विधायक संस्कारक्षम जडणघडणीसाठी साहित्य वाचतो. म्हणजे वाचक हा साहित्याकडून विशिष्ट प्रकारची अपेक्षा ठेवत असतो आणि साहित्याच्या वाचनानंतर या अपेक्षांची पूर्तता व्हावी अशी इच्छा तो मनी बाळगत असतो. साहित्यातील मूल्ये या अपेक्षेवरच आधारलेली असतात. याविषयी श्री. के. क्षीरसागर म्हणतात की 'ललित वाङ्मयाच्या क्षेत्रातील अपेक्षापूर्तीच्या हेतूंना, अगर साधनांनाच आपण वाङ्मयीन मूल्ये हे नाव देतो. ज्या गुणांनी अगर घटकांनी वाङ्मयीन आनंद लाभतो त्यांना त्यांना वाङ्मयीन मूल्य म्हणण्यास हरकत नाही.' याचप्रकारची वाङ्मयीन मूल्यांची व्याख्या गंगाधर गाडगीळ यांनी देखील केली आहे. त्यांच्या मते, 'साहित्यकृतीच्या किंवा अनुभवाच्या ज्या गुणवत्तेमुळे आपल्या मनात तिच्याविषयी आवड, आस्था व इच्छा यांची उत्पत्ती व परिपूर्ती होते त्या गुणवत्तेला मूल्य असे म्हणतात.'

साहित्याच्या संदर्भात सत्य, शिव आणि सुंदर ही मूल्ये महत्त्वाची मानली जातात. साहित्यातून सत्याची अपेक्षा वाचक करत असतो. साहित्याने वास्तव मांडावे. समाजाचे वास्तवदर्शी चित्रण करावे. साहित्यकृतीत कल्पनाविस्तार असला तरी तो बाष्फळ नसून ते एक कल्पित वास्तव असावे. वाचकांच्या या अपेक्षांची पूर्तता जी साहित्यकृती करते तिच्यात सत्य हे मूल्ये आहे. साहित्याने वास्तवदर्शनाबरोबरच नैतिक संस्कारही करावेत अशी अपेक्षाही साहित्याकडून केली जाते आणि साहित्य हे सातत्याने नैतिक संस्काराची ही अपेक्षा पूर्ण करत असते. अशा साहित्यात शिव हे मूल्य आहे. प्रत्येक समाजात काही धार्मिक, सामाजिक, नैतिक मूल्य आणि कलामूल्य प्रचलित असतात. पण कालानुरूप या मूल्यसंकल्पनांमध्ये परिवर्तन होत राहते. नवे साहित्यिक नवे साहित्य निर्माण करतात. त्यातून नवीन साहित्यमूल्ये घडवली जातात. म्हणून मूल्यमापनाचे निकषही बदलतात. विशिष्ट एखाद्या कालखंडात कलामूल्य प्रबळ असते तर विशिष्ट एखाद्या कालखंडात सौंदर्यमूल्य प्रभावी ठरते. या बदलत्या मूल्यभावनुसार मूल्यमापनाविषयीच्या वेगवेळ्या भूमिका आकार घेतात.

पाश्चात्य समीक्षक डॉ. रिचडर्स यांनी काव्याच्या सत्याविषयी मूलभूत विचार मांडले आहेत. सिडनी यांनी देखील काव्य आणि सत्य या समीक्षा ग्रंथात साहित्य आणि सत्याचे अनुबंध सोदाहरण

उलगडून दाखविले आहेत. कीट्स यांनी कल्पनाशक्ती, सौंदर्य आणि सत्य यांचा निकटचा संबंध दाखवून दिला आहे. भावनाविष्काराचा जाणिवेशी, पर्यायाने वैचारिकतेशी संबंध असतो. साहित्यात वैचारिकतेच्या माध्यमातून कलावंत हा अपरिहार्यपणे सत्य सांगण्याचा प्रयत्न करीत असतो.

रा. भा. पाटणकर म्हणतात, 'साहित्यातील सत्य हे कलामूल्याचा अविभाज्य भाग आहे. विज्ञानात कितीही प्रगती झाली, तरी साहित्याचे महत्त्व कमी होणार नाही. अथवा ते नष्ट होणार नाही. कवी हा दृष्टा आहे. त्याला मिळालेले ज्ञान वैज्ञानिकांना मिळालेल्या ज्ञानापेक्षा जास्त वरच्या दर्जाचे आहे. असे ते मानतात; पण एकूण विश्वाबद्दल अंतिम वास्तवाबद्दलचे ज्ञान नव्हे, म्हणून त्यांना वाङ्मयाचे ज्ञानमूल्य न म्हणता विचारमूल्य म्हणणे सयुक्तिक ठरते. साहित्यगत सत्य हे विचारमूल्याच्या स्वरूपातच प्रतित होते. साहित्य मानवास गुणसंपन्न करीत असते. मराठीतील ज्येष्ठ समीक्षक वसंत पाटणकर म्हणतात, ज्ञान देणे हे साहित्याचे एक महत्त्वपूर्ण प्रयोजन आहे. ही भूमिका अनेक साहित्यमीमांसकांनी घेतली आहे. साहित्यकृतीमुळे ज्ञान मिळते, असे म्हणताना तिच्यामुळे माहिती लाभते, वाचक बहुश्रुत होतो, त्याला व्यवहारज्ञान लाभते, आरशातील प्रतिबिंबाप्रमाणे त्याला समाजाचे ज्ञान लाभते, जीवनाचा पुनःप्रत्यय येतो, असा मर्यादित अर्थ अनेकांना अभिप्रेत असतो. अनेक समीक्षकांनी सूक्ष्म स्वरूपातही या भूमिकेची मांडणी केली आहे. ज्येष्ठ समीक्षकांच्या या मीमांसेवरून असे लक्षात येते की, साहित्यात समाजाचे आणि संस्कृतीचे प्रतिबिंब पडते. साहित्यातून वास्तवतेचे आणि जीवनाचे दर्शन घडते. म्हणजे साहित्य हे आपल्याला मानवी मनाचे. स्वभावाचे, अनेकविध मानवी संबंधाचे, मानवी समाजाचे आणि संस्कृतीचे असे अनेक स्तर उलगडून दाखविते. साहित्य या प्रकारचे ज्ञान देते आणि त्यावर साहित्याचे मूल्य अवलंबून असते, अशी भूमिका घेणे म्हणजे म्हणजे साहित्य व सत्य यांच्यात विशिष्ट प्रकारचा संबंध असतो हे मान्य करणे होय.

साहित्याने वास्तवदर्शनाबरोबरच नैतिक संस्कारही करावेत अशी अपेक्षाही साहित्याकडून केली जाते आणि साहित्य हे सातत्याने नैतिक संस्काराची ही अपेक्षा पूर्ण करत असते. अशा साहित्यात शिव हे मूल्य आहे. प्रत्येक समाजात काही धार्मिक, सामाजिक, नैतिक मूल्य आणि कलामूल्य प्रचलित असतात. पण कालानुरूप या मूल्यसंकल्पनांमध्ये परिवर्तन होत राहते. नवे साहित्यिक नवे साहित्य निर्माण करतात. त्यातून नवीन साहित्यमूल्ये घडवली जातात. म्हणून मूल्यमापनाचे निकषही बदलतात. विशिष्ट एखाद्या कालखंडात कलामूल्य प्रबळ असते तर विशिष्ट एखाद्या कालखंडात सौंदर्यमूल्य प्रभावी ठरते. या बदलत्या बदलत्या मूल्यभावनुसार मूल्यमापनाविषयीच्या वेगवेळ्या भूमिका आकार घेतात.

साहित्याचे मूल्यमापण करण्यासाठी सर्वप्रथम साहित्यकृतीचे एक कलाकृती म्हणून मूल्यन करणे आवश्यक आहे. पाश्चात्य साहित्यविचारात मूल्यन आणि मूल्यमापन यात भेद केला जातो. पाश्चात्य समीक्षक मोरावॅस्की यांनी मूल्यन आणि मूल्यमापन या दोन वेगळ्या संकल्पना असल्याचे म्हटले आहे. जेव्हा एखाद्या कलाकृतील कलागूण तपासले जातात तेव्हा त्यास मूल्यन असे म्हटले जाते. संबंधित साहित्यकृती कलाकृती म्हणून स्वीकारण्यास किंवा तिला कलापद प्राप्त होण्यास आवश्यक

असणारे कलागूण शोधने हे मूल्यन प्रक्रियेचे महत्त्वाचे कार्य आहे. या प्रकारचे मूल्यन हे केवळ एकाच साहित्यकृतीचे केले जाते. विशिष्ट अशी एखादी साहित्यकृती तपासून तिच्यात कलागूण आहेत की नाहीत तर ते कलागूण कोणत्या प्रतिचे आहेत संबंधिचा अभिप्राय मूल्यनात दिला जातो. तर मूल्यमापनात एकापेक्षा अधिक कलाकृतींची तपासणी केली जाते. ही तपासणी अर्थातच तुलनेच्या सहाय्याने केली जाते. विशिष्ट एखादी साहित्यकृती ही दुसऱ्या साहित्यकृतीपेक्षा चांगली आहे किंवा विशिष्ट एखादी साहित्यकृती ही दुसऱ्या साहित्यकृतीच्या तुलनेत म्हणावी तेवढी चांगली नाही. किंवा विशिष्ट एखाद्या कालखंडात निर्माण झालेल्या अनेक साहित्यकृतींमध्ये सौंदर्यदृष्ट्या अमूक एक साहित्यकृती चांगली आहे. असा अभिप्राय दिला जातो तेंव्हा त्यास मूल्यमापन असे म्हणतात. मूल्यमापनात साहित्यकृतींची तुलना करून मूल्यांच्या आधारे साहित्यकतीची प्रतवारी ठरविली जाते. तसेच साहित्यकती साधारण, मध्यम चांगली. श्रेष्ठ किंवा महान अशी श्रेणी ठरविली जाते. हे एकापेक्षा अधिक साहित्यकृतींच्या तुलनेनेच शक्य होते. साहित्याच्या मूल्यमापनाचे वेगवेगळे दृष्टिकोन आपल्याला पहायला मिळतात. या मूल्यमापनाच्या विविध दृष्टिकोणावर काळ आणि विचारधारा यांचा खूप मोठा प्रभाव पडलेला असतो. साहित्याचे कार्य काय आहे? किंवा साहित्याने नेमके कोणते कार्य करावे? याविषयी समीक्षक आणि साहित्यशास्त्रकारांमध्ये मतमतांतरे दिसून येतात. ही मतमतारेच मूल्यमापनाविषयीच्या भूमिका म्हणून साहित्यमीमांसेत प्रसिद्ध आहेत.

## ३.४ साहित्य मूल्यमापनाविषयीच्या दोन व्यापक भूमिका

साहित्य मूल्यमापनाविषयी लौकिकतावादी आणि स्वायत्ततावादी या दोन भूमिका प्रचलित आहेत. वस्तुत: या दोन भूमिका म्हणजे साहित्य मूल्यमापनाचे दोन ध्रुव आहेत. पहिला ध्रुव हा लौकितावादी तर दुसरा ध्रुव हा स्वयत्ततावादी म्हणजेच अलौकिकतावादी आहे.

यापैकी पहिल्या ध्रुवात कलेच्या जीवनवादी दृष्टिकोनाला महत्त्व दिले जाते तर दुसऱ्या ध्रुवात कलेच्या स्वायत्ततेला विशेष महत्त्व दिले जाते. साहित्याच्या मूल्यमापनासंदर्भात जीवनासाठी कला अशी भूमिका घेणारी विचारधारा म्हणजे साहित्यमूल्यमीमांसेतील लौकिकतावादी भूमिका होय. लौकिकतावादी विचारधारेनुसार साहित्यकलेच्या व्यवहारात लौकिक जीवनाला महत्त्वाचे स्थान आहे. वस्तुत: केवळ साहित्यकलाच नाही तर प्रत्यक कलेच्या केंद्रस्थानी लौकिक जीवनच असते. म्हणून कलाव्यवहार हा जीवनकेंद्री आहे. तिचा अभ्यास करताना किंवा मूल्यमापन करताना तिच्यातील आशयगत जीवनमूल्यांच्या विचार करणे क्रमप्राप्त ठरते. साहित्याच्या जीवनसापेक्षतेच्या अभ्यासाशिवाय साहित्यकृतीचे योग्य मूल्यमापन होणार नाही, असे मानणारी री विचारधारा म्हणजेच लौकिकतावादी भूमिका होय. तर कलेसाठी कला अशी भूमिका घेणारी विचारधारा म्हणजे स्वायत्ततावादी किंवा अलौकिकतावादी भूमिका होय. साहित्यात जीवन हे प्रासंगिक असून साहित्यकृतीच्या निर्मितीचा मूळ उद्देश हा शुद्ध कला जोपासणे हाच आहे. म्हणूनच साहित्यकलेला जीवनसंदर्भाच्या चष्म्यातून न बघता या कलेच्या स्वायत्ततेला महत्त्व दिले पाहिजे. अशी भूमिका

घेणारी विचारधारा म्हणजेच स्वायत्ततावादी भूमिका होय. कलाकृती लौकिक वस्तूंपेक्षा वेगळी असली, तरी कलाकृतीच्या संदर्भात आस्वादकाच्या ज्या मानस प्रतिक्रिया असतात, त्या केवळ अलौकिक नसतात. अलौकिक तत्त्वांबरोबरच लौकिक तत्त्वेही येथे कार्यरत असतात, अशी साधारणपणे लौकिकतावाद्यांची भूमिका आहे. मराठी साहित्याचा अथवा कलेचा धांडोळा घेतल्यास लौकिकवादी विचारधारा सर्व श्रेष्ठ विचारधारा म्हणून गणली जाते.

### ३.४.१ लौकिकतावादी भूमिका

साहित्याच्या मूल्यमापनासंदर्भातील लौकिकतावादी भूमिका ही व्यापक आणि अतिशय प्रभावी अशी भूमिका आहे. ही लौकिकतावादी भूमिका म्हणजेच जीवनवादी विचारसरणी होय. लौकिकतावाद्यांच्या मते कला हा एक लौकिक म्हणजेच जीवनवादी व्यापार आहे. कलेला स्वत:ची स्वतंत्र, स्वयंभू अशी मूल्ये नसतात तर तिचा जीवनाशी असणारा संबंध शोधतानाच तिचे मूल्य निश्चित होत जाते. कलेची मूल्ये ही जीवनानुभवांवरच अवलंबून असतात. केवळ सौंदर्यनिर्मिती हा कलेचा हेतू नसून सौंदर्यनिर्मितीबरोबरच जीवन संवर्धन करणे हा देखील तिचा हेतू आहे. समाजमनावर विधायक नितीमूल्यांचे संस्कार करणे या हेतूने निर्माण झालेले साहित्यच श्रेष्ठ ठरते. कलेत ज्ञानात्मक, नैतिक मूल्यसंकल्पना प्रस्तुत असतात, ज्या जीवनाशी घट्ट विनल्या गेलेल्या आहेत. म्हणून कलेचा केवळ कलामूल्यांच्या अनुषंगाने विचार न करता तो जीवनमूल्यांच्या अनुषंगाने, अधिक जीवनसापेक्ष अभ्यास करणे हे लौकिकतावादी भूमिकेचे मुख्य प्रयोजन आहे.

साहित्यकला ही जीवनसापेक्ष पर्यायाने समाजसापेक्ष आहे. साहित्याने समाजाचे वस्तुनिष्ठ चित्रण करावे, संपन्न संस्कृतीचे दर्शन घडवावे तसेच समाजातील उपेक्षित. दलित. पिडित वर्गाचे द:ख देखील मांडावे. अशी लौकिकतावाद्यांची भूमिका आहे. साहित्याच्या क्षेत्रात प्रभावी ठरलेल्या मानवतावादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी, स्त्रीवादी या विचारप्रणाली लौकिता वादी भूमिकाच आहेत.

मराठीतील लौकिकतावादी विचारधारा समजून घेताना कला आणि नीती, कला आणि सत्य, कला आणि रूप यांच्या स्वरूपाचा विचारही करणे क्रमप्राप्त ठरते. कलेचा जीवनाशी आणि मूल्यांशी असलेला संबंध अभ्यासणे गरजेचे आहे. म्हणजेच विविध कला व नीती यांचा असलेला परस्पर संबंध सर्वप्रथम अभ्यासणे क्रमप्राप्त आहे. कलेचा आणि नीतीचा मानवी व्यवहाराशी आणि जीवनाशी अतिशय जवळचा संबंध आहे. काही विचारवंतांनी कलेस नीतीची अपरिहार्यता आवश्यक असल्याचे म्हटले आहे. काहींना मात्र कला हा नीतीचा प्रांत असू नये, असे वाटते. मानवी व्यवहाराची अत्यंत विलोभनीय परिणिती म्हणजे, कला आणि नीती होय. साहित्य आणि कला यांच्यापासून दूर असलेला माणूस पशूच होय. कला आणि नीती या दोन्हींचा अनुबंध हा आदर्शभूत आहे. जीवनमूल्याच्या अंगाने कलेचा विचार करताना हा संबंध अधिक दृढ होतो. जीवनाच्या विकासात कलेची भूमिका महत्त्वाची ठरते. मानवातील संकुचितपणा कला कमी करते. व्यापकता, उदारता, औदार्य, समता आदी गुणांची जोपासना कलेच्या माध्यमातून साकल्याने होते.

साहित्याने नीतिबोध होतो. हा नीतिबोध आनंद, मनोरंजन यांच्या माध्यमातून होतो. किंबहुना हेच कलेचे प्रयोजन असते. साहित्याच्या आस्वादाचा वाचकावर ज्या प्रकारचा संस्कार होतो, तो अप्रत्यक्षपणे नैतिकतेला पोषकच असतो. नैतिक दृष्टीने कलेचे कार्य विधायक असून मानवी जीवनाचा तो अविभाज्य घटक आहे. संस्कृत साहित्यपरंपरेत रसातील पुरुषार्थनिष्ठतेची कल्पना नैतिकतेशी संबंधित आहे. कला आणि सत्य, कला आणि रूप व कला आणि नीती हे परस्परसापेक्ष आहेत. कलेचा आणि नीतीचा संबंध आदिम काळापासून चालत आलेला आहे. कलेत नैतिक मूल्य साकारलेले असते. कलेत नैतिकता असणे अपरिहार्य आहे. ही विचारप्रणाली मार्क्सवाद, अस्तित्ववाद या आधुनिक तत्वप्रणालींमध्ये अनुस्यूत आहे. साहित्यातील नैतिक दृष्टिकोनाचा प्रभाव वाचकावर पडत असतो. म्हणजे कला ही नीतीला पोषकच असते हे वेगळेपणाने सिद्ध करण्याची आवश्यकता नाही.

पाश्चात्य साहित्यविचारात कॅथॉसिसची संकल्पना मांडणारे ॲरिस्टॉटल हे एक महत्त्वाचे लौकिकतावादी सौंदर्यमीमांसक आहेत. पुढे सर फिलिप सिडनी, डॉ. जॉन्सन, लिओ टॉलस्टॉय, वर्डस्वर्थ, शेली, मॅथ्य अर्नोल्ड, या पाश्चात्य मिमांसकांनी साहित्य मूल्यमीमांसेत लौकिकतावादी भूमिकेचा स्वीकार केला. मराठीत रा. भा. पाटणकर, शरच्चंद्र मुक्तिबोध, वि. का. राजवाडे, श्री. व्यं. केतकर, ह. ना. आपटे, वा. म. जोशी, वि. स. खांडेकर, केशवसुत, नारायण सुर्वे, शरणकुमार लिंबाळे, द. ग. गोडसे, लालजी पेंडसे, म. सु. पाटील, प्रभाकर पाध्य, गंगाधर पाटील, भालचंद्र नेमाडे, यशवंत मनोहर आदी मीमांसकांनी लौकितावादी भूमिकेचा स्वीकार केल्याचे दिसते, प्रभाकर पाध्य, गंगाधर पाटील.

### ३.४.२ स्वायत्ततावादी भूमिका

साहित्याच्या मूल्यमापनासंदर्भातील स्वायत्ततावादी भूमिका म्हणजेच अलौकिकतावादी भूमिका होय. ही लौकिकतावादी विचारसरणी कलावादी भूमिका म्हणून साहित्यविचारात प्रचलित आहे. कलेला 'शुद्ध कला म्हणून स्वायत्त दर्जा देण्यावर स्वायत्ततावाद्यांचा भर आहे. कलेसाठी कला या तत्त्वानुसार साहित्याचे मूल्यमापन करावे, साहित्यकला व निती यांची सांगड घालण्याचा प्रयत्न करून नये. 'कला ही नितीमूल्यांची रुजवणून करण्यासाठी असते असे म्हणने म्हणजे नितीने, कलेवर हुकूमत गाजविण्यासारखे होईल. असे स्वायत्ततावाद्यांना वाटते. कला ही निर्भेळ आनंद देणारी स्वान्तःसुखार्थ असते. याविषयी प्रतिभासाधनमध्ये ना. सी. फडके कलेला महाराणी तर नितीला दासी संबोधून, दासीने महाराणीच्या सिंहासनावर बसण्याचा प्रयत्न करू नये असे परखडपणे प्रतिपादित करतात. फडके कलेच्या नीतिवादाला विरोध करतात. ते म्हणतात, 'कला आणि नीती ही वेगळी मूल्ये नसून नीतीने कलेवर आपला प्रभाव व सत्ता गाजविण्याचा प्रयत्न करू नये. कला ही निर्भेळ आनंद स्वान्तःसुखार्थ प्राप्त करून देते. कलेचे तेच कार्य आहे. नीतिपरिपोष किंवा हितोपदेश हा कलेचा हेतूच नव्हे.. नीती ही दासीप्रमाणे असून महाराणीच्या सिंहासनावर बसण्याचा प्रयत्न तिने करू नये, सारे हास्यास्पद ठरेल. कला हे उपदेश करणारे अथवा प्रवचन करणारे साधन नव्हे, अशी ही लौकिकतावादविरोधी भूमिका आहे. स्वायत्ततावाद्यांच्या मते ललित साहित्य हे केवळ निर्भेळ

आनंद देण्याच्याच हेतूने निर्माण होते. ज्यांना नितीबोध हवा आहे त्यांनी कलेऐवजी तत्वज्ञानाकडे वळावे. व्यवहारिक दृष्टी ठेवन कला जोपासता येत नाही आणि व्यवहारिक किंवा उपयुक्ततेच्या चष्म्यातून पाहिल्यास कलेचे शुद्ध स्वरूप हे झाकोळलेले दिसेल. म्हणून साहित्याकडे केवळ कला म्हणूनच पहावे. ही स्वायत्ततावादी भूमिका आहे.

मराठीमध्ये विष्णूशास्त्री चिपळूणकरांपासून स्वायत्ततावादी भूमिकेची बीजे दिसतात. पुढे श्री. कृ. कोल्हटकर, बा. सी. मर्टेकर, पु. शी. रेगे, ना. सी. फडके, आदी मीमांसकांनी स्वायत्ततावादी भूमिका स्वीकारल्याचे दिसून येते.

लौकिकतावादी भूमिकेत साहित्यकृतीतील जीवनवादी आशयाला महत्त्वाचे स्थान आहे. तर स्वायत्ततावादी भूमिकेत साहित्यकृतीचा केवळ एक कलाकृती म्हणून विचार केला जातो. लौकिकतावादी आणि स्वायत्ततावादी या दोन भूमिका दोन परस्पर विरोधी ध्रुवासारख्या वाटत असल्या तरी प्रत्येक कलाकृतीत हे दोनही गूण कमी अधिक प्रमाणात कार्यरत असतात. या दोहनी विचारधारांचे अनुबंध अनेक साहित्यकृतींमधून दाखवता येतात. हा विचार मांडणारी समन्वयवादी भूमिकाही काही जावन मीमांसकांनी घेतेली दिसते. उदा. पु. शी. रेगे, गंगाधर गाडगीळ, वा. ल. कुलकर्णी, यांनी साहित्यकृतील कलानंदाबरोबरच जीवनानुभूतीचा प्रत्यय मान्य केला आहे.

### ३.४.३ लौकिकतावाद आणि स्वायत्ततावाद यांच्यातील अनुबंध

लौकिकतावाद व स्वायत्ततावाद या साहित्यविचारातील दोन्ही भूमिका कमी - जास्त प्रमाणात प्रत्येक साहित्यकतीत आढळन येतात. लौकिकतावादी म्हणजेच जीवनवादी विचारधारा ही आशयाला विशेष प्राधान्य देते. या विचारधारेनुसार साहित्याचा जीवनाशी जवळचा संबंध आहे. साहित्य ही कला जीवनसंबद्ध दृष्टिकोनाचा परिपाक आहे हा विचार लौकिकतावादी विचारधारेत प्रमुख आहे. तर स्वायत्ततावादी विचारधोत साहित्याचा साहित्य म्हणून, एक कला म्हणून विचार केला जातो. साहित्यकृतीच्या रूपाला अथवा आकृतिबंधाला यात महत्त्व असते. या दोन्ही विचारधारांमध्ये कमालीचा विरोध असला तरी या दोन्ही विचारधारा काही समान दुव्यांनी जोडलेल्या आहेत. या दोन्ही भूमिकांमध्ये काही प्रमाणात अनुबंध असल्याचे निदर्शनास येते. रा. भा. पाटणकर यांच्या मते, 'लौकिकतावाद व स्वायत्ततावाद यांची मुळे एकमेकांत अशी गुंतलेली आहेत की, कलेचे व सौंदर्याचे दोन स्वतंत्र प्रकार आहेत असे म्हणण्याऐवजी या दोन संकल्पना द्विध्रुवात्मक आहेत. असे म्हणणे वास्तवाला जास्त धरून होईल.' कलेच्या प्रकृतीतच या दोन्ही विचारव्युहांना आधार आहे, असे सांगून पाटणकरांनी या दोन्ही विचारधारांमधील संबंध अधोरेखित केले आहेत. संगीतासारख्या रचनाप्रधान कला स्वायत्ततेच्या, अलौकिकतेच्या ध्रुवाकडे झुकलेल्या असतात. रचनाप्रधान कलांमध्ये बीजरूपाने आशय आणि आशयप्रधान कलांमध्ये बीजरूपाने रचना असतेच. संगीताच्या संदर्भात रूपावर लक्ष केंद्रित करणारी स्वायत्ततावादी भूमिका, तर साहित्यासारख्या आशयप्रधान कलेमध्ये नैतिक गोष्टींवर भर देणारी लौकिकतावादी भूमिका प्रस्तुत ठरते. समग्र मानवी जीवनात, अनुभवात सौंदर्याचे, कलेचे वा साहित्याचे स्थान काय? कलेचा हेतू कोणता? म्हणजेच

कलेचा जीवनाच्या अन्य अंगाशी संबंध काय? या मूलभूत प्रश्नांवर ज्या दोन परस्परविरोधी भूमिका घेतल्या जातात, त्यातूनच स्वायत्ततावादी अथवा स्वायत्ततावादी या दोन भूमिकांनी आकार घेतला आहे. स्वायत्ततावादी भूमिका ही रूपतत्वाचा पुरस्कार करते, तर याउलट लौकिकतावादी भूमिका ही आशयावर भर देताना दिसते. ज्यात लौकिक जीवनाचा, त्यातील बौद्धिक व व्यवहारात्मक व्यापाराचा, सुख - दु:खात्मक भावनांचा संबंध येत नाही.

प्रकाश मेदककर यांच्या मते, सौंदर्याचे सत्य व शिव या अंगांशी कोणत्या प्रकारचे सबंध आहेत, यावरून कलेच्या मूल्यमापनाच्या संदर्भात मतभेद होतो. समग्र मानवी जीवनात, अनुभवात सौंदर्याचे, कलेचे स्थान काय आहे? कलेचा हेतू कोणता आहे? म्हणजेच सौंदर्याचा, कलेचा जीवनाच्या अन्य अंगांशी संबंध काय? या मूलभूत प्रश्नांवर ज्या दोन परस्परविरोधी मूल्यमापनात्मक भूमिका घेतल्या जातात, त्यांतून स्वायत्ततवाद व लौकिकतावाद हे दोन मूल्यव्यूह सिद्ध झाले आहेत. यापैकी कोणत्या मूल्यव्यूहाचा स्वीकार आपण करतो, यावर सौंदर्यमूल्य व कलामूल्ये ही पूर्णपणे वेगळी आहेत की त्यांचा जीवनाच्या इतर क्षेत्रांतील मूल्यांशी संबंध आहे, या प्रश्नाचे उत्तर अवलंबून आहे.' साहित्याची प्रकृती लक्षात घेऊन विवेकी लौकिकतावादाची मांडणी करायची असेल, तर केवळ कलात्मक निकषांनीच साहित्याचे मूल्यमापन करायला हवे, ही स्वायत्ततावाद्यांची भूमिका सर्वस्वी स्वीकारणे जसे कठीण आहे, तशीच केवळ बोधवादी, प्रचारवादी, आशयवादी, साधनात्मक भूमिकाही पूर्णांशाने स्वीकारणे कठीणच आहे.

## ३.५ साहित्याच्या मूल्य मापनासंबंधीचे काही प्रश्न

साहित्य मूल्यमीमांसा हा समीक्षाव्यापारातील मूलभूत भाग आहे. एखाद्या साहित्यकृतीतील कलामूल्ये किंवा जीवनमूल्ये यांच्या मीमांसेतून समीक्षक त्या साहित्यकृतीची प्रतवारी ठरवत असतो. वस्तुत: हा समीक्षक एक वाचक, रसिकच असतो पण त्याची साहित्याभिरुची सामान्य वाचकापेक्षा वेगळी असते. सामान्य वाचक साहित्यकृती वाचून आपली मनोरंजनाची भूक भागवतो, फार तर तिच्याबद्दल आपला अभिप्राय व्यक्त करतो, पण समीक्षक  साहित्यकृती वाचतो तेव्हा तो संबंधित साहित्यकृतीबद्दल काही मूलभूत प्रश्न उभे करतो. ते म्हणजे ही साहित्यकृती चांगली आहे की श्रेष्ठ? ही साहित्यकृती वस्तुनिष्ठ आहे की ज्ञातृनिष्ठ? ही साहित्यकृती सापेक्ष आहे की शास्वत? आणि या प्रश्नांची उत्तरे तत्कालीन मूल्यनिकषांच्या आधारे शोधण्याचा प्रयत्न करतो. या प्रश्नांचा सविस्तर विचार येथे प्रस्तुत आहे.

### ३.५.१ साहित्यकृती चांगली की श्रेष्ठ?

साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना साहित्यकृतीची प्रतवारी ठरविली जाते. साहित्यकृती वाचल्यावर वाचक किंवा समीक्षक तिच्याबद्दल विशिष्ट अशी प्रतिक्रिया देत असतो. साहित्यकृती साधारण आहे

की चांगली आहे, साहित्यकृती चांगली आहे की श्रेष्ठ आहे? याविषयी काही मूल्यनिकषांच्या आधारे आपले मत तो मांडत असतो.

हे मत मांडत असताना साहित्यकृती कोणत्या प्रतिची आहे, याविषयी - साहित्यकृती वाईट, साधारण, बरी, चांगली, श्रेष्ठ किंवा महान याप्रकराची चढती श्रेणी दिली जाते. एखादी साहित्यकृती ही कलामूल्ये किंवा जीवनमूल्ये यांच्या कसोटीवर खरी उतरत नाही किंवा कोणताही विधायक हेतू ती साध्य करत नाही, तेव्हा अशी कलाकृती वाईट ठरते. एखादी साहित्यकृती कलामूल्ये किंवा जीवनमूल्ये यांच्या कसोटीवर काही प्रमाणात टिकते, पण तिच्यातील विषय आणि आशयगत मूल्ये ही प्रासंगिक असतात तेव्हा ती साधारण किंवा बरी म्हटली जाते. एखादी साहित्यकृती कलामूल्यांबरोबरच उच्च प्रतिची जीवनमूल्ये घेऊन येते तेव्हा ती साहित्यकृती चांगली ठरते. अशी चांगली साहित्यकृती समष्टीचे जीवनदर्शन घडवते. अनेकदा तिचा विषय प्रासंगिक असला तरी जीवनाच्या संदर्भातील महत्त्वाचा मूल्यभाव ती प्रकट करते. ही साहित्यकृती विशिष्ट काळापुरती प्रभावी ठरते. याच्याही पलिकडे जाऊन स्थलकालाच्या मर्यादा ओलांडून जी साहित्यकृती समाजमनावर दिर्घकाळ आपला प्रभाव टिकवून ठेवते ती साहित्यकृती शास्वत साहित्यकृती ठरते. अशी श्रेष्ठ किंवा महान साहित्यकृती कितीही शतके लोटली तरी कालबाह्य ठरत नाही. तिची वाचनीयता तसूभरही कमी होत नाही. म्हणजेच ती साहित्यकृती शतकांची कसोटी पार करते. तीच्यातील मूल्यभाव हा शास्वत असतो. एखादी साहित्यकृती चांगली की श्रेष्ठ हे ठरवणे वाटते, तेवढे सोपे नाही. साहित्यकृतीतील मूल्यधारणा, साहित्यकृतीची शास्वतता, वस्तुनिष्ठता या सर्व कसोट्यांवर जी साहित्यकृती खरी उतरते तीच साहित्यकृती श्रेष्ठ ठरते.

## ३.५.२ साहित्यकृती वस्तुनिष्ठ की ज्ञातृनिष्ठ?

साहित्यकृती चांगली आहे की श्रेष्ठ हे ठरविण्यासाठी काही मूल्यनिकष निर्धारित केलेले आहेत. या मूल्यनिकषांच्या पडताळणीसाठी साहित्यकृतीच्या संदर्भात काही मूलभूत प्रश्न उभे केले जातात. त्यापैकी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे - साहित्यकृती वस्तुनिष्ठ की ज्ञातृनिष्ठ? हा होय. साहित्य हा समाजाचा आरसा आहे. म्हणजेच साहित्याने समाजमनाचे आविष्करण करणे अपेक्षित असते. आणि समाजमन हे समष्टीचे आहे विशिष्टाचे नाही. विशिष्ट एका व्यक्तीचे ते नाही. जसे साठोत्तर कालखंडात उदयास आलेल्या दलित साहित्यिकांनी मांडलेले अनुभव हे समग्र दलित समाजाचे समान अनुभव होते. ते समष्टीचे अनुभवविश्व होते त्यामुळे त्या साहित्याला वस्तुनिष्ठता लाभली. समष्टीच्या कल्याणाचा विचार मांडणारी साहित्यकृती ही महानतेच्या पदापर्यंत पोहोचते. केवळ व्यक्तिनिष्ठ कल्यानाचा विचार मांडणारी साहित्यकृती मात्र चांगली ठरेल पण श्रेष्ठ कधीच ठरत नाही. साहित्यकृतीचे मूल्यमापन करणारे मूल्यनिकष देखील वस्तुनिष्ठ असावे लागतात. ते व्यक्तिनिष्ठ असून चालत नाहीत.

## ३.५.३ साहित्यकृती सापेक्ष की शास्वत?

साहित्यकृती सापेक्ष की शास्वत? हा साहित्यमूल्यमीमांसेतील मूलभूत प्रश्न आहे. साहित्यकृतीचे मूल्यमापन करून साहित्यकृती चांगली की श्रेष्ठ हे ठरवताना साहित्यकृतीची शास्वतता तपासली जाते. साहित्यकृतीच्या संदर्भात सापेक्ष या संज्ञेचा अर्थ स्थलकालबद्ध किंवा स्थलकाल सापेक्ष असा आहे. म्हणजेच जी साहित्यकती प्रदेश आणि कालखंडाच्या मर्यादेत वावरते ती साहित्यकृती सापेक्ष ठरते. तिचा विषय आणि आशय हे विशिष्ट काळ आणि विशिष्ट प्रदेशापुरतेच मर्यादित राहतात. म्हणजेच त्या साहित्यकृती या स्थलकालसापेक्ष असतात. अशी सापेक्ष साहित्यकृती विशिष्ट एखाद्या कालखंडात तत्कालीन विषयावर बेतलेली असते. अशी साहित्यकृती काही काळापुरती लोकप्रिय ठरते देखील, पण कालांतराने तिची वाचनीयता कमी होत जाते. तसेच ती कलाकृती त्या विशिष्ट अशा प्रदेशातच वाचनीय ठरते. त्या प्रदेशाच्या बाहेर तीची वाचनीयता कमी असते. अशा साहित्यकृतींना सापेक्ष साहित्यकृती म्हणतात. अशी सपेक्ष साहित्यकृती ही स्थलकालबद्ध असते. ती त्याच प्रदेशातील आणि त्याच कालखंडातील लोकांना आनंद देत असते. परंतु काही साहित्यकृती या स्थलकालाच्या कक्षा ओलांडून जातात. स्थळ आणि काळाची मर्यादा ओलांडणाऱ्या या साहित्यकृतीतील जीवनमूल्ये ही वैश्विक असतात. अशा साहित्यकृतींचा विषय आणि आशयातील मूल्ये ही क्षणिक नसून सर्वकालिक असतात. त्यामुळे अशी साहित्यकृती कितीही काळ लोटला तरी प्रत्येक काळात वाचनीय ठरते. अशा साहित्यकृतीच्या अंगी विविध कालखंडातील वाचकांच्या साहित्यविषयक अपेक्षांना अनुरूप प्रतिसाद देण्याची क्षमाता असते. जी साहित्यकृती शतकानुशतके वेगवेगळी अभिरूची असणाऱ्या कालखंडात वाचकांच्या मनावर अधिराज्य गाजवीते ती कलाकृती समीक्षेच्या भाषेत सांगायचे झाल्यास शतकांची कसोटी पार करते. साहित्यकृतीच्या शास्वततेच्या संदर्भात ही शतकांची कसोटी महत्त्वपूर्ण आहे. एक शतक हे हा विशिष्ट एक कालखंड मानून वेगवेगळ्या शतकांत म्हणजेच वेगवेगळ्या कालखंडात आपली वाचनयीता जर एखादी साहित्यकृती टिकवून ठेवत असेत तर ती साहित्यकृती शास्वत ठरते. महान पाश्चात्य समीक्षक ओसाव्हॅस्की म्हणतात की, शास्वत कलाकृती ही पुरून उरणारी असते. विशिष्ट एखाद्या कालखंडातील वाचक, प्रेक्षकांच्या अपेक्षांना पुरेपूर प्रतिसाद देऊन पुन्हा पुढील येणाऱ्या कालखंडातील वाचक, प्रेक्षकांच्या अपेक्षेवर खरे उतरण्यासाठी आपली प्रतिसादक्षमता शिल्लक ठेवत असते. याचाच अर्थ असा की, ऐतिहासिक परिस्थितीच्या पल्याड डोकावण्याची एक वेगळीच क्षमता या शाश्वत साहित्यकृतीत असते. म्हणूनच शास्वत साहित्यकृती ही शतकानुशतके लोकमानसावर व कलाजीवनावर आपला प्रभाव टिकवून असते. सापेक्ष कलाकृती ही केवळ कलानंद देते. शास्वत कलाकृती ही केवळ कलानंदच देत नाही तर एक नैतिक स्वरूपाची जीवनदृष्टीही देते. पुढील अनेक वर्षे नवनिर्माणाला खतपाणी घालण्याचे महत्त्वपूर्ण शास्वत साहित्याकडून आपोआपच घडत जाते. अनेक नवलेखक अशा साहित्यकृतीतून प्रेरणा घेऊन लेखन करतात. वर्षानुवर्षे संशोधकांना संशोधनासाठी खुनावत राहतात. सापेक्ष कलाकृती ही एखाद्या विशिष्ट कालखंडापुरती वाचकांच्या मनावर प्रभाव पाडू शकते पण शास्वत कलाकृती मात्र अनेक नवीन कलाकृतींच्या निर्मितीसाठी प्रभव कारण ठरत असते.

अनेकदा नव्या विचारप्रवाहांच्या निर्मितीस देखील अशी शास्वत कलाकृती चालना देते. अशी शास्वत कलाकृतीच महानतेच्या पदापर्यंत पोहोचू शकते.

## ३.६ साहित्यमूल्ये व समीक्षा दृष्टिकोन

साहित्यातील मूल्यविचार हाच साहित्यकृतीला महात्मता प्राप्त करून देतो. साहित्यकृती साधारण असेल की बरी? चांगली असेल की श्रेष्ठ ? हे तिच्यातील मूल्य विचारांवर अवलंबून असते. या मूल्यविचाराच्या आधारेच समीक्षक तिची मूल्यमीमांसा करतो. साहित्यातील मूल्यविचार म्हणजेच साहित्यमूल्ये होत. ही साहित्यमूल्ये प्रामुख्याने तीन प्रकारची आहेत. यातील पहिले मूल्य म्हणजे कलामूल्य होय. यात कलाकृतीच्या स्वरूपाचा प्रामुख्याने विचार केला जातो. कलाकृती नेमकी काय आणि कशी आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधताना समीक्षक साहित्यकाराच्या निर्मिती प्रक्रियेच्या अंगाने विचार करतो. ही कलामूल्ये म्हणजे नेमके काय? तर साहित्यकृतीचे अंगभूत गुणधर्म, तिची रचना, तिचे स्वरूप विशेष हे होत. साहित्यकृतीतील अनुभव विश्व व्यक्तिरेखा, कथानक, भाषा, प्रतिक - प्रतिमा, रुपबंध आदी उपघटकांच्या आधारे ही कलामूल्ये प्रकट होतात. सामान्य वाचक यातून आनंदार्जन करून घेतो तर समीक्षा दृष्टीकोन लाभलेला चोखंदळ वाचक या घटकांच्या आधारे साहित्यकृतीची मूल्यमीमांसा करत असतो. साहित्यकृती श्रेष्ठतेच्या पदापर्यंत पोहोचण्यासाठी तिच्यात ही कलामूल्ये असणे आवश्यक आहे. या कलामूल्यांचे यशापयश हे साहित्यकाराच्या निर्मितीप्रक्रियेशी अधिक निगडित असते या निर्मितीप्रक्रियेची मीमांसा लेखकाची लेखनपूर्व आत्मनिष्ठा आणि वाङ्मयीन तादात्म्य यांच्या आधारे केली जाते.

साहित्यमूल्याचा दुसरा प्रकार आहे सौंदर्यमूल्ये साहित्यकृती चांगली किंवा श्रेष्ठ ठरण्यासाठी तिच्यात केवळ कलामूल्ये असून चालत नाही तर सौंदर्यमूल्ये असणेही गरजेचे आहे. साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना ती साहित्यकृती कोणत्या प्रकारचे सौंदर्यात्मक कार्य करते याचा विचार केला जातो. साहित्यकृतीतील सौंदर्यमूल्य हे आस्वादव्यापाराशी निगडित आहे. साहित्यकृती वाचकमनावर, समाजमनावर विशिष्ट प्रकारचा कलात्मक परिणाम करत असते. म्हणजे एखादी साहित्यकृती वाचकाच्या मनात करूण रसाची निर्मिती करते तर एखादी साहित्यकृती वाचकाच्या मनात वीर रसाची उत्पत्ती करते. ही रसनिर्मीती करण्याची कलाकृतीची सक्षमता म्हणजेच तिचे सौंदर्यमूल्य होय. रसनिष्पत्तीच्या स्वरूपात वाचकाशी संवाद करणे हे कलाकृतीचे सौंदर्यात्मक कार्य आहे.

साहित्यमूल्यांचा तिसरा प्रकार म्हणजे सौंदर्येत्तर मूल्ये होत. साहित्यकृत्ती ही केवळ कलात्मक किंवा सौंदर्यात्मक कार्ये पार पाडत नाही तर साहित्यकृती काही सौंदर्येत्तर कार्ये ही करत असते. साहित्यकृती ही समाजमनावर काही नैतिक मूल्यांचे संस्कार करत असते. समाजाला काही

नितिबोध करत असते. साहित्यकृतीत जीवनानूभव व्यक्त झालेले असतात. दलित - पिडितांच्या व्यथा -वेदनांना साहित्य शब्दांकित करते. दु:खीतांचे दु:ख दूर करण्याचा विधायक मार्गही साहित्य दाखवते. ही साहित्याची सौंदर्येतर कार्ये आहेत. हीच साहित्याची सौंदर्येतर मूल्ये आहेत ज्यांना आपण जीवनमूल्ये असे देखील संबोधतो.

कलावंताकडे अथवा लेखकाकडे काही एक नैतिक भूमिका असावी, असा मानरा मराठीत समीक्षकांचा एक वर्ग आहे. भालचंद्र नेमाडे नैतिकतेविषयी म्हणतात की, लेखकाची नैतिकता, त्याची मूल्यदृष्टी हा साहित्यकृतीचे मूल्य निश्चित करणारा सर्वांत महत्त्वाचा निकष आहे. लेखक कोणत्या तरी मानवी समाजाचा व संस्कृतीचा घटक असतो. त्या समाजातील व संस्कृतील मूल्यव्यवस्थेचा संस्कार त्याच्यावर अप्रत्यक्ष होत असतो. साहित्यकृतीच्या मूल्यमापनात मौलिकता अणि नविनता हे गूणधमर्म महत्वाचे आहेत. या गुणधर्मांना मूल्यनिकष असेही संबोधले जाते. आशय, विषयातील नाविन्य आणि मुख्य म्हणजे रूढ संकेतांचे उल्लंघन हे साहित्यकृतीला नविनता प्रदान करते तर साहित्यिकाचा जीवनविषयक जो मूलभूत व वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन असतो त्यामुळे साहित्यकृतीस मौलिकता लाभते. हा मौलिकतेचा गुणधर्म सर्वच साहित्यकृतीत सारख्या प्रमाणात आढळत नाही. नविनता आणि मौलिकता हे दोनही मूल्यनिकष एकमेंकांवर आधारित आहेत. लेखकाचा वैशिष्ट्यपूर्ण दृष्टिकोन नाविन्यपूर्ण आशयाला जन्म देतो आणि हाच नविनतम आशय साहित्यकृतीला मौलिक बनवितो. काही रूढ संकेत, प्रतिके, प्रतिमा, अनुभव, विषय, जाणिवा यांच्यातील सारखेपणामुळे अनेकदा ते वापरून गुळगुळीत झाल्यासारखे वाटतात. अशा साहित्यात तोच तो पणा निर्माण होतो. याचे महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे १९६० च्या दशकात दलित साहित्याने नवे अनुभवविश्व मांडले. पारंपरिक रूढ संकेतांना झुगारून या साहित्याने अभिव्यक्तीची पद्धती, भाषा, जाणिवा, प्रतिक-प्रतिमा यांच्या बाबतीत नवे प्रयोग केले ज्यामुळे या साहित्याला नाविन्य प्राप्त झाले आणि १९९० च्या दशकात मराठी दलित साहित्याची भाषा, अनुभव, प्रतिक-प्रतिमांचा वापर यांतील सारखेपणामुळे दलित साहित्यावर एकसुरीपणाची टीका देखील झाली. पण जीवनविषयक प्रगल्भ दृष्टिकोनामुळे या साहित्याची मौलिकता टिकून राहिली. नव्याने होणारे प्रयोगही या साहित्याला पुन्हा पुन्हा नाविन्य प्रदान करत राहिले. नाविन्य हे 'ओरिजनल' असते ती इतर कोणत्याच गोष्टीची नकल नसते. या नाविन्याची देखील नकल होत नसते तर काही ठराविक संकेतांची अनेक साहित्यकृतींमधून पुनरावृत्ती होत असते. मौलिकतेची देखील कधीच नकल करता येत नाही. जेथे नकल झाली तेथे मौलिकता कधीच वसत नाही म्हणून नाविन्य आणि मौलिकता हे दोन्ही गुणधर्म श्रेष्ठ साहित्यकृतीत हातात हात धरून वावरत असतात.

## आपली प्रगति तपासा

### साहित्यतिल मूल्यविचार स्पष्ट करा

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

……………………………………………………………………………………..

## ३.७ समारोप

साहित्यकृती ही स्वत:शी, लेखकाशी आणि समाजाशी अंतर्लक्ष्यी संबंध साधत असते. साहित्यकृतीचे स्वरूप,  लेखकाची निर्मिती प्रक्रिया आणि वाचकाचा आस्वादव्यापार यावरून साहित्याचे मूल्यमापन केले जाते. साहित्याच्या मूल्यमापनाचे निकषही साहित्यकृतीच्या या संबंधांवर आधारलेले असतात. मूल्यमापनाचे हे निकष व्यक्तिनिष्ठ नसून वस्तुनिष्ठ असतात. साहित्याचे सौंदर्य ही एखादी वस्तू नसून सर्वांना जाणवणारा साहित्याचा गुणधर्म आहे. त्यामुळे तो वस्तुनिष्ठ आहे.

साहित्यातून प्रकट होणाऱ्या मूल्यांची परिणामकारकता कोणत्या प्रतीची आहे या विषयीची चिकित्सा म्हणजे साहित्यमूल्यमीमांसा होय. या मूल्य मीमांसेलाच सोप्या भाषेत साहित्याचे मूल्यमापन असे म्हणतात.

## ३.८ संदर्भ ग्रंथ

१. फडके ना. सी. - प्रतिभासाधन

२. पाटणकर रा. भा. - सौंदर्यमीमांसा

३. सौंदर्यानुभव - प्रभाकर पाध्ये

४. साहित्याचे मूल्यमापन - बालशंकर देशपांडे

५. वाङ्मयीन वाद : सकल्पना व स्वरूप - (संपा.) रायकर सिताराम व इतर

६. टीकाविवेक - श्री. के. क्षीरसागर

७. साहित्यशास्त्र स्वरूप आणि समस्या - वसंत पाटणकर

८. साहित्य निर्मिती व समीक्षा - दि. के. बेडेकर

९. समीक्षा मीमांसा - गंगाधर पाटील

१०. नवे साहित्यशास्त्र - यशवंत मनोहर

११. वाङ्मयीन महात्मता - रा. ग. जाधव

१२. साहित्याची सामाजिकता - सतीश बडवे

## ३.९ नमुना प्रश्नसंच

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. साहित्यातील मूल्यविचार स्पष्ट करा.

२. साहित्याच्या मूल्यमापनाचे निकष थोडक्यात सांगा.

३. साहित्याच्या मूल्यमापनाविषयीची लौकीकतावादी भूमिका स्पष्ट करा.

४. शास्वत साहित्य कोणत्या साहित्याला म्हणावे साधार विवेचन करा.

५. साहित्याच्या मूल्यमापनाविषयीची स्वायत्ततावादी भूमिका स्पष्ट करा.

६. साहित्याच्या मूल्यमापनासंबंधीच्या विविध प्रश्नांचे उहापोह करा.

७. साहित्यमूल्यमीमांसा म्हणजे काय हे सवीस्तर स्पष्ट करा.

८. साहित्यकृती श्रेष्ठ किंवा महान कशी ठरते साधार विवेचन करा.

**ब) टीपा लिहा.**

१. लौकिकतावादी भूमिका

२. स्वायत्तवादी भूमिका

३. साहित्यमूल्ये व समीक्षा दृष्टिकोण

४. साहित्यातील मूल्यविचार

५. साहित्याचे मूल्यमापन

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. साहित्यमूल्येमीमांसा ही कोणत्या मीमांसेची एक उपशाखा आहे?

२. साहित्य मूल्येमापनाचे दोन ध्रुव कोणते?

३. कॅथॉर्सिसची संकल्पना मांडणारे आहणि लौकिकतावादी पाश्चात्य सौंदर्यमीमांसक कोणास म्हटले जाते?

४. मराठीमध्ये स्वायत्ततावादी भूमिकेची बीजे कोणी रूजविली

५. साहित्याच्या संदर्भात कोणती तीन मूल्ये महत्त्वाची मानली जातात?

❖❖❖